७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. ०५ मे २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १२९ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# बारामतीत सुनेत्रा पवारांचा ऐतिहासिक विजय

**बारामती (दै. संध्या)**

- २.१८ लाख मतांच्या फरकाने ऐतिहासिक कामगिरी
- देश व राज्यातील सर्वाधिक मताधिक्याचा विक्रम




**देशाच्या इतिहासात मतांचा नवा विक्रम प्रस्थापित**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाती मृत्यूनंतर बारामती विधानसभेची पोट निवडणुकी लागली होती यात सुनेत्रा पवार या दोन लाख 18 हजार अशा विक्रमी मताने निवडून आल्या असून त्यांच्या नावे देशात व राज्यात सर्वाधिक मताधिक्याने निवडून येण्याचा विक्रम झाला आहे पहिल्या महिला उपमुख्यमंत्री होण्याचा मान मिळवला आहे आता या निवडणुकीत सुनेत्रा पवार यांनी राज्यातील सर्वाधिक विक्रमी मताधिक्याने निवडून येण्याचा मान मिळवला आहे. बारामती विधानसभा मतदारसंघांमध्ये तीन लाख 83 हजार 767 मतदार आहेत2024 च्या विधानसभा निवडणुकीत अजित पवार निवडून आले होते. परंतु त्यावेळीही बारामती विधानसभा मतदारसंघात 24 उमेदवार रिंगणात होते. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांविरोधात राष्ट्रवादी एसपीचे युगेंद्र पवार मैदानात होते. अजित पवारांना 181,132 मतं मिळाली होती तर दुसऱ्या नंबरवर असलेल्या युगेंद्र पवारांना 80,233 इतकी मतं मिळाली होती.

वंचितकडून लढलेल्या मंगलदास निकाळजेंना केवळ 1,584 मतं मिळाली होती. 2024 च्या निवडणुकीत अपक्षांसहित लहानसहान पक्षांचे एकूण 24 उमेदवार रिंगणात होते. 3,80,608 पैकी 2,73,116 मतदारांनी आपला हक्क बजावला होता. 72% अशी मतदानाची आकडेवारी होती. आताच्या निवडणुकीमध्ये 23 उमेदवार रिंगणात आहेत मात्र सर्व राजकीय पक्षांनी पाठिंबा दिल्याने या ठिकाणी 22 उमेदवार अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात होते मात्र या सर्वांचे डपॉझिट जप्त झाले आहे या निवडणुकीत 58.17% मतदान झाले होते दोन लाख 23 हजार 705 इतक्या मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला होता. देशात सर्वाधिक मताधिक्याने निवडून येण्याचा विक्रम 2022 मध्ये उत्तर प्रदेश येथील साहिबा बाद विधानसभा मतदारसंघात भाजपचे उमेदवार सुनील कुमार शर्मा 2 लाख 14,835 मताधिक्य मिळवले होते तेलंगणा विधानसभा मतदारसंघ 2023 मध्ये विधानसभा निवडणुकीत केटी रामराव श्री शैल्य संघातून 2 लाख 14000 पेक्षा जास्त मताधिक्याने निवडून येण्याचा विक्रम त्यांच्या नावे आहे तर राज्यात सातारा मतदारसंघातून भाजपचे मंत्री शिवेंद्रराजे भोसले हे एक लाख 42 हजार 124 मताधिक्याने विजयी झाले आहेत.

## राहुरीत अक्षय कर्डिले यांचा विजय

अहिल्यानगर : राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी १ लाख, १२ हजार ५८७ मताधिक्याने दणदणीत विजय मिळवला आहे. राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे निधनानंतर ही पोट निवडणूक लागली होती. या निवडणुकीत शिवाजी कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांना १ लाख ४० हजार ९३ मते तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार गोविंद मोकाटे यांना २७ हजार ५०६ मते मिळाली. मतमोजणीच्या सुरुवातीपासूनच अक्षय कर्डिले यांनी एकतर्फी आघाडी घेतली होती. प्रत्येक फेरीत वाढत गेलेली आघाडी पाहता निकालाची औपचारिक घोषणा होण्यापूर्वीच त्यांचा विजय निश्चित मानला जात होता. अखेरीस मोठ्या फरकाने त्यांनी पोटनिवडणुकीत बाजी मारत राहुरीतील राजकारणात भाजपचा झेंडा पुन्हा फडकवला आहे.

## २०२९ ला मुख्यमंत्री ठरवण्यात माझा सिंहाचा वाटा असेल

**पुणे (दै. संध्या)**



बारामती पोट निवडणुकीच्या जाहीर झालेल्या निकालात राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी ऐतिहासिक विजय मिळवत आपला गड यशस्वीपणे राखला असून, या निवडणुकीत नशीब आजमावणाऱ्या 23 उमेदवारांपैकी चर्चेत असलेले अभिजित बिचुकले यांना मात्र पुन्हा एकदा पराभवाचा धक्का बसला आहे. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीमुळे नेहमीच चर्चेत राहणाऱ्या बिचुकले यांनी या पराभवानंतरही हार न मानता, 2029 ची निवडणूक साताऱ्यातून लढवणार असल्याचा निर्धार ठामपणे व्यक्त केला आहे. अभिजीत बिचुकले म्हणाले, शर्यत अजून संपलेली नाही, कारण मी अजून जिंकलो नाही. येणाऱ्या काळात महाराष्ट्र राज्याचे भवितव्य ठरवण्याचा, संपूर्ण लोकशाहीच्या माध्यमातून अधिकार मी माझ्या जवळ घेणार आहे. 2029 ची जी काही निवडणूक असेल, महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री ठरवताना, माझी भूमिका सिंहाचा वाटा असेल. मला मतं कमी पडत आहेत, याचं कारण लोक अजून जागृत झालेली नाही. आजच्या निवडणुकांमध्ये पैशाचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. त्यामुळे आमच्यासारखे प्रामाणिक आणि सर्वसामान्य नेते मागे पडतात. यासाठी लोकांमध्ये जनजागृती होणे अत्यंत गरजेचे आहे. मी जर बारामतीत प्रचार केला असता, तर निकाल निश्चितच वेगळा लागला असता. मात्र, अजित पवार यांना श्रध्दांजली म्हणून मी त्या ठिकाणी गेलो सुद्धा नाही,' असे अभिजीत बिचुकले यांनी स्पष्ट केले. पुढे ते म्हणाले, माझे दादांनी कधी वाईट नाही केले. ना कधी भलेही केले. दादांवर माझे प्रेम होते. दादांचेही माझ्यावर प्रेम होते. प्रेमापोटी प्रचार केला नाही, दादा मला कविराज म्हणायचे. आतापर्यंत मी 12हून अधिक निवडणूक लढवली.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

## ढिंग-टांग




## पंढरपूरचा कायापालट होणार! ४१५० कोटींचा मास्टर प्लान


**पंढरपूर (दै. संध्या)**



वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपूर तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या शिखर समितीच्या बैठकीत 4150.46 कोटी रुपयांच्या सर्वसमावेशक आराखड्यास आज मान्यता देण्यात आली. विशेष म्हणजे ही सर्व विकासकामे येत्या 30 महिन्यात पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिले आहेत. मंत्रालयात झालेल्या या महत्वपूर्ण बैठकीस उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, वनमंत्री गणेश नाईक, ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान अवताडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पंढरपूर हे केवळ धार्मिक केंद्र नसून महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव आहे. दरवर्षी आषाढी-कार्तिकी वारीसाठी येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेता, पुढील ५० वर्षांच्या गरजांचा विचार करून हा आराखडा तयार करण्यात आला आहे. भाविकांना स्वच्छ, सुरक्षित आणि आध्यात्मिकदृष्ट्या समृद्ध अनुभव मिळावा, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. सोलापूर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी बैठकीत सादर केलेल्या प्रस्तावानुसार गर्दी व्यवस्थापनासाठी कॉरिडॉर उभारणी, पुरातन मंदिर व मठांचे जतन-संवर्धन, बाधितांना व्यावसायिक संधी आणि वारकऱ्यांसाठी समग्र सुविधा विकास यासाठी 735.80 कोटी रुपयांचा आराखडा मांडण्यात आला. तसेच नगर प्रदक्षिणा मार्ग विकास, नदी घाट सुशोभीकरण, वाहनतळ व व्यापारी संकुल, शहर सुशोभीकरण, रस्ते व पूल आणि पालखी तळांच्या विकासासाठी 1387.91 कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला.

## त्याच ठिकाणी त्याला ठेचून मारा : आरोपीची बायको संतप्त

**मुंबई (दै. संध्या)**



पुण्याच्या भोर तालुक्यातील नसरापूर गावात चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करून हत्या केल्याची घटना घडल्यानंतर या घटनेतील आरोपीचे कुटुंबीय पहिल्यांदाच कॅमेऱ्यासमोर आलेत. गेल्या दोन दिवस सुरू असलेल्या बातम्यानंतर त्याच्या कुटुंबियांनी त्यांची भूमिका मांडण्यासाठी अनेक प्रतिनिधीशी संपर्क केला. त्यानंतर आरोपीला मारून टाका, त्याला त्याच ठिकाणी ठेचून मारा, असे म्हणत आरोपीच्या कुटुंबीयांनी आक्रमक प्रतिक्रिया दिली आहे.

ज्या ठिकाणी चिमुरडीवर अत्याचार झाला आहे. त्याचं ठिकाणी त्याला ठेचून मारलं पाहिजे अशी प्रतिक्रिया देत आरोपीची पत्नी ढसाढसा रडली. तर तो माझा बाप आहे हीच माझी चुकी आहे. त्याला लवकरात लवकर फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी त्याच्या मुलानी केली.

आरोपीची पत्नी म्हणाली की, ज्या ठिकाणी घटना घडली, त्याच ठिकाणी त्याला ठेचून मारलं पाहिजे. मला अकरा नातवंड आहेत. घटना घडल्यापासून मी अन्नपाणी घेत नाही. त्या बाळाचा आत्मा काय म्हणाला असेल? त्या बाळाच्या घरच्यांना, तिच्या आईला काय वाटत असेल? मी पण कुणाची तरी आईच आहे. आमचा आरोपीशी 10 वर्षापासून संपर्क नाही. तो घरी राहत नाही. आम्ही दोघेच मायलेकरं राहतो. 10 वर्षात त्याला आम्ही घरी बोलावण्याचा प्रयत्न केला. पण तो म्हणाला तुझं तू बघ, असं आरोपीची पत्नी म्हणाली.

त्याने 65 वर्षाच्या महिलेवर अत्याचार केले तेव्हा हा मुलगा माझ्या पोटात होता. याआधी त्याच्यावर झालेले अत्याचाराचे आरोप- घटना मला माहिती आहेत. मान्य आहेत. तो मोलमजुरी करून खात होता. तो गावातील इतर महिलांच्या घरात लपून बसून, घरात कुणी नसल्याचं पाहून चाकूचा धाक दाखवून महिलांवर लैंगिक अत्याचार करायचा. या गावकऱ्यांच्या आरोपाबद्दल मला माहिती नाही. तो तसं करत असेल तर मला माहिती नाही. कुठल्या महिलेने सुद्धा माझ्यापर्यंत हे पोहोचवलं नाही, असंही त्यांनी सांगितलं.

गावकऱ्यांनी सांगितल्याप्रमाणे जर त्यानी माझ्या मुलीवर अत्याचार केला असता, तर त्याची तक्रार मी स्वतः केली असती. माझ्या पोरींवर असं झालं असतं तर मी गप बसली असते का? मला सात पोरी आहेत. मी स्वतः गप बसले नसते. मला या गोष्टीचा खूप राग आहे. माझ्या पोरी मोलमजुरी करून पोट भरत होत्या. माझ्या पोरींवर तो अत्याचार करायचा हे गावकऱ्यांचे आरोप चुकीचे आहेत. ते आमची बदनामी करत आहेत. अशी घटना झाली असती तर हे कुठल्या आईला सहन होईल? असा सवाल त्यांनी केला.

बाहेर तो काय करायचा याबद्दल मला माहिती नाही. पण त्याने घरात माझ्या मुलींसोबत काहीही केलेलं नव्हतं. मुलींवर अत्याचार करायचा हा आरोप खोटा आहे. जमीन जुमला विकायचा होता म्हणून त्याच्या थोरल्या भावानं पैसे देऊन त्याला जेलमधून बाहेर काढला. ज्या जागी ह्या चिमुरडीवर अत्याचार झालेला आहे, त्याच ठिकाणी त्याला ठेचून मारलं पाहिजे, असं म्हणतं त्या ढसा ढसा रडल्या. मला वेदना होत आहे. अंगाचा लटपट उडतोय नाव ऐकलं तरी, असंही त्या म्हणाल्या.

आरोपीच्या मुलानेही प्रतिक्रिया व्यक्त केली. तो माझा बाप आहे हीच माझी चुकी आहे. त्याने चिमूरड्यावर केलेल्या अत्याचाराचा मी जाहीर निषेध करतो. त्याला लवकरात लवकर फाशीची शिक्षा करा, असे मी सरकारला आवाहन करतो. मी त्याचा मुलगा आहे हे माझं मोठं दुर्दैव आहे. त्या चिमुरडीला जेवढ्या वेदना झाल्या तेवढ्या वेदना ह्याला झाल्या पाहिजेत. याला लोकांच्या हवाली केले पाहिजे आणि ठेचून मारला पाहिजे, असं आरोपीच्या मुलाने म्हटलंय.

त्याने स्वतःच्या पुतणीवर अत्याचार केला तेव्हा मी नववीत होतो. तेव्हा मला समज होती. तेव्हा आम्हाला घरदार सोडून जावं लागलं होतं. त्यानंतर मला बाप म्हणजे काय माहितीच नाही.

## ब्रेकिंग न्यूज

### मालेगाव-सटाणा शहराचा कायपालट

मुंबई (दै. संध्या) : गेल्या काही दिवसांपासून मालेगाव-सटाणा दरम्यानचा रस्ता चौपदरीकरण करण्यात यावा अशी मागणी केली जात आहे. राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे हे या रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी पाठपुरावा करत आहेत. मालेगाव-सटाणामधील राज्यमार्ग क्रमांक १९ वरील वाहतूक प्रचंड वाढली आहे. त्यामुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी होत असते. तसेच अपघाताच्या घटना वारंवार घडत असतात. गेल्या काही वर्षांत या मार्गावरील वाहनांची संख्या प्रचंड वाढली आहे. पण रस्त्याच्या अरुंद स्वरूपामुळे येथे वाहतूक कोंडीची समस्या कायम निर्माण होत असते, त्यामुळे या मार्गाचा विस्तार झाला पाहिजे अशी मागणी केली जातेय. मंत्री दादाजी भुसे यांनी पुन्हा या मागणीचा पाठपुरावा सुरू केला आहे. मालेगाव ते सटाणामधील सुमारे ३९ किलोमीटर अंतराच्या या रस्त्याचे काँक्रीटीकरणासह चौपदरीकरण तातडीने मंजूर करण्यात यावे, असा आग्रह त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे धरला आहे. या रस्त्याच्या कामासाठी आशियाई विकास बँकेच्या अर्थसहाय्यातून निधी उपलब्ध करून घेण्याबाबतही भुसेंनी मुख्यमंत्र्यांना साकडे घातले आहे.

## भाजपचा विजय घुसखोरी अन् हल्ल्यांपासून वाचवणारा : मुख्यमंत्री

# बंगालमध्ये परिवर्तन नव्हे तर महापरिवर्तन



**कितीही अत्याचार केला तरी भाजपचा कार्यकर्ता थांबणार नाही**

या भारताला सुरक्षित ठेवण्यासाठी बंगालमध्ये भाजपच्या कार्यकर्त्यांनी जीवाचे बलिदान दिले. आमच्या कार्यकर्त्यांचे डोळे फोडले, जाळून टाकले, कितीही अत्याचार केला तरी भाजपचा कार्यकर्ता थांबणार नाही हे दाखवणारा हा विजय आहे. आसाममध्ये जेव्हापासून भाजपचे सरकार आले तेव्हापासून तिथली आतंकवादी गतिविधी थांबली. एकट्या भाजपला आसाममध्ये बहुमत मिळाले आहे, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**मुंबई (दै. संध्या)**

आज पश्चिमन बंगाल, तामिळनाडू, केरळ आणि आसामच्या निवडणुकांची मतमोजणी सुरू आहे. यात पश्चिम बंगालमध्ये भाजपचा विजय होताना दिसत आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया देत आनंद व्यक्त केला आहे. तसेच बंगालच्या जनतेने दीदींना दाखवून दिले की बंगालचा खरा पक्ष कोणता आहे, असे म्हणत ममता बॅनर्जी यांना टोला लगावला आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी जेव्हा बंगालमध्ये गेलो होतो तिथल्या एका पत्रकाराने मला विचारले की ममता बॅनर्जी म्हणतात भाजप आणि त्यांचे नेते हे बंगालच्या बाहेरचे आहेत. बाहेरचे लोक येऊन इथे मत मागतात. यावर तुमचे मत काय? मी त्यांना सांगितले, आमच्या भाजपची निर्मिती ज्यांनी केली ते शामाप्रसाद मुखर्जीच बंगालचे आहेत. त्यामुळे खरा बंगालचा जर कुठला पक्ष असेल तर तो भारतीय जनता पक्ष आहे. आणि आज बंगालच्या जनतेने दीदींना दाखवून दिले की बंगालचा खरा पक्ष कोणता आहे. बंगालच्या लोकांनी ज्याप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विश्वास ठेऊन नुसते परिवर्तन केले नाही, तर महापरिवर्तन केले आहे. पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, बंगाल असेल, आसाम असेल पुडूचेरी असेल हा विजय भारतातल्या जनतेचा मोदीजींवर असलेल्या विश्वासाचा विजय आहे. जनतेला एकच गोष्ट माहीत आहे आणि ती गोष्ट म्हणजे 'मोदी है तो मुमकिन है!'. आणि म्हणून बंगालला कुशासनातून बाहेर काढण्याचे काम 30 वर्ष कॉंग्रेस, 36 वर्ष कम्यूनिस्ट आणि या दोघांपेक्षा खतरनाक 15 वर्ष ममता दीदीचे शासन, जो बंगाल देशाची आर्थिक राजधानी होता, या बंगालची अवस्था या सगळ्यांनी मिळून अशी केली की देशात येणारा जो एफडीआय आहे त्यातला अर्धा सुद्धा तिकडे जात नाही. बंगालमधून अनेक मोठे उद्योग निघून गेले. तिथे जंगलराज निर्माण झाले होते. त्यात माननीय मोदी यांनी बंगालचे जे व्हीजन मांडले आणि बंगालच्या जनतेत आशेचा किरण निर्माण केला.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, बंगालच्या जनतेला विकासकामे बघून विश्वास बसला आणि जर कोणी परिवर्तन घडवून आणू शकते तर ते फक्त मोदी आहेत. तो विश्वास जनतेने आज मतपेटीत दाखवला आहे. बंगालचा विजय केवळ एका राज्याचा विजय नाही. हा विजय भारतात होणारी घुसखोरी, भारतात होणारे हल्ले या सगळ्या गोष्टींपासून वाचवणारा हा विजय आहे. ज्या प्रकारे ममता दीदींच्या नेतृत्वातील सरकार बांगलादेशमधून घुसखोरी आणायचे, त्यांचे कागदपत्र तयार करून विविध राज्यांमध्ये पाठवायचे.

## आसाममध्ये काँग्रेसला मोठा धक्का! प्रदेशाध्यक्षाचा दारुण पराभव



**मुंबई (दै. संध्या)**

आसाम विधानसभा निवडणुकीच्या निकालांमध्ये मोठी उलथापालथ पाहायला मिळाली आहे. आसाममधील हायप्रोफाईल जोरहाट जागेचा निकाल जाहीर झाला असून, येथे काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. आसाम काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष गौरव गोगोई यांना या निवडणुकीत पराभवाचा सामना करावा लागला आहे. भाजप उमेदवार हितेंद्र नाथ गोस्वामी यांनी त्यांचा पराभव केला आहे. भाजप नेते हितेंद्र नाथ गोस्वामी यांनी या जागेवर सुमारे २०,००० मतांच्या मोठ्या फरकाने विजय मिळवला आहे. आसाम काँग्रेसचे अध्यक्ष गौरव गोगोई यांचा त्यांच्या निकटच्या प्रतिस्पर्ध्याने, म्हणजेच भाजपच्या हितेंद्रनाथ गोस्वामी यांनी पराभव केला. विशेष म्हणजे, गौरव गोगोई यांनी पहिल्यांदाच विधानसभा निवडणूक लढवली होती, तर गोस्वामी हे पाच वेळा आमदार राहिले आहेत. गोस्वामी यांनी यापूर्वी तीनदा आसाम गण परिषद (AGP) कडून आणि दोनदा भाजपकडून या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले आहे. भाजपच्या तिकिटावर सलग तिसऱ्यांदा त्यांनी विजय मिळवला आहे. आसाममधील सर्व १२६ विधानसभा जागांसाठी ९ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान झाले होते. विशेष म्हणजे गौरव गोगोई हे जोरहाटचे खासदार आहेत. त्यामुळे ही जागा त्यांच्यासाठी अत्यंत प्रतिष्ठेची होती. अहोम समुदायाचा बालेकिल्ला असलेल्या या जागेकडे २०२६ च्या निवडणुकीतील सर्वात महत्वाची रणभूमी म्हणून पाहिले जात होते. काँग्रेसमधील आपले नेतृत्व सिद्ध करण्यासाठी आणि मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखालील भाजपला तगडे आव्हान देण्यासाठी ही जागा जिंकणे गोगोईंसाठी अनिवार्य होते. मात्र, या पराभवामुळे गौरव गोगोई आणि काँग्रेसच्या रणनीतीला मोठा तडा गेल्याचे मानले जात आहे.

## संपादकीय

# डिजिटल साधनांचा अतिवापर

डिजिटल साधनांचा अतिवापर झाल्यानं विद्यार्थ्यांच्या वाचन-लेखन कौशल्यांमध्ये घसरण होत असल्याने अनेक शाळांत लॅपटॉपऐवजी पाठ्यपुस्तकं, छापलेल्या नोट्स आणि हस्तलिखित सराव यावर भर दिला जातो आहे.

आजचा जमाना सोशल मीडियाचा आहे; लोक आता वाचत नाहीत, रील्स बनवतात. त्यामुळे मराठी प्रकाशन व्यवसायाने आधुनिकतेची कास धरून बदल घडवले पाहिजेत,' केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी दिल्लीत अलीकडं दिलेला हा सल्ला. गडकरींनी सांगितलं त्यात वाचन संस्कृती लोप पावत असल्याबद्दलची जाणीव आणि पुढचा रस्ता कोणता असावा या गोष्टींचंही प्रतिबिंब उमटलं आहे. कालच झालेल्या महाराष्ट्र दिनाच्या निमित्तानं, आजकाल मुलं प्रत्यक्ष पुस्तक हाती धरून वाचनापासून दूर जात असल्याची जी भीती आहे तिला भिडावं लागेल. रोजचा पेपर वाचण्याची सवय मुलांना लावणं ही पुस्तक वाचनाकडे वळण्याची पहिली पायरी ठरू शकते. आज घरातली मुलं किंवा तरुणांना रोज एक तरी वर्तमानपत्र वाचण्याची सवय लावणं अत्यंत गरजेचं आहे. कारण त्यामुळं मेंदूला चालना मिळण्याची जी प्रक्रिया असते ती प्रक्रिया पॉडकास्ट किंवा व्हिडीओमध्ये इतक्या सहजासहजी मिळत नाही, असं सांगितलं जातं. वाचनामुळं विचार करण्याची क्षमता विकसित होते. एखाद्या विषयावर स्वतःचं मत तयार करण्यासाठी सतत वाचन आवश्यक. कोणत्याही लोकशाहीसाठीही ते अत्यंत आवश्यक ठरतं कारण सजग नागरिक घडवण्याचा पाया हा वाचनातच असतो. आज अनेक तरुणांची शब्दसंपदा मर्यादित होत चालली आहे. दैनंदिन संभाषणात मोजकेच शब्द वापरले जातात. आपण वर्तमानपत्र वाचतो, तेव्हा एकाच भावनेसाठी किती वेगवेगळे शब्द वापरले जाऊ शकतात, हेही समजतं. व्याकरण सुधारतं, अभिव्यक्ती नेमकी होते आणि विचार अधिक स्पष्ट होतात हे फायदे तर आहेतच. आज तरुण- प्रौढ व्हिडिओ, रील्स, शॉर्ट कंटेंट वगैरे पाहायला तयार आहेत. पण वाचायला तयार नाहीत. ग्रंथालयं हळूहळू ओस पडत आहेत याचं एक उदाहरण दिल्लीत राष्ट्रीय नाट्य विद्यालयाच्या आवारातून स्थलांतरित झालेल्या तुलसी वाचनालयाचं देता येईल. संगणक-मोबाइल आल्यावर आपलं हातानं लिहिणंही कमी झाल्याचं सांगणारे अनेक संपादकही भेटतात. नकळत्या वयातच हाती मोबाइल येणारी पुढील पिढी कदाचित आपलीच स्वाक्षरी करणंही विसरेल, असंही गंमतीनं म्हटलं जातं. जेन झी, अल्फा, बीटा वगैरे युवा पिढ्याच नव्हे तर आपल्यातले अनेकजण खरंच वाचनापासून दूर जात आहेत की वाचनाची सवयच एका नव्या रूपात परिवर्तित होत आहे? या संदर्भात एक उत्तर प्रदेश, राजस्थान सरकारांचा अलीकडचा एक आदेश पाहिला पाहिजे. त्यानुसार त्या राज्यांतील सर्व सरकारी शाळांमध्ये रोजचं वर्तमानपत्र वाचूनच कामकाजाची सुरवात होणार आहे. खरंच तसं होत असेल तर हे अतिशय स्तुत्य म्हणावं लागेल. रोजचं वर्तमानपत्र वाचणं म्हणजे फक्त बातम्या जाणून घेणे नसून ते समाजाशी, देशाशी आणि जगाशी जोडलं जाणं असंही सांगितलं जातं. अर्थात आजकाल वर्तमानपत्र `खऱ्या अर्थानं किती जण वाचतात हाही- संशोधनाचा विषय ठरावा. आपण फक्त मथळ्यांवर नजर टाकत साधारणतः आठेक मिनिटांत अख्खा पेपर नजरेखालून घालतो, असं अभिमानानं सांगणारे एक ज्येष्ठ मराठी पत्रकार मध्यंतरी भेटले होते ! जगभरात शिक्षणक्षेत्रात डिजिटल आणि पारंपरिक पद्धती यांच्यात संतुलन साधण्याची वाढती गरज अधोरेखित होते. स्वीडनसारखा डिजिटलदृष्ट्या प्रगत देशाच्या सरकारनं शाळांमध्ये पुस्तकं, वही आणि पेन यांचा वापर वाढवण्यावर भर देण्याचा निर्णय जेमतेम आठवड्याआधी घेतला.

डिजिटल साधनांचा अतिवापर झाल्यानं विद्यार्थ्यांच्या वाचन-लेखन कौशल्यांमध्ये घसरण होत असल्याचं निरीक्षण समोर आल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. अनेक शाळांत लॅपटॉपऐवजी पाठ्यपुस्तकं, छापलेल्या नोट्स आणि हस्तलिखित सराव यावर भर दिला जातो आहे. फिनलंड आणि फ्रान्स यांनी शाळांमध्ये मोबाइल फोनच्या वापरावर निर्बंध घालण्याचे निर्णय घेतले आहेत. जपानमध्ये प्राथमिक शिक्षणात हस्तलिखित लेखन आणि पारंपरिक शिक्षणपद्धतीला अजूनही मोठे महत्त्व दिले जाते.

## संस्कृत सुभाषित

अपमान होई अति परिचये, अनादर तो अति जाण्याते, मलय
पर्वतावरी भिल्ल स्त्री चंदनतरूचे जळण करी ।।
अर्थ – अति परिचयामुळे अपमान होतो, सतत जाण्यामुळे अनादर होतो. जसे मलय पर्वतावरील भिल्लसुंदरी चंदन वृक्षाच्या झाडाचा जळण म्हणून उपयोग करते तशी गत होते. पण जेथे चंदनानीच जंगले भरलेली तेथे सरपणासाठी त्याचा उपयोग होतो, हे अति परिचयामुळेच होते.

## गुरु वचन

### दुसऱ्याच्या दु:खात सहभागी होणे हीच इश्वर सेवा

वाणी, तन, मन, वचन आणि धन जी कोणतीही शक्ती आपल्याजवळ असो. तिच्याद्वारे आपण कुणाचे दु:ख तीळमात्रही कमी केले किंवा त्याच्या दु:खात आपण सहभागी झालो तर ही सर्वात मोठी इश्वर सेवा होय. मानवाच्या प्रवृत्तीत स्वाभाविकरित्या आपल्या सुख–सुविधा पाहण्याचा स्वार्थ निर्माण होतो. उपदेश देणाराही प्रकारान्तर आपल्याला समोर ठेवतो आणि म्हणतो तुम्ही भक्तांचा सन्मान करा. परमेश्वरही आपल्या भक्तांचा सन्मान करतो. व्यक्ती अर्थात आपण भक्त आहोत आणि तुम्ही आमचा सन्मान करा. आपली चर्चा करण्याची पद्धत वेगवेगळी असते. म्हणतात की, ज्ञानप्राप्तीनंतर काहीही करायला नाही पाहिजे. शेवटी तुम्ही समजलात आपण काहीही करु शकत नाहीत तर आपल्या परमेश्वराचे प्रेम मिळाल्यावर कोणी त्याचा निषेध करत नाही तर तुम्ही समजून घ्या की, आपण प्रेमी आहोत. परमेश्वराचे प्रेमी आहोत. हे छळाचे जीवन आहे आणि छळपूर्ण जीवनात दुसऱ्यांचा छळ करणे गुन्हा आहे. निर्णय परमेश्वरच घेतो. परंतु एवढा विश्वासू मात्र आवश्यक आहे की तो प्रेमळ आहे. आपल्याला गुन्ह्याला कमी समजणे हे त्याचे प्रेम आहे. परंतु आपण त्याच्या प्रेमाचा दुरुपयोग करायला नाही पाहिजे. त्याच्या प्रेमावरुन आपण स्वत:ला जनतेसमोर अशाप्रकारे सादर करा की, ते भ्रमात येतील हे स्वत:ला भ्रमात ठेवण्यासारखे आहे. ही गोष्ट मनुष्याने सदैव लक्षात ठेवली पाहिजे की, त्याला आपले भले करायचे असेल तर कुणाचयाही ऐकण्या–बोलण्याने वा कोणत्याही प्रकारच्या वाक्य संयोगाने स्वत:ला जिंकणे आहे. यापेक्षा अधिक ऐकले नाही तर मोठा धोका ठरेल. त्याच्या प्रगतीचे सर्व मार्ग खुंटले जातील आणि कष्ट करण्याची वेळ येऊ लागेल.

## उपदेशकथा

### यशाचे गमक

महान शास्त्रज्ञ न्यूटन बागेत विचार करीत बसला होता. तितक्यात त्याला नोकराने हाक दिली. महाराज ! न्यूटन विचारात दंग होता. नोकराने पुन्हा साद घातली. महाराज ! आता न्यूटनची नजर नोकराकडे वळली तसा तो नोकर म्हणाला, महाराज ! बाहेर एक गृहस्थ आपणाला भेटण्यासाठी आलेत. ते आपणाला काही प्रश्न विचारु इच्छितात. खूप लांबून आलेत. न्यूटन म्हणाला, पाठव त्यांना इकडे. ते गृहस्थ आत आले.

न्यूटनला म्हणाले, क्षमा करा महाराज, मी अडाणी आहे. आपला लौकिक ऐकून आलोय. मला शहाणे व्हायचे आहे. मी काय करु ? न्यूटन म्हणाला, मित्रा, शहाणे होऊन तू काय करणार आहेस ? या प्रश्नावर तो गृहस्थ म्हणाला, मला तुमच्या यशाचे रहस्य जाणून घ्यायचे आहे. त्याचे उत्तर ऐकून न्यूटन म्हणाला, मित्रा ! एकच महामंत्र लक्षात ठेव. मन सैरभैर होऊ देऊ नकोस. तुला हवे ते ज्ञान मिळेल. पण त्यासाठी न चळणारे अवधान धारण करायला शिक. माझ्या यशाचे रहस्य हेच आहे. एकाग्र मनाला काहीही अशक्य नाही.



## पंचांग

पंचांग
५ मे २०२६
मंगळवार
विक्रम संवत्– २०८२
वैशाख शके
संवत्– १९४८
संवत्सर –पराभवनाम
अयन– उत्तरायणारंभ
मास– वैशाख
ऋतु– सौर ग्रीष्म
कृष्ण पक्ष
तिथि:चतुर्थी (अहोरात्र)
नक्षत्र:ज्येष्ठा १२:५४:२५

योग:शिव २४:१५:५६+
करण:बव १८:३७:५७
करण:बालव (अहोरात्र)
सूर्य:मेष
चन्द्र:धनु१२:५४:२५
हिजरी सन् – १४४५
मुस्लिम मास – जिल्काद
तारीख – १८
विशेष
अंगारक संकष्ट चतुर्थी
चंद्रोदय १०.१८
मुंबई २२.१८
अकोला २१.०६

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९३९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | | | 4 | | | | 9 |
| | | 1 | 6 | | 9 | | | |
| 5 | 9 | 2 | | | | | 3 | |
| 1 | | 4 | 9 | 3 | | | 7 | 5 |
| | 5 | | | 7 | | | 4 | |
| 2 | 3 | | | 6 | 4 | 8 | | 1 |
| | 8 | | | | | 5 | 6 | 2 |
| | | | 8 | | 7 | 4 | | |
| 4 | | | | 5 | | | | 7 |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९३८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 9 | 1 | 6 | 2 | 3 | 5 | 4 | 8 |
| 8 | 3 | 4 | 5 | 1 | 9 | 7 | 2 | 6 |
| 2 | 5 | 6 | 7 | 4 | 8 | 3 | 9 | 1 |
| 4 | 8 | 9 | 2 | 6 | 5 | 1 | 7 | 3 |
| 6 | 1 | 7 | 9 | 3 | 4 | 2 | 8 | 5 |
| 5 | 2 | 3 | 8 | 7 | 1 | 9 | 6 | 4 |
| 1 | 4 | 2 | 3 | 9 | 6 | 8 | 5 | 7 |
| 9 | 6 | 5 | 1 | 8 | 7 | 4 | 3 | 2 |
| 3 | 7 | 8 | 4 | 5 | 2 | 6 | 1 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १२६० – कुब्लाई खान मोंगोल सम्राटपदी.
- १६४० – इंग्लंडचा राजा चार्ल्स पहिला याने संसद बरखास्त केली.
- १६४६ – इंग्लंडचा राजा चार्ल्स पहिला याने स्कॉटलंडच्या सैन्यासमोर शरणागती पत्करली.
- १७६२ – रशिया व प्रशियानी सेंट पीटर्सबर्गचा तह केला.
- १८०९ – स्वित्झर्लंडच्या आर्गाउ प्रांताने ज्यू व्यक्तिंना नागरिकत्त्व नाकारले.
- १८३५ – युरोपमध्ये सर्वप्रथम रेल्वे बेल्जियमच्या ब्रसेल्स व मेकेलेन शहरांच्या दरम्यान धावली.

### राष्ट्रीय

- १९४४ – महात्मा गांधींची तुरुंगातून सुटका.
- २००७ – सिन्नरजवळील हरसुले गावातील प्रिमीयर केमिकल एक्सप्लोअर या कंपनीत झालेल्या भीषण स्फोटात २१ मजूर ठार झाले.

### जन्म

- ८६७ – उदा, जपानी सम्राटाचा जन्म.
- १२१० – आल्फोन्सो दुसरा, पोर्तुगालचा राजाचा जन्म.
- १७४७ – लिओपोल्ड दुसरा, पवित्र रोमन सम्राटाचा जन्म.
- १८१८ – कार्ल मार्क्स, जर्मन तत्त्वज्ञानीचा जन्म.
- १९१६ – ज्ञानी झैलसिंग, भारतीय राष्ट्रपती यांचा जन्म.

### निधन

- १०२८ – आल्फोन्सो पाचवा, कॅस्टिलचा राजाचे निधन.
- ११९४ – कॅसिमिर दुसरा, पोलंडचा राजाचे निधन.
- १२१९ – लिओ दुसरा, आर्मेनियाचा राजाचे निधन.
- १३०९ – चार्ल्स दुसरा, नेपल्सचा राजाचे निधन.
- १७०५ – लिओपोल्ड पहिला, पवित्र रोमन सम्राटाचे निधन
- १८२१ – नेपोलियन बोनापार्ट, फ्रांसचा सम्राटाचे निधन.

## : SMS :

1 Larki mujhe bohat tang karti hai, Pata nahi kahan se usko mera number mil gaya. Jab bhi kisi ko call karon beech main aakar kehti hai, Please Recharge Your Account.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३७.२ | २४.५ |
| अहमदनगर | ३६.९ | २३.३ |
| अकोला | ४०.९ | २८.८ |
| अमरावती | ४०.९ | २७.७ |
| बीड | ४२.८ | ३१ |
| भंडारा | ४२.९ | २८.७ |
| बुलढाणा | ३४.७ | २४.६ |
| चंद्रपूर | ४५.२ | ३२.२ |
| चेन्नई | ४७.२ | ३५.१ |
| नवी दिल्ली | ३७.५ | २५.९ |
| धुळे | ३९.५ | २५.५ |
| गोंदिया | ४१.६ | २८.६ |
| जळगाव | ४१.१ | २८.६ |
| कोल्हापूर | ३८.१ | २३.४ |
| लातूर | ३७.५ | २५ |
| मुंबई | ३८.२ | ३४.६ |
| नागपूर | ४१.३ | २६.८ |
| नांदेड | ४०.६ | २६.९ |
| नंदूरबार | ३६.४ | २५.७ |
| नाशिक | ३६.३ | २४.४ |
| पुणे | ३४.९ | २२.४ |
| पंढरपूर | ३९ | २४.९ |
| सातारा | ३७.१ | २१.८ |
| सांगली | ३९.३ | २३.६ |
| सोलापूर | ३९.२ | २६.५ |
| वर्धा | ४२.९ | ३०.६ |



## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पूर्व सकारात्मक व सुविधाजनक स्थिती राहणार आहे.

**वृषभ :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पश्चिम नवीन व्यवसायाचा प्रारंभ कराल. आर्थिक गुंतवणूक फायदेशीर राहील.

**मिथून :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व जमीनीच्या व्यवहार फायदेशीर ठरतील. कायदेशीर प्रकरणे निपटण्यासाठी घाईगडबड करू नका.

**कर्क :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पूर्व नोकरी करणाऱ्यांना कटु अनुभव व अप्रिय परिस्थितीचा सामना करावा लागणार आहे.

**सिंह :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पूर्व योग्य मार्गदर्शन मिळाल्याने यश मिळेल. घरात शुभ कार्य किंवा धार्मिक उत्सव संपन्न होतील. व्यापारात विस्तार होईल.

**कन्या :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा: दक्षिण समाजात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. व्यापार चांगला चालणार आहे.

**तूळ :** शुभ रंग :पिवळा, शुभ दिशा : पश्चिम खूप प्रयत्न केले तरी अत्यल्प लाभ होईल.

**वृश्चिक :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा:दक्षिण प्रतियोगीतेमध्ये भाग घ्या यश मिळेल. वाद असलेले प्रकरणाचा निकाल आपल्या बाजूने लागेल.


**धनू :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: पश्चिम आपल्या अधिकाराचा व कार्यक्षेत्राचा विस्तार होईल. कौटुंबिक वातावरण उत्साह वाढविणारे असणार आहे.

**मकर :** शुभ रंग :गुलाबी,शुभ दिशा:पश्चिम संपत्तीच्या प्रकरणातील अडथळे दूर झाल्याने समाधान मिळेल. व्यक्तिचे सहकार्य मिळेल.

**कुंभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा : पूर्व व्यवसायाचा विस्तार करण्यासंबंधी योजना आखाल तर त्या यशस्वी राहतील. वाचनाची गोडी वाढेल.

**मीन :** शुभ रंग:जांभळा,शुभ दिशा: पूर्व अचानक धनलाभ होईल. कामकाजात व व्यापारातील निर्णय विचारपूर्वक घ्या.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९३९



**आडवे शब्द**
१. कहाणीतील ऐसपैस गाव
८. चर्चा
१२. खून करणे
१३. क्षमाशील
१४. हत्तीचे ओरडणे
१६. सुंदर तरुणी
१८. अटीची भाषा
२१. अजंठ्या जवळची लेणी
२२. नजरेचा तीर
२४. अनभिज्ञ, नवशिका
२६. पूर्ण भरतीची वेळ
२७. गौतम बुद्धाच्या अवशेषावर बांधलेली विशिष्ट आकाराची इमारत
२९. श्रीफळ
३०. उत्तराधिकारी
३३. राजबिंडा, तेजस्वी
३५. लक्ष्मीचे एक नाव
३७. दुर्दशा
३८. यमपुरी
४०. महासर्प
४१. पुत्र (इंग्रजी)
४२. अनुतीर्ण
४४. श्रीमंत, सावकार
४६. तारुण्यातील उथळ उत्साहाचे विशेषण
४८. फुलांमधील गोड रस
५०. मामाची पत्नी
५१. गंध
५२. आणि
५३. नियमित यात्रेस जाणारा
५४. प्रवेशकर देण्याची जागा
५७. सोने
५९. ज्वारीची रोटी
६१. पाकीट, बंद केलेले पत्र
६२. मर्यादा, सीमा
६४. गाणे म्हणणारा
६५. माफी मागणारा
६८. प्रश्न
६९. अफवा
७०. पक्षाघात, अर्धांगवायू
७३. शोध, माग
७४. श्रीरामाची आई
७५. पाण्याचा उसळलेला तरंग
७६. बांबू

**उभे शब्द**
२. धनुष्याच्या दोरीचा आवाज
३. हजार किलो
४. मऊ
५. मजूर, पुरुष
६. रचण्याची क्रिया, रचण्याची मजुरी
७. प्रवासी
८. सापाची एक जात
९. लक्षात येण्याजोगे
१०. फिकीर, काळजी
११. कागदाचे कापून ठेवलेले तुकडे
१४. किंमती सामान
१५. रत्न
१७. मनातील इच्छेचे दमन
१९. मार्गस्थ
२०. खडक
२१. गतिमान
२३. दृष्टादृष्ट
२५. गोलमटोल
२६. सदोदित, नेहमी
२८. उच्च, श्रेष्ठ
३१. गोव्यातील दैवत
३२. दक्षकन्या
३४. युद्धक्षेत्र
३६. आदरसत्कार
३७. पळून जाणे
३८. कुबेराचा सेवक
३९. वाळा
४३. कबूतर
४४. मनाने घेतलेली भीती
४५. कृष्णा नदीचा संगम या नदीशी होतो
४७. चेहरा
४८. थडगे, कबर
४९. शेकशेगडी
५०. धनी
५१. सवाद्य (मिरवणूक)
५५. थेट, सरळ
५६. काळे मीठ
५७. रोख, दृष्टी
५८. श्रीकृष्णाचे एक नाव
५९. हमाल
६०. पद्धत
६२. स्वयंपाकाचे शास्त्र
६३. गंध
६६. मनुष्य
६७. अस्थिर (संपत्ती)
७१. मार्ग, रस्ता
७२. कुबड

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. ९३८ चे उत्तर

आडवे उत्तर : १. अभिनयसम्राट ६.राजवाडा ९.दार ११.गवती १२.मस्तवाल १३.कसम १४.वक्ष १६.कलागत १८.जाड १९.टणक २१.पाचा २३.साईबाबा २५.भरभराट २७.गोदान २९.रव ३१.भार ३२.कवा ३३.जा ३४.नरमाई ३६.दान ३८.रवारास्त ४०.किनरा ४१.वानवसा ४४.रत ४५.सदाशिव ४६.हर ४७.खस ४९.बक ५१.तालेवार ५४.कमतरता ५६.भू ५७.मद ६०.धन ६१.मकरालय ६३.राजकन्या ६५.ताग ६६.अज ६७.याचक ६८.कलकलाट ६९.सोय ७०.कुली ७१.जंगली ७३.वय ७४.पायजमा ७६.आमंत्रण ७७.रीघ ७९.रमणी ८०.नयनबाग ८१.भोकर

उभे उत्तर : १.अर्धवट २.नग ३.यवन ४.सती ५.टपला ६.रास्त ७.जवानी ८.वाल ९.दास १०.रमत १२.मत १३.कडबा १५.क्षणभर १६.कचाट १७.गठ्ठा १८.जाईजुई २०.कर २१.पारावार २२.आदानप्रदान २४.बारदान २६.भक २८.नर ३०.वनराज ३१.भारवाहक ३३.मरातब ३३अ.जास्त ३५.मानवता ३७.घाव ३९.वार ४०.पारवा ४२.नरम ४३.साखर ४८.सतार ५०.कफ ५२.लेखक ५३.रमल ५५.तडक ५८.दयनीय ५९.मग ६०.धनुकली ६१.मजला ६२.रामा ६३.राजकुमार ६४.न्यायालय ६५.ताक ६६.अकलमंद ६९.सोयरीक ७२.गरबा ७४.पाणी ७५.जन ७६.माय ७७.चव ७८.घर

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.



## महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घडली सिंगापूर शैक्षणिक सफर

■ स्वान फाउंडेशन आणि डॉ. अनिलकुमार गायकवाड सामजिक सेवकुंडचा उपक्रम

■ जागतिक संस्कृती, विज्ञान-तंत्रज्ञानाचा अनुभव; महाराष्ट्रातील १३ विद्यार्थ्यांना संधी

पुणे (दै. संध्या)

विद्यार्थ्यांना जागतिक संस्कृती आणि आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देण्याच्या उद्देशाने 'स्वान' (Swan) फाऊंडेशनतर्फे आयोजित सिंगापूर शैक्षणिक व प्रेक्षणीय सहल उत्साहात पार पडली. पाच दिवसांच्या या अभ्यास दौऱ्यात विद्यार्थ्यांनी विविध आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्थळांना भेट देत ज्ञानासोबतच मनोरंजनाचाही आनंद लुटला. सिंगापूर शैक्षणिक सहल पूर्ण करून भारतात परतल्यानंतर विद्यार्थ्यांचा सत्कार एमएसआरडीसी चे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांच्या हस्ते कुसगाव (मिसिंग लिंक प्रकल्प परिसर) येथे करण्यात आला. स्वान सोशल स्टडी अँड रिसर्च फाऊंडेशन आणि डॉ. अनिलकुमार गायकवाड सामाजिक सेवकुंड यांच्या वतीने टेक्नसिंक इनोव्हेशन्स प्रा. लि. आणि चेन सेन्स इंडिया प्रा. लि. यांच्या आर्थिक सहकार्याने ग्रामीण महाराष्ट्रातील १३ गुणवंत विद्यार्थ्यांची या पूर्णतः प्रायोजित सहलीसाठी निवड करण्यात आली होती.

ही निवड 'डॉ. ए. बी. गायकवाड नॉलेज नेस्ट परीक्षा'द्वारे करण्यात आली. इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित या परीक्षेत राज्यभरातील ४,५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी फाउंडेशनचे उपाध्यक्ष अश्विनी कांबळे, सचिव विकास टाकळीकर, सीइओ प्रसादराजे भोपळे, तसेच टेक्सिंक चे अमन पाचगरे आणि चेअरमन गणेश लोरे उपस्थित होते. फाऊंडेशनचे अध्यक्ष शशिकांत कांबळे यांनी सांगितले की, या उपक्रमात इंग्रजी, सेमी-इंग्रजी तसेच जिल्हा परिषद, महानगरपालिका व नगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांचाही समावेश होता. NASA (अमेरिका) येथे १५ विद्यार्थी आणि सिंगापूर येथे १५ विद्यार्थ्यांना नेल्यानंतर, लवकरच ७ विद्यार्थ्यांना United Nations मुख्यालयात Policy Debate साठी घेऊन जाण्याचा मानस आहे."

तसेच त्यांनी जाहीर केले की, Knowledge Nest Examination 2026 लवकरच आयोजित करण्यात येणार असून, त्यातून निवडलेल्या ३० विद्यार्थ्यांना अमेरिका, सिंगापूर आणि UN येथे शैक्षणिक सहलीसाठी नेण्यात येईल.

# डॉ. रवींद्र भोळे यांचे त्यागम निष्काम कर्मयोगी कार्य स्फूर्तीदायक

पुणे (दै. संध्या)



वरकरणी सर्वसामान्य वाटणारे परंतु सेवाव्रती कर्मशिल्पी कार्यकर्त्यांचा एवढा मोठ्या स्तरावर सत्कार, पुरस्कार करणे ही साधी गोष्ट निश्चितच नाही. पुरस्कारामुळे प्रेरणा प्रोत्साहन मिळते व प्रेरणेमुळे राष्ट्र घडते. समाजाप्रती काहीतरी देणे आहे ही भावना प्रत्येकाने जपून प्रत्यक्षात आचरणात आणली पाहिजे. त्यागमय समर्पित कार्य करून डॉ.मणीभाई देसाईंच्या जयंतीदिनी प्रेरणा देण्याचे स्फूर्तीदायक कार्य समाजसेवक डॉ.रवींद्र भोळे करीत आहे. त्यांनी स्वतःचा विचार न करता समाजाचा विचार करून निष्काम कर्मयोगी कार्य केलेली आहेत. डॉ.रवींद्र भोळे यांचे त्यागमय निष्काम कर्मयोगी कार्य स्फूर्तीदायक आहे असे मत खादी आणि ग्रामोद्योग मंत्री स्वतंत्र कार्यभार मंत्रालय मुंबई रवींद्र साठे यांनी येथे व्यक्त केले. मॅगसेस अवॉर्ड विनर पद्मश्री डॉ. मणीभाई देसाई यांच्या एकशे सहाव्या जयंती निमित्ताने येथे राष्ट्रीय व राज्यस्तरीय कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. पद्मश्री डॉ. मणी भाई देसाई प्रतिष्ठान क्रीडा मंत्रालय, नीती आयोग, एम एस एम इ उद्यम मंत्रालय भारत सरकार सलग्नित संस्थेच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पद्मश्री डॉ मणी भाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार समारंभात मार्गदर्शन करताना ना.रवींद्र साठे यांनी वरील मत व्यक्त केले. याप्रसंगी व्यासपीठावर ममता यशवंत पाटील, रमेश सुरुंग, डॉ. भावार्थ देखणे, कृष्णा त्र्यंबक खडसे, जयश्री पुरुषोत्तम पाटील, विजय वासुदेव खर्चे,

डॉ हरी निवृत्ती पाटील, प्रमोद सूर्यवंशी, सुभाष कट्यारमल, रुपेश ताओरी, बापुराव बबन चौधरी, फकीरा भगवान राजगुरु, प्रा दिलीप चौधरी हे व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाराष्ट्र लेवा महासंघाचे उपाध्यक्ष विकास वारके हे होते. या कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री कै. अजित पवार, कै दिनकरराव भोळे, कै.शंतनु गटने, स्व.तुकाराम रावबा मदने यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ह्या वेळी संस्थेचे अध्यक्ष ज्येष्ठ समाजसेवक, समाज सुधारक प्रवचनकार अपंगसेवक डॉ.रवींद्र भोळे यांनी प्रास्ताविकात सांगितले की गीतेतील अध्याय दोन मधील सत्तेचाळीसाव्या श्लोकानुसार पद्मश्री मणीभाई देसाई जीवन जगले. कर्मफलाची अपेक्षा न करता त्यांनी जीवन पर निष्काम कर्मयोग केला. तसेच गीतेतील अध्याय अठराव्या

अध्यायातील तिसऱ्या श्लोकानुसार त्यांनी जीवनभर आचरण केले. या अध्यायात भगवान श्रीकृष्णाने भक्तांना मार्गदर्शन केलेले आहे की प्रत्येकाने जीवनामध्ये यज्ञ, दान, तप, कर्म करणे जीवनामध्ये अत्यंत महत्त्वाचे आहे. ह्याच श्लोकानुसार पद्मश्री डॉ. मनीभाई देसाई जीवन जगले त्यांनी दुग्धोत्पादन, निसर्गोपचार, पर्यावरण, कृत्रिम गो पैदास, सामाजिक सांस्कृतिक, धार्मिक,शैक्षणिक, इत्यादी क्षेत्रांमध्ये समर्पित भावनेने महत्त्वपूर्ण कार्य करून यज्ञ ,दान, तप, कर्म साध्य केले, मनीभाईजींनी निष्काम कर्मयोग साधला ,कर्मफलाचा त्याग केला असे मत जेष्ठ समाजसेवक डॉ.रवींद्र भोळे यांनी येथे व्यक्त केले. डॉ.मणी भाई देसाई जयंती म्हणजे विभूती पूजा आहे आणि ह्या विभूती पूजेचा प्रसाद म्हणजे हा पुरस्कार आहे असे ते म्हणाले. गेली तीस वर्षापासून हा महायज्ञ सुरू आहे. याप्रसंगी पद्मश्री डॉ. मणीभाई देसाई राष्ट्रीय पुरस्कार वितरण समारंभाचे वितरण प्रमुख पाहुण्यांचे हस्ते झाले. डॉ. भावार्थ रामचंद्र देखणे, विजय वासुदेव खर्चे, मुरलीधर खर्चे, हरी प्रल्हाद बढे, जितेंद्र बच्चन, बापुराव बबन चौधरी, शिवराज साने, रीना देशमुख, जयश्री पुरुषोत्तम पाटील, रुपेश ताओरी, फकीरा भगवान राजगुरु, विद्याताई यादव, डॉ. लक्ष्मण माधवराव शिवनेकर, रश्मी नरेंद्र जोशी, डॉ.स्मिता विनायक सहस्रबुद्धे, प्रदीप श्रीकृष्ण पुराणिक, रज्जाक शेख, अहमद किरण शेख, किरण लक्ष्मण तोडकर, विजया कौतिक जंगले, नीता यशवंत वायकोळे, दिलीप गोविंदराव डहाके, भाग्यश्री पवन कट्यारमल, अर्चना शशिकांत धूरदेव, आरती शशिकांत गाडेकर, चंद्रकांत प्यारे, दत्ता श्रावण खंदारे, राम मिस्त्री, धनेश्वर पतंगराव भोस, हे म्हणता प्रतीक गीते, सरोज प्रभाकर आल्हाट, विवेक भागचंद्र शेलार, खेमगर वसंत बाळू, रेणुका रवींद्र पातारे, शहाजी भिकाजी शेळके, संतोष शेरकर, विठ्ठल महाराज खेडकर, समीर निंभोरे अंकुश तुकाराम भोरडे, वैद्य उद्धव ज्ञानदेव साळुंखे सत्तर सामाजिक कार्यकर्त्यांना पद्मश्री डॉक्टर मनिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार प्रदान करण्यात आले. स्मृतिचिन्ह सन्मानपत्र शाल व पुष्पगुच्छ असेच पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी अंकुश दळवी, प्रफुल्ल झोपे, सौ किरण पाचपांडे, नॉर्मल नॉटन, एकनाथ धनवट, नितीन पारकर, नाना डोंगरे, या कार्यकर्त्यांनी व्यवस्थापन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एल.डी साळवे सर यांनी केले. आभार प्रदर्शन सुभाष कट्यारमल सर यांनी आपल्या सुमधुर स्वरात केले. शेवटी पसायदान होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. हा कार्यक्रम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक सभागृह टिंबर मार्केट येथे संपन्न झाला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### गझल-गीतांतून उलगडली महामानवांची महती

■ 'रथ भीमाचा हा पुढे नेऊ' कार्यक्रमातून गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कलाकारांची मानवंदना

पुणे (दैनिक संध्या) : बुद्ध पौर्णिमेनिमित्त 'विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक समिती'तर्फे आयोजित 'बुद्ध धम्म संध्या' कार्यक्रमात गझल व गीतांच्या माध्यमातून तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रभावी मांडणी करण्यात आली. पुणे विद्यापीठातील तथागत गौतम बुद्ध विहार येथे झालेल्या या कार्यक्रमाला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. "वंदितो तुला मी गौतमा", "मुक्ती दिन हा मानवतेचा", "सांगा बहुजनास आता संपला वनवास", "चंदन वृक्ष समान होता भीमराव" अशा गीतांमधून कलाकारांनी महामानवांच्या कार्याचा आणि मानवतेच्या संदेशाचा सुरेल आविष्कार सादर केला. ज्येष्ठ गझल गायक अशोक गायकवाड यांनी आपल्या सहकाऱ्यांसह गीत-गझलांच्या माध्यमातून बुद्धांच्या करुणा व आंबेडकरांच्या समानतेच्या विचारांचा प्रभावी संदेश दिला. कार्यक्रमाची सुरुवात "तथागत तुझा धम्म आचरणी" या गीताने झाली. त्यानंतर "हृदयी वसे माझ्या बुद्ध पिंपळाचा पार", "भीमा तुझ्या कृपेने जगणे झाले सोपे", "अंधारमय नभात उजळून भीम गेला" यांसारख्या गीतांनी वातावरण भारावून गेले. "भीमा सारखा हिरा अलौकिक जगात दुसरा कोणीच नाही" या ओळींनी रसिकांची दाद मिळवली. या कार्यक्रमाला समितीचे अध्यक्ष व उपमहापौर परशुराम वाडेकर, माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, संत गाडगेबाबा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण, नगरसेवक सनी निम्हण आदी मान्यवर उपस्थित होते. संगीतसाथ निखिल वाघमारे (तबला), श्याम चंदनशिव (ढोलक), अवधूत धायगुडे (साईड रिदम), अमोल मांढरे (कीबोर्ड), अझरुद्दीन शेख (बासरी) व रुपेश मोरे (हार्मोनियम) यांनी केली. धम्मचारिणी गुणमेघा यांनी निवेदन, तर दीपक म्हस्के यांनी सूत्रसंचालन केले. महोत्सवाच्या निमित्ताने अशोक गायकवाड म्हणाले की, "महाराष्ट्रात अनेक राजकारणी आहेत; मात्र तथागत गौतम बुद्धांविषयी प्रेम, करुणा आणि आस्था जपणारे परशुराम वाडेकर यांचे कार्य वेगळेपणाने उठून दिसते.

## ४ वर्षांच्या मुलीवर द्विपक्षीय कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वी

पुणे (दै. संध्या)



Jupiter Hospital Pune येथे ४ वर्षांच्या मुलीवर अत्याधुनिक द्विपक्षीय (बायलेट्रल) कॉक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली असून, श्रवणशक्ती पुनर्संचयित करण्याच्या दृष्टीने हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. रुग्णकेंद्रित आणि प्रगत आरोग्यसेवेच्या दिशेने उचललेले हे मोठे पाऊल आहे. ही शस्त्रक्रिया प्रख्यात ईएनटी तज्ञ Dr. Colonel Inderdeep Singh आणि Dr. Sumitpal Bhatti यांनी अत्यंत यशस्वीपणे पार पाडली. तीव्र श्रवणदोष असलेल्या या बालरुग्णामध्ये उपचारानंतर लक्षणीय सुधारणा दिसून आली आहे. डॉ. कर्नल इंदरदीप सिंग म्हणाले, "नेक्सा इम्प्लांट भविष्यात नवीन बाह्य प्रोसेसरसोबत सहज अपग्रेड करता येते, ज्यामुळे अधिक समृद्ध श्रवण अनुभव मिळू शकतो. यामध्ये समाविष्ट असलेली इंटिग्रेटेड चिप क्लिनिकल डेटा साठवते आणि सतत निरीक्षण सुलभ करते. स्मार्ट नेव्हिगेशन सिस्टिमच्या सहाय्याने शस्त्रक्रिया केल्यामुळे इलेक्ट्रोडची अचूक बसवणी सुनिश्चित करण्यात आली."

## "जैन युथ पॉवर" लीग क्रिकेट स्पर्धेचे भव्य खेळाडू लिलाव संपन्न"

पुणे (दै. संध्या)



जैन समाजातील तरुणांना एकत्र आणण्याच्या आणि त्यांच्यामध्ये खिलाडीवृत्ती, नेतृत्व व संघटन कौशल्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने, " जैन युथ पॉवर " तर्फे आयोजित " जैन युथ पॉवर लीग " क्रिकेट सामन्यासाठीचा भव्य खेळाडू लिलाव पुणे येथील गंगाधाम येथील जय जिनेंद्र गार्डन येथे यशस्वीरित्या पार पडला. कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक आणि प्रमुख पाहुणे, राठोड ज्वेलर्स संस्थेचे अध्यक्ष नरेश राठोड व त्यांच्या कुटुंबीयांचा संस्थेचे प्रमुख अचल जैन आणि हरेश शाह यांच्या हस्ते पगडी आणि ढोलांच्या गजरात भव्य स्वागत व सत्कार करण्यात आले. या स्पर्धेत, महिलांच्या गटासाठी प्रत्येकी आठ खेळाडूंचे आठ संघ आणि पुरुषांच्या गटासाठी प्रत्येकी १२ खेळाडूंचे १६ संघ निवडण्यात आले. समाजाच्या व्यासपीठावर इतक्या मोठ्या प्रमाणावर आयोजित केलेल्या या अनोख्या कार्यक्रमाने तरुणांमध्ये प्रचंड उत्साह आणि ऊर्जा निर्माण केली.

या कार्यक्रमाला जैन सोशल ग्रुपचे वीरेंद्र शाह आणि दिलीप मेहता, महासंघाचे ललित गुंडेशा, किशोर जैन, सतीश शाह, संपत जैन, विजय राठोड, भद्रेश बाफना, काँग्रेस पक्षाचे अभय छाजेड, भरत सुराणा, तसेच मिलिंद फडके, नरेंद्र रामसिना आणि चिराग दोशी यांच्यासह इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. संस्थेचे ज्येष्ठ सदस्य अचल जैन आणि नरेश राठोड यांच्या हस्ते संस्थेच्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले. राष्ट्रगीत आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात आली. या कार्यक्रमात युवकांचा सहभाग, खिलाडीवृत्ती आणि सामाजिक ऐक्य यांचा एक उल्लेखनीय संगम दिसून आला.

समिती सदस्य हरेश शाह, समीर जैन, नितीन जैन, शैलेश छाजेड, गौरव ओसवाल, धीरज शाह, कुणाल, गौतम छाजेड, ललित ओसवाल, हर्षद रामसिना, जितेंद्र जैन, पंकज जैन आणि मयूर जैन यांच्यासह संपूर्ण टीमने या यशस्वी कार्यक्रमात महत्त्वपूर्ण योगदान दिले. जैन युथ पॉवरतर्फे आयोजित आगामी क्रिकेट महाकुंभ २३ आणि २४ मे रोजी पुणे येथील जय जिनेंद्र क्रिकेट मैदानावर होणार असून, यामध्ये समाजातील तरुण मोठ्या उत्साहाने सहभागी होतील.

# सोनालिका : १६,२२३ ट्रॅक्टर विक्रीसह ३५.६% वाढ

पुणे (दै. संध्या)




भारतातील नंबर १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर्सने एप्रिल महिन्यात आजपर्यंतची सर्वाधिक एकूण १६,२२३ ट्रॅक्टरची विक्री करून आर्थिक वर्ष २०२७ च्या प्रवासाची जोरदार आणि धोरणात्मक सुरुवात केली आहे. या उद्योगातील बाजारपेठेचा सर्वाधिक वाटा मिळविणाऱ्यांमध्ये तिने प्रमुख स्थान मिळवले आहे. यासाठी तिच्या स्तंभित करेल अशा ३५.६ % एकंदर वाढीची चालना मिळाली असून तिने उद्योगाच्या २७% (अंदाजे) वाढीच्या कामगिरीलाही मागे टाकले आहे.

कंपनीची आपल्या ३० व्या वर्षात 'जीतने का दम' मिळवून देण्याच्या शेतकरी-प्रथम तत्त्वज्ञानावर निर्भरता कायम असून अधिक शेतकरी कार्यक्षमता आणि उत्पन्न क्षमतेसाठी प्रगत कृषी-नवकल्पनांचा तिला आधार मिळाला आहे.

अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन आणि जीएसटीच्या दरात कपात झाल्यानंतर वाढत्या यांत्रिकीकरणामुळे, भारताच्या शेती क्षेत्राच्या वाढीच्या गाथेचा पुढील टप्पा तंत्रज्ञानावर आधारित उत्पादन पोर्टफोलिओ आणि अंमलबजावणीचा अथक वेग यांवर अवलंबून असेल. हवामानातील अस्थिरता आणि वाढत्या कामगिरीच्या अपेक्षांमुळे ग्रामीण भागातील आकांक्षा आकाराला येत आहेत. अशा वेळेस सोनालिका १९ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांसाठी एक विश्वासार्ह भागीदार म्हणून उभी आहे. आपले उच्च गुणवत्तेचे ट्रॅक्टर सर्व प्रकारच्या वापरांमध्ये अखंडपणे कामगिरी करतील याची हमी ती देते. जगातील सर्वात मोठा इंटिग्रेटेड ट्रॅक्टर उत्पादक कारखाना आणि प्रगत संशोधन आणि विकास क्षमतांचे पाठबळ लाभलेला हा ब्रँड शक्तिशाली आणि भविष्यवेधी उत्पादनांसह भारतीय शेतीच्या परिवर्तनाचे नेतृत्व करत आहे.

या प्रसंगी बोलताना इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडचे सहव्यवस्थापकीय संचालक रमण मित्तल म्हणाले, "'आमच्या ऐतिहासिक ३० व्या वर्षात, एप्रिल महिन्यातील १६,२२३ ट्रॅक्टर विक्रीची आमची सर्वोच्च कामगिरी ही तंत्रज्ञानावर आधारित शेतीकडे वळण्याचे संकेत देत आहे. शेतकऱ्यांना जीतने का दम मिळवून देण्याच्या आणखी अधिकच कटिबद्धतेसह आम्ही आर्थिक वर्ष २०२७ च्या प्रवासाला सुरूवात करत आहोत. आम्ही ३५.६% ची दमदार वाढ नोंदवून उद्योगाच्या कामगिरीवरही मात केली आहे आणि उद्योगातील बाजारपेठेचा सर्वाधिक वाटा मिळविणाऱ्यांमध्ये आम्ही प्रमुख स्थानी उभे आहोत.

आर्थिक वर्ष २०२७ साठी आम्ही जी गती मिळवत आहोत ती भारताच्या कृषी परिवर्तनामध्ये तीव्र नवकल्पना निर्माण करण्यावर आणि शेतकऱ्यांशी अधिक सखोल संपर्क साधण्यावर केंद्रित आहे. शेतीचे भवितव्य हे पूर्वीपेक्षा अधिक ठळक असणार असून आम्ही अधिक तीव्रपणे लक्ष केंद्रित करून, गोल्ड सिरीज सारख्या भविष्यवेधी उत्पादनांसह आणि भारतीय शेतकऱ्यांच्या आकांक्षांना बळ देण्यासाठी अढळ कटिबद्धतेसह तयार आहोत."

## गायनातून भाव व्यक्त होणे अत्यावश्यक : पं. उपेंद्र भट

पुणे (दै. संध्या)




गायन करताना केवळ इतरांचे अनुकरण करून गाणे सादर करणे पुरेसे नसून, गाण्यांतील भाव समजून ते श्रोत्यांच्या मनापर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांचे पट्टशिष्य व ख्यातनाम शास्त्रीय गायक पं. उपेंद्र भट यांनी केले. सोमेश्वर फाउंडेशनच्या वतीने आयोजित २४ व्या 'पुणे आयडॉल' गायन स्पर्धेचे उद्घाटन पं. उपेंद्र भट यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. ही स्पर्धा दिवंगत आमदार विनायक निम्हण यांच्या संकल्पनेतून सुरू झाली आहे. यावेळी उपमहापौर परशुराम वाडेकर, सोमेश्वर फाउंडेशच्या अध्यक्षा तसेच माजी नगरसेविका स्वाती निम्हण, नगरसेविका भक्ती गायकवाड, नगरसेविका सपना छाजेड,नगरसेविका मयुरी कोकाटे,बिपिन मोदी ,वसंतराव जुनवणे, ज्ञानेश्वर मुरकुटे, तसेच स्पर्धेचे परीक्षक जितेंद्र भूरूक व मनीषा निश्चल आदी मान्यवर उपस्थित होते. मार्गदर्शन करताना पं. उपेंद्र भट म्हणाले की, गायन ही परिवर्तन घडवणारी प्रभावी कला असून त्यामध्ये अर्थपूर्णता असणे आवश्यक आहे. केवळ हौस म्हणून गाणाऱ्यांनीही शास्त्रीय गायकीचा भक्कम पाया आत्मसात करणे गरजेचे आहे.

यावेळी त्यांनी पं. भीमसेन जोशी, किशोर कुमार, मोहम्मद रफी, आशा भोसले व लता मंगेशकर यांच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच 'रस बरसत अमृत वेणा' हे युगुलगीत सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. दिवंगत आमदार विनायक निम्हण यांच्या संगीतप्रेमाच्या आठवणींनाही त्यांनी उजाळा दिला.

# डिजिटल लॉकर सुविधा असलेली ॲक्सिस बँकेची पहिली शाखा

पुणे (दै. संध्या)




भारतातील खासगी क्षेत्रातील सर्वात मोठ्या बँकांपैकी एक असलेल्या ॲक्सिस बँकेने नवी दिल्ली येथील कॅपिटल ग्रीन, डीएलएफ मिडटाउन प्लाझा येथे डिजिटल लॉकर सेवांवर लक्ष केंद्रित करणारी आपली पहिली शाखा आज सुरू केली. प्रगत स्वयंचलित प्रणाली (ऑटोमेशन), उत्कृष्ट सुरक्षा व्यवस्था आणि अत्याधुनिक लॉकर सेवांच्या माध्यमातून ग्राहकांना एक वेगळा तसेच वैशिष्ट्यपूर्ण अनुभव देऊन, सुरक्षित बँकिंगची संकल्पना नव्याने साकार करण्याच्या बँकेच्या प्रयत्नांमधील ही नवीन शाखा म्हणजे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

या शाखेचे उद्घाटन श्री. एम. नागराजू (IAS), सचिव, वित्तीय सेवा विभाग (DFS), वित्त मंत्रालय, भारत सरकार; आणि श्री. अशोक त्यागी, व्यवस्थापकीय संचालक, डीएलएफ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बँकेचे वरिष्ठ नेतृत्व श्री. अमिताभ चौधरी व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आणि श्री. मुनीश शारदा कार्यकारी संचालक यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

भारतामध्ये, विशेषतः दाट लोकवस्ती असलेल्या शहरी केंद्रांमध्ये, सेफ-डिपॉझिट लॉकरच्या उपलब्धतेमध्ये तफावत दिसते आहे. उद्योग क्षेत्राच्या अंदाजानुसार, 2030 पर्यंत सुमारे 6 कोटी सधन भारतीयांना बँक लॉकरची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. सध्या उपलब्ध असलेल्या लॉकरची संख्या केवळ 60 लाख इतकीच आहे. ही तफावत मोठ्या शहरांमध्ये अधिकच प्रकर्षाने जाणवते, जिथे शहरी जीवनशैली ही अधिकाधिक सुरक्षित आणि नियंत्रित प्रवेश असलेल्या निवासी संकुलांभोवती केंद्रित होत चालली आहे. डिजिटल लॉकर सेवांवर केंद्रित असलेली ॲक्सिस बँकेची शाखा, एका सुटसुटीत आणि तंत्रज्ञान-सज्ज स्वरूपाद्वारे या बदलत्या गरजेची पूर्तता करते. याद्वारे उच्चभ्रू निवासी संकुलांमध्ये सुरक्षित आणि स्वयंचलित लॉकर सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. शाखेची रचना आणि सेवा देण्याच्या पद्धतींचा नव्याने विचार करून, ही बँक दाट लोकवस्तीच्या शहरी भागांमध्ये आपली प्रत्यक्ष उपस्थिती अधिक भक्कम करते आहे; त्याच वेळी ती ग्राहकांची गोपनीयता जपण्यासोबतच त्यांना मोठ्या प्रमाणावर सोय प्रदान करते आहे.

या प्रस्तावाचा गाभा खालीलप्रमाणे आहे:

- प्रगत सुरक्षा: बहुस्तरीय सुरक्षा आणि सेन्सर-आधारित संरक्षणासह, मध्यवर्ती यंत्रणेचे लक्ष असणारी तिजोरी.
- 24x7 प्रवेश: शाखेतील कर्मचाऱ्यांवर अवलंबून न राहता, बायोमेट्रिक आणि चावीविरहित प्रवेशाची सुविधा.
- संपूर्ण गोपनीयता: खासगी कक्षात स्वयंचलित लॉकरची उपलब्धता; ज्यामुळे गोपनीयता आणि वापराची सुलभता सुनिश्चित होते.

उद्घाटनप्रसंगी ॲक्सिस बँकेचे मॅनेजिंग डिरेक्टर आणि सीईओ श्री. अमिताभ चौधरी म्हणाले, "ग्राहक-केंद्रित दृष्टिकोनामुळे ॲक्सिस बँकेत एक अशी संस्कृती निर्माण होते, जिथे आम्ही आमच्या ग्राहकांच्या बदलत्या गरजांचा अंदाज घेऊन त्या पूर्ण करण्यासाठी नावीन्यपूर्ण उपाययोजना तयार करतो. ग्राहक त्यांच्या मौल्यवान वस्तूंचे संरक्षण करण्यासाठी त्यावर अधिक नियंत्रण, पारदर्शकता आणि सोयीची अपेक्षा करत असतात. आमची डिजिटल लॉकर सुविधा देणारी शाखा नेमके हेच करते. प्रगत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रवेश, गोपनीयता आणि सुरक्षितता ग्राहकांच्या हातात देऊन आम्ही या अनुभवाला एक नवीन रूप देतो. आधुनिक, शहरी आणि उच्चभ्रू जीवनशैलीशी सुसंगत असे अधिक सर्वसमावेशक, परिसंस्थेवर आधारित बँकिंग मॉडेल तयार करण्याच्या आमच्या हेतूचे हे प्रतिबिंब आहे. आमच्या ग्राहकांच्या बँकिंगच्या सवयी लक्षात घेऊन त्यानुसार तयार केलेल्या भविष्यासाठी सज्ज शाखा नेटवर्कच्या आमच्या दृष्टिकोनाला हे मूर्त रूप देते."

प्रत्यक्ष विश्वासाला डिजिटल-फर्स्ट अनुभवाची जोड देऊन हे उद्घाटन बँकिंगमधील नावीन्यपूर्णतेप्रती ॲक्सिस बँकेची वचनबद्धता अधिक दृढ करते. डिजिटल लॉकरवर लक्ष केंद्रित करणारी ही शाखा, ग्राहकांच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी एक विस्तारक्षम, तंत्रज्ञान-सक्षम लॉकर स्वरूप सादर करते; विशेषतः अशा उच्चभ्रू निवासी संकुलांमध्ये जिथे सुरक्षा, गोपनीयता आणि सोय या प्रमुख अपेक्षा असतात.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पुणे मिसिंग लिंक मुळे महत्त्वाचा अडथळा दूर, नवीन वाढीचा मार्ग खुला

मुंबई (दैनिक संध्या) : गुलाम झिया, आंतरराष्ट्रीय भागीदार, वरिष्ठ कार्यकारी संचालक – संशोधन, सल्लागार सेवा, पायाभूत सुविधा आणि मूल्यांकन, नाईट फ्रँक इंडिया यांनी सांगितले, "पुणे मिसिंग लिंकचे उद्घाटन हे भारतातील सर्वाधिक वर्दळीच्या वाहतूक मार्गांपैकी एका मार्गाचे महत्त्वपूर्ण उन्नयन दर्शवते. मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील हा 13.3 किमी वळणमार्ग दीर्घकाळापासून असलेला अडथळा दूर करतो, प्रवासाचा वेळ जवळपास 30 मिनिटांनी कमी करतो आणि धोकादायक घाट विभागातून वाहतूक वळवून सुरक्षितता व कार्यक्षमता दोन्ही सुधारतो. या प्रकल्पाचे प्रमाण 'टायगर व्हॅली'वरील भारतातील सर्वात लांब आणि उंच दोरआधारित पूलाच्या समावेशामुळे अधिक अधोरेखित होते." ते पुढे म्हणाले, "स्थावर मालमत्तेच्या दृष्टीकोनातून, अशा प्रकारची पायाभूत सुविधा ही बाजाराच्या उत्क्रांतीसाठी महत्त्वाची प्रेरक शक्ती ठरते. मुंबई आणि पुणे यांच्यातील सुधारलेली जोडणी या दोन शहरांमधील एकात्मता अधिक मजबूत करेल आणि या मार्गावर निवासी व व्यावसायिक विकासासाठी नवीन संधी निर्माण करेल. यामुळे गुंतवणुकीसाठी उपलब्ध क्षेत्राचा विस्तार होईल, खरेदीदारांचा आत्मविश्वास वाढेल आणि नवीन वाढीची केंद्रे उदयास येण्यास मदत होईल. गोदाम व्यवस्था आणि पुरवठा साखळी क्षेत्रालाही याचा मोठा फायदा होण्याची शक्यता आहे. जलद आणि अधिक विश्वासार्ह वाहतूक तसेच अवघड भूभागाचा टप्पा दूर झाल्यामुळे परतीचा कालावधी आणि कार्यकारी कार्यक्षमता सुधारेल. यामुळे उच्च दर्जाच्या गोदामांची मागणी वाढेल आणि मोठ्या साठवण केंद्रांच्या विकासाला चालना मिळेल, ज्यामुळे ई-वाणिज्य, उत्पादन आणि तृतीय-पक्ष पुरवठा साखळी सेवा यांसारख्या क्षेत्रांना समर्थन मिळेल."

### भीमथडी मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी डॉ. रोहन खवटे यांची निवड



■ दि. २३ व २४ मे रोजी केडगाव (चौफुला) येथे संमेलन

दौंड (दैनिक संध्या) : राज्यस्तरीय पाचव्या भीमथडी मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी डॉ. रोहन खवटे यांची निवड करण्यात आली आहे. हे साहित्य संमेलन दौंड तालुक्यातील केडगाव (चौफुला) येथे दि. २३ व २४ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आले असल्याची माहिती संमेलनाचे मुख्य संयोजक व ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव यांनी दिली. या साहित्य संमेलनात उद्घाटन समारंभ, पुरस्कार वितरण सोहळा, ग्रंथदिंडी, परिसंवाद, प्रकट मुलाखत, कथाकथन, नाट्यप्रयोग, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच कविसंमेलन असे विविध भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. डॉ. रोहन खवटे हे प्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ असून, दौंड तालुक्यातील सामाजिक कार्यात त्यांचा सक्रीय सहभाग असतो. त्यांनी आजपर्यंत सुमारे ५० हजारांहून अधिक शस्त्रक्रिया यशस्वीपणे केल्या आहेत. विविध आरोग्य शिबिरांद्वारे त्यांनी अनेकांना मार्गदर्शन व उपचार दिले आहेत. तसेच शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचे मोलाचे योगदान असून युवकांना मार्गदर्शन करून समाज सशक्त करण्याचे कार्य ते करीत आहेत. दौंड तालुक्याच्या इतिहासात दहावीच्या बोर्ड परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविणारा पहिला विद्यार्थी, पुणे जिल्ह्यात दुसरा व राज्यात १९ वा क्रमांक त्यांनी पटकवला होता. याशिवाय ते मॅरेथॉन स्पर्धांमध्येही सक्रिय असून लडाख, दिल्ली, मुंबई, पुणे, सातारा व दुबई येथे झालेल्या स्पर्धांमध्ये त्यांनी सहभाग घेतला आहे. २५० पेक्षा जास्त राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनमध्ये सहभागी होणारे पुणे जिल्ह्यातील ते एकमेव आहेत. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (BCCI) मध्ये २०११ ते २०१३ या तीन वर्षासाठी भारत, न्यूझीलंड, श्रीलिंका, कॅनडा या देशांच्या क्रिकेट संघांसाठी त्यांची डॉक्टर म्हणून नियुक्ती झाली होती. अखिल भारतीय मराठी साहित्य संशोधन परिषद व भीमथडी मराठी साहित्य प्रतिष्ठान यांच्या वतीने दरवर्षी या संमेलनाचे आयोजन करण्यात येते. या संदर्भात आयोजित बैठकीस भीमथडी मराठी साहित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय सोनवणे, उपाध्यक्ष बाळासाहेब मुळीक, सचिव दिपक पवार, सदस्य कैलास शेलार, राजाभाऊ जगताप, रामचंद्र नातू, महाराष्ट्र राज्य तमाशा थिएटर मालक संघटनेचे अध्यक्ष डॉ. अशोकराव जाधव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनायक कांबळे, झोपडपट्टी सुरक्षा दल पुणे जिल्हा अध्यक्ष दत्तात्रय डाडर, रानकवी जगदीश वनशिव, भाऊसाहेब फडके, नितिन भागवत, आनंदा बारवकर, सुशांत जगताप, अरविंद जगताप आदी उपस्थित होते.


#### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे येथील व परिसरातील सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

शहर जुन्नर येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली जागा मिळकती व घरे यांचे विद्यमान मालक १) श्री. विनायक बाळकृष्ण महाजन, २) प्रतिभा प्रभाकर जोशी, ३) सुलभा विनायक पाठक, ४) हेमंत सदाशिव महाजन, ५) शुभांगी विजय कराडकर, ६) संगीता संजीव जोशी, ७) जान्हवी जगदीश कोटस्थाने ८) सुषमा सतीशचंद्र पेटकर ९) ज्योत्ना दीपक बेलसरे, १०) सीमा विलास लिहिणे रा. जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे यांचे मालकी ताबेवहिवाटीतील आहेत. आमच्या अशिलांची खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या लिहून देणार यांच्या वडिलोपार्जित मिळकतीबाबत खरेदीची बोलणी चालू आहेत. खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या जागेचा व त्यावर असलेली घर मिळकतचे व्यवहार करण्याचे आमचे अशिल श्री लक्ष्मण गजानन शेरकर यांच्याबरोबर निश्चित झालेले आहे. सदर परिशिष्टात वर्णनातील जागा मिळकती व त्यावर असलेली घरे यावर कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध व दान, गहाण, पोटगी, खरेदी, विक्री, साठेखत, अगरहक्क तसेच कोणत्याही प्रकारचा रजिस्टर दस्त इ. प्रकारचे व्यवहार अगर हक्क निर्माण केलेला असल्यास हस्तांतर लिहून देणार हे सर्वस्वी त्यास जबाबदार असतील याची नोंद घ्यावी. आमचे अशील यांना लिहून देणार यांनी संबंधित जागा मिळकती व त्यावर असलेली घराचा व्यवहार सर्व देणी मुक्त आहे. तसेच जाहिरातीतील नावे सोडून इतर कोणाचाही हितसंबंध व अधिकार नाही असा भरोसा आमच्या अशिलांना लिहून देणार यांनी दिलेला आहे.

सदर हस्तांतरणाचा कोणताही व्यवहार खालील नमुद सी.स.नं. मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा व्यवहार असल्यास तुम्ही जाहिरात प्रसिद्ध दिनांकापासून पुढील १५ दिवसांच्या आत आपली सर्व कागदपत्रे घेऊन आपले हक्क व अधिकार सिद्ध करावे अन्यथा आपला कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार नाही असे समजून किंवा तो स्वइच्छेने सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशील खालील नमूद जागा मिळकत व त्यावरील घरांचा व्यवहार पूर्ण करतील त्यांनतर तुमची कोणतीही तक्रार चालणार नाही. त्यानंतर इतर कोणाचीही कोणतीही तक्रार आमच्या अशिलांच्या हक्क व अधिकारावर बंधनकारक असणार नाही याची नोंद संबंधीतानी घ्यावी. सबब सदरची जाहिरात नोटीस श्री लक्ष्मण गजानन शेरकर यांना हस्तांतराचा व्यवहार करण्यापूर्वी देण्यात येत आहे.

परिशिष्ठ

मिळकतीचे वर्णन- तु. पुणे. पो. तु. ता जुन्नर, में. सब रजि. सो जुन्नर यांचे गाव शहर जुन्नर तसेच जुन्नर नगरपरिषद हद्दीतील येथील मिळकत खालीलप्रमाणे ..

अ) न.भू.क्र./सी.स.नं. ६२५ त्यावरील घर मिळकत क्षेत्र ५०.१० चौ.मी.

ब) न.भू.क्र./सी.स.नं. ६२६ त्यावरील घर मिळकत क्षेत्र १०१.१० चौ.मी.

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकतीमधील असणाऱ्या सर्व झाड डोरा, दगड, माती व त्यातील इतर तदंगभूतः वस्तुंसुध्दा व जाण्या येण्याचे हक्कासह व सर्व प्रकारचे इजमेंटरी राईटसह जाहिरातीचा विषय असे

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे

श्री. दत्तात्रय बंडू चिलप (ॲडव्होकेट)
इंदिरा प्लाझा, २ रा मजला, तांदुळ बाजार,
जुन्नर, जि. पुणे. पिनकोड : ४१०५०२
Mobile: 9881435518
मोबाईल : ९८८१४३५५१८


# जनतेने ममता बॅनर्जी यांना पराभवाची झालमुडी खाऊ घातली – एकनाथ शिंदे

## आसाममध्ये सलग तिसऱ्यांदा कमळ : सुनेत्रा पवार यांच्या विक्रमी विजयाबद्दल केले अभिनंदन

मुंबई (दै. संध्या) :



शिवसेनेचे मुख्य नेते व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पश्चिम बंगाल व आसाम येथील निवडणूक निकालांचे स्वागत केले आहे. हा भव्य विजय म्हणजे भारतीय जनता पक्षावरील जनतेच्या विश्वासाची तसेच, विकासाभिमुख राजकारणावरील पसंतीची मोठी पावती असल्याचेही शिंदे यांनी म्हटले आहे. आजचे विधानसभा निवडणुकीचे निकाल देशातील राजकारणाला निश्चितपणे नवी दिशा देतील, असा विश्वास त्यांनी प्रसार माध्यमांसोबत संवाद साधताना व्यक्त केला .

पश्चिम बंगालमधील निकालांवर प्रतिक्रिया देताना एकनाथ शिंदे म्हणाले की, पश्चिम बंगालमध्ये प्रथमच पूर्ण बहुमतासह कमळ फुलणे हा लोकशाहीचा खरा विजय आहे. जनतेने ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील सरकारची गुंडागर्दी आणि भ्रष्टाचार पूर्णपणे नाकारला आहे. जनतेने विकास, स्थैर्य आणि शांततेच्या बाजूने कौल दिला आहे. शिवाय, बंगालच्या जनतेने यावेळी ममता बॅनर्जी यांना पराभवाची झालमुडी खाऊ घातल्याचा टोलाही शिंदे यांनी लगावला आहे.

पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आता बंगालमध्ये 'डबल इंजिन' सरकारद्वारे विकासाचा नवा अध्याय लिहिला जाईल, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला आहे. त्याचवेळी, ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील सरकारविरुद्ध जनतेच्या मनात असलेला रोष मतदानातून स्पष्ट दिसून आला असून, "सबका साथ, सबका विकास" या धोरणाला बंगालमध्ये व्यापक पाठिंबा मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

केंद्रीय गृहमंत्री मा. श्री. अमित शाह यांनी आखलेल्या चाणक्यासारख्या रणनीतीमुळे ममता बॅनर्जींचा अभेद्य किल्ला कोसळला आहे. अमित शाह यांची भक्कम रणनीती, तसेच, तळागाळातील कार्यकर्त्यांची अथक मेहनत यामुळे हा ऐतिहासिक विजय शक्य झाला आहे, असेही शिंदे यांनी स्पष्ट केले. डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या भूमीत भाजपचा विजय हा विचारांच्या विजयाचा क्षण असून, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षातील ही यशस्वी कामगिरी विशेष महत्त्वाची आहे. गेल्या अनेक वर्षांपासून दडपशाही सहन करतही कार्यकर्त्यांनी उभारलेला लढा आज यशस्वी ठरल्याचेही त्यांनी सांगितले.

आसाममध्ये सलग तिसऱ्यांदा भाजपला सत्ता देत जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर आणि मुख्यमंत्री डॉ. हिमंत बिस्वा सरमा यांच्या कार्यशैलीवर शिक्कामोर्तब केले आहे. हा विजय म्हणजे विकास, स्थैर्य आणि पारदर्शक प्रशासन यांना मिळालेली जनतेची ठाम साथ असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे.

याचबरोबर, महाराष्ट्रातील बारामती विधानसभा मतदारसंघातून उपमुख्यमंत्री मा. श्रीम. सुनेत्रा पवार यांच्या विक्रमी विजयाबद्दलही एकनाथ शिंदे यांनी त्यांचे अभिनंदन केले. बारामतीच्या जनतेने विकासाभिमुख राजकारणाला पाठिंबा देत अजित पवार यांच्या प्रगतिशील विचारांना कौल दिला आहे, असेही त्यांनी नमूद केले आहे.

देशभरात विकास आणि सुशासनाच्या मुद्द्यांवर आधारित राजकारण अधिक बळकट होत असल्याचे या निकालांतून स्पष्ट होत आहे. आगामी काळात याचा सकारात्मक परिणाम देशाच्या प्रगतीवर दिसून येईल, असा विश्वासही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

तामिळनाडूमध्ये एम. के. स्टॅलिनच्या पराभवावर प्रतिक्रिया देताना एकनाथ शिंदे यांनी तामिळनाडूच्या जनतेचे आभार मानले. ते म्हणाले की, स्टॅलिन अनेकदा सनातन आणि हिंदुत्वाबाबत वादग्रस्त विधाने करत असे, त्यामुळे तेथील जनतेने त्याला धडा शिकवून पराभूत केले. शिंदे म्हणाले की, या निकालावरून हे स्पष्ट होते की लोकशाहीमध्ये जनताच सर्वोच्च असते.

## विद्युत कंपन्यांच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे दि. ६ ते ८ मे पर्यंत पुण्यात आयोजन

पुणे (दै. संध्या) :

■ कबड्डी, कुस्ती, खो-खो व बास्केटबॉलच्या स्पर्धेसाठी ४१ संघ सहभागी होणार

अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या ४७ व्या राष्ट्रीय कबड्डी, कुस्ती, खो-खो व बास्केटबॉलच्या क्रीडास्पर्धेचे आयोजन बुधवार (दि. ६) ते शुक्रवारपर्यंत (दि. ८) बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलामध्ये करण्यात आले आहे. या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये १० राज्यांतील विविध विद्युत कंपन्यांचे पुरुष व महिला गटातील तब्बल ४१ संघ सहभागी होत आहेत. या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्रासह गुजरात, हरियाणा, तेलंगाणा, राजस्थान, उत्तराखंड, पंजाब, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश, दिल्ली आदी राज्यांतील सरकारी व खासगी विद्युत कंपन्यांचे ४१ संघ आणि सुमारे ५३८ महिला व पुरुष खेळाडू सहभागी होत आहेत.

कबड्डी, कुस्ती, खो-खो व बास्केटबॉलमध्ये पुरुष संघात लढत होईल तर कबड्डी व खो-खोमध्ये महिला संघांचा समावेश करण्यात आला आहे. राष्ट्रीय स्पर्धेतील अजिंक्यपदासाठी कबड्डीमध्ये पुरुष व महिला गटातील १८ संघ तर खो-खोसाठी ९ संघ सहभागी होत आहेत. तसेच कुस्ती व बास्केटबॉलमध्ये अजिंक्यपदासाठी पुरुष गटामध्ये प्रत्येकी ७ संघांमध्ये लढत होणार आहे.

## एथर एनर्जीची विक्रमी झेप; तिमाहीत ८३,४१८ वाहनांची विक्री

### वार्षिक विक्रीत ६९ टक्के वाढ

पुणे (दै. संध्या) :



एथर एनर्जी या आघाडीच्या विद्युत दुचाकी उत्पादकाने आर्थिक वर्ष 2026 मध्ये विक्री, उत्पन्न आणि बाजारपेठेतील हिस्सा या सर्वच आघाड्यांवर भरीव कामगिरी नोंदवली. कंपनीने वर्षभरात 2,62,942 वाहनांची विक्री करत 69 टक्के वाढ साधली, तर चौथ्या तिमाहीत 83,418 वाहनांची विक्री करून 76 टक्के वाढ नोंदवली. नफ्यापूर्वीची कमाई (ईबीआयटीडीए) मध्येही मोठी सुधारणा झाली आहे.

आर्थिक वर्ष 2026 मध्ये कंपनीचे एकूण उत्पन्न ₹3,823 कोटींवर पोहोचले, जे मागील वर्षाच्या तुलनेत 66 टक्क्यांनी अधिक आहे. समायोजित एकूण नफा ₹925 कोटींवर पोहोचत 116 टक्के वाढ नोंदवली, तर नफ्याचे प्रमाण 24 टक्क्यांपर्यंत सुधारले. तोटा लक्षणीयरीत्या कमी होऊन ₹257 कोटींवर आला असून कामकाजातील कार्यक्षमतेत वाढ झाल्याचे दिसून आले.

कंपनीच्या वाढीमागे भौगोलिक विस्तार, झपाट्याने वाढलेले विक्री जाळे आणि एथर रिट्झा या कुटुंबासाठी उपयुक्त असलेल्या स्कूटरची प्रभावी कामगिरी हे प्रमुख घटक ठरले.

वर्षअखेरपर्यंत एथरने आपले अनुभव केंद्र 351 वरून 700 पर्यंत वाढवले, तर सेवा केंद्रांची संख्या 548 वर पोहोचली. तसेच 6,000 हून अधिक जलद चार्जिंग केंद्रांमुळे कंपनीचे जाळे देशभर मजबूत झाले आहे.

बाजारपेठेतील हिस्साही लक्षणीयरीत्या वाढला असून मध्य भारतात तो 9.5 टक्क्यांवरून 17.3 टक्क्यांपर्यंत गेला, तर उर्वरित भारतात 6.5 टक्क्यांवरून 12.1 टक्क्यांपर्यंत वाढ झाली. दक्षिण भारतात कंपनीने 23.5 टक्के हिस्सा राखत आघाडी कायम ठेवली.

कंपनीचे सहसंस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी तरुण मेहता यांनी सांगितले की, उत्पादनाधारित वाढ, मजबूत वितरण जाळे आणि नव्या ग्राहकवर्गामुळे कंपनीला मोठी गती मिळाली आहे. नवीन स्कूटर व्यासपीठ आणि उत्पादन क्षमतेतील गुंतवणूक यामुळे पुढील काळातही ही वाढ कायम राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

चौथ्या तिमाहीत कंपनीचे उत्पन्न ₹1,214 कोटींवर पोहोचले, जे वार्षिक तुलनेत 76 टक्के वाढ आहे. समायोजित एकूण नफा 25 टक्क्यांपर्यंत सुधारला, तर तोटा घटून ₹30 कोटींवर आला. वाढती विक्री आणि खर्च नियंत्रणामुळे कंपनीच्या आर्थिक स्थितीत सातत्याने सुधारणा होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिका; आगाऊ अर्ज व लिलाव प्रक्रिया जाहीर

पुणे (दै. संध्या) :

वरील लिलाव प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उर्वरित पसंती क्रमांकांचे वितरण ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार असून, नागरिकांना https://fancy.parivahan.gov.in या संकेतस्थळावर नाव नोंदणी करून, अर्ज व शुल्क भरणा करून पसंतीचा नोंदणी क्रमांक आरक्षित करता येणार आहे. यासाठी कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची आवश्यकता राहणार नाही, असे प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांनी कळविले आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे दुचाकी वाहनांसाठी नवीन नोंदणी मालिका सुरू करण्यात येत असून, खासगी चारचाकी वाहनांकरिता आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक तीनपट व नियमित शुल्क भरून राखून ठेवण्याकरीता आगाऊ अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक इच्छुक वाहनधारकांनी दिनांक 6 मे रोजी सकाळी 10.30 ते दुपारी 2.30 या कार्यालयीन वेळेत विहित नमुन्यातील अर्ज, डीडी, पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र व पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतींसह प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथील खाजगी वाहन विभागात सादर करावेत. एखाद्या एका क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास त्यांची यादी कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल. सदर अर्जांसाठी लिलावाचे डीडी 7 मे रोजी दुपारी 2.30 वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील व त्याच दिवशी दुपारी 4 वाजता सभागृहात लिलाव होईल.

त्याचप्रमाणे, दुसऱ्या टप्प्यात आकर्षक व पसंतीच्या क्रमांकांसाठी अर्ज दिनांक 7मे रोजी सकाळी 10.30 ते दुपारी 2.30 या वेळेत स्वीकारण्यात येणार आहेत. या अर्जांसाठीचे लिलावाचे डीडी 8 मे रोजी दुपारी 2.30 वाजेपर्यंत स्वीकारले जातील व दुपारी 4 वाजता सहकार सभागृहामध्ये लिलाव आयोजित करण्यात येईल.

लिलावासाठी सादर करण्यात येणारे डीडी हे "R.T.O., Pune" या नावाने नॅशनलाइज्ड/शेड्युल्ड बँकेचे, पुणे येथील असणे आवश्यक असून ते दोन महिन्यांपेक्षा जुने नसावेत. प्रत्येक अर्जासोबत पॅनकार्डची साक्षांकित प्रत जोडणे अनिवार्य राहील. लिलावासाठी सादर करण्यात येणारा डीडी बंद पाकिटात एका अर्जासोबतच ग्राह्य धरला जाईल. "Pune R.T.O." या नावाने सादर केलेले किंवा विहित शुल्कापेक्षा कमी रकमेचे डीडी बाद करण्यात येतील. एकाच अर्जदाराने एका क्रमांकासाठी एकाहून अधिक पाकिटे सादर केल्यास संबंधित अर्ज रद्द करण्यात येईल.

लिलाव प्रक्रियेमध्ये एखाद्या पसंतीच्या क्रमांकाला समान रकमेचे डीडी प्राप्त झाल्यास, संबंधित क्रमांकाची निश्चिती अर्जदारांच्या नावांच्या चिठ्या टाकून करण्यात येईल. लिलाव प्रक्रियेदरम्यान अर्जदार उपस्थित असो अथवा नसो, संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, 1981 च्या नियम 54 अ नुसार पसंतीचा नोंदणी क्रमांक राखून ठेवण्याची वैधता 180 दिवस आहे. तथापि, आता NIC Portal मार्फत करण्यात आलेल्या बदलानुसार वैधता संपलेले पसंती क्रमांक पुन्हा जनतेसाठी पोर्टलवर उपलब्ध दिसून येतात.

## इंदापूर तालुक्यात दोन घरफोड्या; वरकुटे व आगोती येथे तब्बल १० लाख ७१ हजारांचा ऐवज लंपास

इंदापूर (दै. संध्या) :



इंदापूर तालुक्यातील वरकुटे बु. व अगोती नंबर 1 येथे चोरीच्या घटना घडल्या. यामध्ये रोख रक्कम, सोन्या चांदीचे दागिने यासह तब्बल 10 लाख 71 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला याप्रकरणी अज्ञात चोरट्या विरोधात इंदापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अक्षय दिलखुश चितळकर (वय 28 वर्षे रा.चितळकरवाडी,वरकुटे बु.ता.इंदापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार फिर्यादीच्या राहत्या घरात 3 मे रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात इसमाने घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला व लाकडी कपाट उचकटून त्यातील सोन्याचे विविध दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. यामध्ये 9 लाख 73 हजार रुपयांच्या सोन्यांच्या दागिन्यांचा समावेश होता. तसेच आकाश शरद गुनवरे (वय 30 वर्षे,रा.आगोती नं.1 ता.इंदापुर जि. पुणे) यांच्याही घरी त्याच रात्री चोरीची घटना घडली.यामध्ये 80 हजार रुपयांचे सोन्या चांदीचे दागिने व 18 हजार रुपये रोख असा एकूण 98 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.या दोन्ही चोरीच्या घटनेत एकूण 10 लाख 71 हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अजित बिरादार करीत आहेत.

## सचिवपदी जाधव तर रश्मी जाधव यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती

मुंबई (दै. संध्या) :



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया मध्ये प्रा. जीवन जाधव आणि त्यांची कन्या डॉ. रश्मी जीवन जाधव यांची महत्त्वपूर्ण पदांवर नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी ही घोषणा केली. यानुसार, प्रा. जीवन जाधव यांची महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीमध्ये प्रदेश सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, डॉ. रश्मी जीवन जाधव यांची मुंबई प्रदेश उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. प्रा. जाधव आणि डॉ. रश्मी जाधव हे यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) पदाधिकारी होते. मात्र, पक्षात अन्याय झाल्याची भावना असल्याने त्यांनी मागील महिन्यात आरपीआय मध्ये प्रवेश केला होता.

विशेषतः डॉ. रश्मी जाधव यांना मुंबई महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी न मिळाल्याने नाराजी निर्माण झाली होती. आरपीआय मध्ये प्रवेशावेळी रामदास आठवले यांनी त्यांचे खुलेपणाने स्वागत करत विक्रोळीतील पँथर चळवळीचा इतिहासही उजळवला होता. "एक पँथर पुन्हा पक्षात परतला," असे तेव्हा त्यांनी नमूद केले होते. डॉ. रश्मी जाधव या समाजकार्यामध्ये सक्रिय असून, त्या ज्येष्ठ नागरिक, पोलीस कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी तसेच महिलांसाठी नियमित आरोग्य शिबिरे आयोजित करतात.

## जिजामाता विद्यालयाचे दिमाखदार यश

### एन.एम. एम. एस परीक्षेत ३ विद्यार्थ्यांची केंद्र शासन शिष्यवृत्तीसाठी निवड

जेजुरी (दै. संध्या) :



महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आयोजित राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा (NMMS) दिनांक 28 डिसेंबर 2025 रोजी घेण्यात आली होती. या परीक्षेची अंतिम निवड यादी नुकतीच जाहीर झाली असून जेजुरी येथील जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजने पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेची छाप पाडली आहे. या परीक्षेत विद्यालयातील तब्बल 37 विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यापैकी 3 विद्यार्थ्यांची प्रत्येकी 48,000 रुपयांच्या केंद्र शासनाच्या प्रतिष्ठित शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे. विशेष म्हणजे भगत केतन राजेंद्र याने पुरंदर तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावून विद्यालयाचा मान उंचावला आहे.

केंद्र शासन शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी (प्रत्येकी ₹48,000) : भगत केतन राजेंद्र (तालुक्यात प्रथम), पुशाम अवंती मुकेशकुमार, बर्गे प्रज्वल संजीत या यशामागे विद्यालयाचे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य मा. नंदकुमार सागर, पर्यवेक्षिका लीना पायगुडे, समन्वयक प्रल्हाद गिरमे, माध्यमिक विभाग प्रमुख बाळासाहेब जगताप, शिष्यवृत्ती विभाग प्रमुख पांडुरंग आटोळे तसेच शिक्षकवृंद सारिका कामथे, सागर चव्हाण आणि वर्षा देसाई यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, पश्चिम महाराष्ट्र भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस, संस्थेचे सचिव, माजी आमदार संजयजी चंदूकाका जगताप, संस्थेचे प्रमुख सल्लागार व आय ए.एस अधिकारी डॉ. राजेंद्रबापू जगताप, संस्थापक सचिव डॉ. एम. एस. जाधव, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा व संस्थेच्या विश्वस्त राजवर्धिनीताई जगताप, भारती विद्यापीठाच्या संचालिका व संस्थेच्या विश्वस्त अस्मिता ताई जगताप, सहसचिव दत्तात्रय गवळी,संस्थेच्या समन्वयिका सोनालीताई शिंदे, व्यवस्थापक कानिफनाथ आमराळे, रवींद्रपंत जगताप व इतर मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ‘स्पेलिंग किंग’! आंतरराष्ट्रीय स्पर्धेत कु. कियान्श शर्माची चमकदार कामगिरी

पिंपरी, पुणे (दैनिक संध्या) : पिंपळे सौदागर येथील कु. कियान्श शर्मा याने आपल्या अफाट बुद्धिमत्ता, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करत शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. ‘MaRRS International Spelling Bee Competition’ च्या आंतरराष्ट्रीय अंतिम फेरीत कियान्शने जगभरातील स्पर्धकांना मागे टाकत तृतीय क्रमांक पटकावला आहे. कियान्श हा पिंपळे सौदागर येथील VIBGYOR Rise Schoolचा विद्यार्थी असून, २६ एप्रिल २०२६ रोजी मुंबई येथे झालेल्या अंतिम फेरीत त्याने ही दैदिप्यमान कामगिरी केली. या स्पर्धेत विविध देशांतील गुणवंत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. अत्यंत कठीण आणि चुरशीच्या फेऱ्यांमध्ये कियान्शने आपल्या शब्दसामर्थ्याची आणि एकाग्रतेची छाप पाडली. कियान्शचा हा यशस्वी प्रवास शालेय स्तरावरील स्पर्धांपासून सुरू झाला. त्यानंतर आंतरशालेय, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील अनेक कठीण टप्पे पार करत त्याने आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर आपली गुणवत्ता सिद्ध केली. कियान्शच्या या उल्लेखनीय यशाबद्दल भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या हस्ते त्याचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना शत्रुघ्न काटे म्हणाले, “पिंपळे सौदागरमधील एका चिमुकल्याने जागतिक स्तरावर शहर आणि देशाचे नाव उज्ज्वल केले, याचा आम्हाला अभिमान आहे. कियान्शचे यश हे त्याच्या मेहनतीचे, शिस्तीचे आणि जिद्दीचे फळ आहे. तो आजच्या पिढीसमोर प्रेरणादायी आदर्श ठरला आहे.” या सत्कार समारंभाला कियान्शचे पालक, शिक्षक तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी त्याच्या या यशाचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### एस. बी. पाटील ज्यु कॉलेज वाणिज्य शाखेचा शंभर टक्के निकाल

पिंपरी, पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस. बी. पाटील ज्यु कॉलेज वाणिज्य शाखेचा १०० टक्के आणि विज्ञान शाखेचा ९८.८७ टक्के निकाल लागला आहे. विज्ञान शाखेच्या अनुष्का पोळ ९३ टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक मिळवला. अनिशा काळे ९१.८३ टक्के गुण द्वितीय तर प्रांजल थोरात ८७.३३ टक्के गुण मिळवून तृतीय आली. तसेच वाणिज्य शाखेतील कार्तिक शेळके आणि मानसी सावंत यांनी ८८.८३ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. रोहिणी मुदलियार ८८.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय तर रितिका अमावासी ८७.६७ टक्के गुण मिळवून तृतीय आली. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, प्राचार्य संदीप पाटील यांनी आभिनंदन केले.



### आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांचा पुढाकार

पिंपरी, पुणे (दैनिक संध्या) : राष्ट्रीय जनगणना २०२७ प्रक्रियेला आजपासून महाराष्ट्रात औपचारिक सुरुवात झाली असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी स्वतः स्वगणना करून या उपक्रमाचा शुभारंभ केला. तसेच या जनगणनेसाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. पिंपरी चिंचवड महापालिका मुख्यालय येथे १ मे महाराष्ट्र दिनाच्या व कामगार दिनाच्या शासकीय ध्वजारोहण सोहळ्यानंतर आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी जनगणनेशी संबंधित https://se.census.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन सर्व ३४ प्रश्नांची माहिती ऑनलाइन भरत स्वगणना जनगणनेची प्रक्रिया पूर्ण केली. त्यानंतर त्यांना ‘सेल्फ एन्युमरेशन आयडी’ प्राप्त झाला. स्वतः पुढाकार घेत स्वगणना करून त्यांनी नागरिकांसमोर आदर्श निर्माण केला आहे. महापालिका आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ.विजय सूर्यवंशी म्हणाले की, जनगणना ही केवळ आकडेवारी नसून ती देशाच्या विकासाचा पाया आहे. प्रत्येक नागरिकाने अचूक व प्रामाणिक माहिती देऊन या राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे. स्वगणना ही सोपी, सुरक्षित आणि वेळ वाचवणारी प्रक्रिया आहे. १ मे ते १५ मे २०२७ या कालावधीत नागरिकांना घरबसल्या स्वगणना करण्याची सुविधा उपलब्ध असून, त्यानंतर १६ मे ते १४ जून दरम्यान प्रगणकांमार्फत घरोघरी जाऊन जनगणना प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. या मोहिमेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होऊन अचूक माहिती द्यावी, असे आवाहन देखील आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले.

### भाज्यांचे दर घसरले; पालेभाज्या महागल्या; आवक घटल्याने पालेभाज्यांचे भाव वाढले

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी येथील लालबहादूर शास्त्री भाजी मंडईत रविवारी (दि. 3) बाजारात गेल्या आठवड्याच्या तुलनेमध्ये भाज्यांच्या दरात घट झाली होती. उन्हामुळे पालेभाज्यांची आवक कमी असल्यामुळे पालेभाज्यांचे दर वाढले होते. बाजारात भेंडी, गवार, शेवग्याचे दर कमी झाले आहेत. कोथिंबीर व मेथीची जुडी 30 रुपये दराने विक्री केली जात आहे. बीन्स व वाटाणा 100 ते 140 रुपये किलो दराने विक्री केली जात आहे. फ्लॉवर 30-40 रुपये किलो दराने विक्री केली जात आहे. मिरची 60, कर्नाटक कैरी 50 ते 60 रुपये किलो दराने विक्री केली जात आहे. कांदे 100 रुपयांना पाच किलो विक्री केली जात आहे. लसूण 100 - 150 रुपये तर आले 60 - 80 रुपये किलो दराने उपलब्ध केली जात आहे. रविवारी बाजारात गवार 40-70 रुपये किलो, शेवगा 40 -70, टोमॅटो 30, भेंडी 50, फ्लॉवर 40, कोबी 30, मिरची 50, गाजर 30, शिमला 50- 60, लसूण 100 - 120, आले 60 -80, वांगी 30 -40, काकडी 40, कारले 50, कांदे 20 - 25 रुपये किलो, बटाटा 25- 30 रुपये किलो, पावटा 70, लाल भोपळा 30, घोसाळी 60, दोडका 70 रुपये, तोंडली 50-60 रुपये, बीट 50, दुधी 40 तर घेवडा 60 रुपये किलो दराने विक्री केली जात आहे. पाले भाज्यांचे दर (रु.) प्रति जुडी कोथिंबीर 30 रुपये, मेथी 35, पालक 20, शेपू 20, राजगिरा 30, पुदिना 10, मुळा 40, चवळई 30, लाल माठ 15, कांदापात 30, करडई 15.

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोला गती; ३१ मेपर्यंत सेवा सुरू होण्याची शक्यता

## पहिला टप्पा बालेवाडीपर्यंत खुला होणार; आयटीयन्सना वाहतूक कोंडीतून मोठा दिलासा

पिंपरी (दै. संध्या)

पुणे महानगर प्रदेशातील वाहतूक व्यवस्थेत मोठा बदल घडवून आणणाऱ्या हिंजवडी माण ते शिवाजीनगर मेट्रो मार्ग 3 प्रकल्पाला वेग आला असून, माण-हिंजवडी ते बालेवाडी हा पहिला टप्पा येत्या 31 मेपर्यंत प्रवाशांसाठी खुला होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे दररोजच्या वाहतूक कोंडीतून आयटीयन्सची सुटका होऊ शकेल. प्रशासनाने अंतिम टप्प्यातील कामे युद्धपातळीवर सुरू केली आहेत. हिंजवडी, वाकड, बालेवाडी या भागांमध्ये सध्या प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. मेट्रो सुरू झाल्यानंतर सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम होईल; तसेच खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी होईल. त्यामुळे शहरातील वाहतूक व्यवस्थेला मोठा दिलासा मिळेल. पहिला टप्पा सुरू झाल्यानंतर उर्वरित मार्गाचे कामही वेगाने पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. संपूर्ण हिंजवडी-शिवाजीनगर मार्ग सुरू झाल्यास पुण्याच्या सार्वजनिक वाहतुकीत मोठी क्रांती घडेल. हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो सेवा 31 मेपर्यंत सुरू झाल्यास, ती केवळ प्रवास सुलभ करणारी सुविधा ठरणार नाही, तर पुण्याच्या वाढत्या शहरीकरणाला आधार देणारा महत्त्वाचा टप्पा ठरेल. आता सर्वांचे लक्ष मे च्या बैठकीकडे लागले आहे, जिथे या प्रकल्पाच्या उद्घाटनावर अंतिम शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. पीएमआरडीए आणि टाटा समूह यांची 15 मे रोजी उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली असून, या बैठकीत प्रत्यक्ष प्रकल्पाचा आढावा घेतला जाणार आहे; तसेच मेट्रो सेवा सुरू करण्याच्या अंतिम तारखेवर निर्णय अपेक्षित आहे. ही बैठक प्रकल्पासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. यात कामाची प्रगती, सुरक्षा मानके आणि तांत्रिक बाबींची सखोल तपासणी होणार आहे. प्रशासनाचा कल जूनपर्यंत वाट पाहण्याऐवजी मे महिन्यातच सेवा सुरू करण्याकडे असल्याचे दिसून येते. सर्व यंत्रणा वेळेत तयार झाल्यास 31 मे ही तारीख निश्चित होण्याची शक्यता आहे.

हिंजवडी आयटी पार्क परिसरात दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. मेट्रो सेवा सुरू झाल्यास आयटी कर्मचाऱ्यांचा प्रवासाचा वेळ कमी होईल; तसेच हिंजवडी परिसरातील रस्त्यांवरील वाहनांची संख्या घटेल. त्यामुळे प्रदूषणातही घट होण्याची शक्यता आहे. आयटीयन्स तसेच इतर प्रवाशांचा बालेवाडी स्टेडियमपर्यंतचा प्रवास सुलभ होणार आहे. हा प्रकल्प पुण्यातील आयटी उद्योगासाठी ‘गेमचेंजर’ ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



**प्रकल्पाची सद्यस्थिती**

- माण-हिंजवडी ते बालेवाडीदरम्यानच्या 12 स्थानकांचे काम 95 टक्के पूर्ण
- किरकोळ दुरुस्ती, सजावटीची कामे अंतिम टप्प्यात.
- तांत्रिक चाचण्या आणि सुरक्षा तपासणी सुरू.
- प्रवासी सुविधांची पडताळणी जलदगतीने.
- या टप्प्याचे काम पूर्णत्वाच्या मार्गावर असून, उर्वरित कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासन विशेष लक्ष देत आहे.

## तळेगावात बसथांब्यावर निवाऱ्याचा अभाव; प्रवाशांचे हाल

तळेगाव स्टेशन (दै. संध्या)

**उन्हात बसची वाट पाहावी लागते; प्रवाशांकडून शेड उभारणीची मागणी**

तळेगाव दाभाडे येथून पिंपरी चिंचवड व चाकणच्या दिशेने प्रवास करणारे प्रवासी मोठ्या प्रमाणात आहेत. परंतु तळेगाव येथील पीएमपी बस थांब्यावर पत्राशेड नसल्याने नागरिकांना भर उन्हात उभा राहून बसची वाट पाहण्याची वेळ येत आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने येथे त्वरित बस थांबा उभारावा, अशी मागणी होत आहे. तळेगाव दाभाडे येथून पिंपरी, चिंचवड, आकुर्डी, खडकी, दापोडी, पुणे, कात्रज आदी ठिकाणी तसेच वडगाव, कामशेत, चाकण आदी ठिकाणी सीटी बसने प्रवास करणा-यांमध्ये कामगार, विद्यार्थी, व्यापारी, महिला, ज्येष्ठ नागरिक आदी प्रवाशांची संख्या मोठी आहे. तळेगावच्या सभोवताली उर्से, वडगाव, नवलाख उंबरे आदी ठिकाणी औद्योगिकरण झालेले असून, अनेक कंपन्या या ठिकाणी आहेत. तेथील अनेक कामगार तळेगाव आणि पुणे परिसरातून सीटी बसने ये-जा करणारे आहेत. तसेच दुपारी बारानंतर सुमारे तीनपर्यंत रेल्वे लोकल सेवा नाही. या कालावधीत प्रवाशांना बसशिवाय पर्याय नाही. यामुळे प्रवाशांच्या संख्येत दुपारी आणखी भर पडते.

तळेगाव येथे लिंब फाटा, भंडारे हॉस्पिटल, जिजामाता चौक, नगरपरिषद, खांडगे पेट्रोल पंप, तळेगाव स्टेशन, ईगल, स्वराज नगरी, चाकण फाटा आदी ठिकाणी आणि परत असे अनेक बस थांबे असताना तळेगाव दाभाडे येथे बसथांब्यावर एखाद दुसरा अपवाद वगळता प्रवाशांच्या सेवेसाठी,निवा-यासाठी शेड नाहीत. काही ठिकाणी शेडची दुरवस्था झालेली आहे.

## पारंपरिक कामगार कायद्यांसाठी वज्रमूठ - डॉ. कैलास कदम

पिंपरी (दै. संध्या)

केंद्र सरकारने पारंपरिक कामगार कायदे रद्द करून भांडवलदारांच्या फायद्यासाठी नवीन कायदे आणले आहेत. यामुळे कामगारांचे आर्थिक, सामाजिक शोषण होणार आहे. हे काळे कायदे मागे घेऊन पारंपरिक कामगार कायद्यांची अंमलबजावणी करण्यात यावी यासाठी सर्व कामगारांनी वज्रमूठ करावी असे आवाहन कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे पुणे जिल्हा अध्यक्ष व इंटक पुणे जिल्हा अध्यक्ष डॉ. कैलास कदम यांनी केले.

जागतिक कामगार दिनानिमित्त शुक्रवारी इंटक कामगार संघटनेच्या वतीने शुक्रवारी (दि.१ मे) सकाळी भक्ती शक्ती चौक ते पिंपरी पर्यंत दुचाकी रॅली काढण्यात आली. पिंपरीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकात रॅलीचे रूपांतर सभेत झाले. यावेळी कामगारांना डॉ. कैलास कदम यांनी मार्गदर्शन केले. तसेच पुणे जिल्हा ग्रामीण इंटक अध्यक्ष विजय जाधव, इंटक पुणे जिल्हा महिला शहराध्यक्ष शितल कोतवाल, खडकी ॲम्युनिशन फॅक्टरीचे शशिकांत धुमाळ, विजय पाटील, विजय कदम, एल. जी. इलेक्ट्रॉनिक्सचे संतोष खेडेकर, विकास साखरे, हायर कंपनीचे विकास साखरे यांनी देखील उपस्थित कामगारांशी संवाद साधला. यावेळी पुणे, पिंपरी चिंचवड शहर, तळेगाव, शिरूर, रांजणगाव, सणसवाडी, चाकण, खेड, म्हाळुंगे, भोर, जेजुरी, बारामती, कुरकुंभ, दौंड भागातील इंटक, हिंद कामगार संघटना आणि कामगार संघटना संयुक समितीचे सदस्य रॅली मध्ये सहभागी झाले होते. डॉ. कदम यांनी कामगारांना जागतिक कामगार दिन, महाराष्ट्र दिन आणि भगवान गौतम बुद्ध जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

**कामगार दिनानिमित्त पिंपरीत इंटकची दुचाकी रॅली**



यावेळी डॉ. कैलास कदम म्हणाले की, स्वातंत्र्यपूर्व काळात राव बहादुर नारायण मेघाजी लोखंडे यांनी मुंबईतील गिरणी कामगारांना कामाचे तास, आठवड्यात एक दिवस रजा, किमान वेतन व इतर हक्क मिळवून देण्यासाठी लढा उभारला. देशातील पहिल्या कामगार संघटनेची स्थापना त्यांनी केली. स्वातंत्र्यानंतर आता पर्यंत देशात शेती व औद्योगिक क्रांती झाली. देश आर्थिक प्रगती करू लागला. आज भारत देशाची अर्थव्यवस्था जगातील पहिल्या पाच मध्ये आहे. याचे सर्व श्रेय कामगारांचे आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा गांधी यांनी "इंटक" या राष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या कामगार संघटनेची स्थापना केली. कामगारांना त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी ही संघटना नेहमी अग्रेसर राहिली आहे. इंटकचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. जी. संजीवा रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली आतापर्यंत अनेक वेळा देशातील सर्व कामगार संघटनांनी एकत्र येऊन देशभर काम बंद करून निदर्शने, आंदोलने केली आहेत. आता पुन्हा रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची वेळ आली आहे. यासाठी आता वेळ प्रसंगी सर्व कामगारांनी, संघटनांनी या नवीन काळया कामगार कायद्या विरोधात वज्रमूठ करून कामगारांच्या एकीचे दर्शन घडवावे असे आवाहन डॉ. कैलास कदम यांनी केले.

स्वागत शांताराम कदम, आभार यशवंत सुपेकर यांनी मानले.

## भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा उत्साहात संपन्न

पिंपरी (दै. संध्या)

नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या वतीने स्व. अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ आयोजित भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ नवमहाराष्ट्र विद्यालय मैदान येथे उत्साहात पार पडला. या स्पर्धेमुळे परिसरातील क्रीडाप्रेमींना दर्जेदार सामने पाहण्याची संधी मिळाली, तर स्थानिक खेळाडूंना आपली कौशल्ये दाखवण्याचे तसेच पुढील स्पर्धांसाठी आत्मविश्वास वाढवण्याचे प्रभावी व्यासपीठ उपलब्ध झाले.

स्पर्धेत विविध गटांमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत क्रीडांगण गाजवले. विशेषतः युवा खेळाडूंना अनुभवी खेळाडूंसोबत खेळण्याची संधी मिळाल्याने त्यांच्या खेळातील गुणवत्ता आणि स्पर्धात्मकता वाढण्यास मदत झाली. तसेच 40+ गटाच्या सहभागामुळे ज्येष्ठ खेळाडूंनाही आपली क्रीडा आवड जोपासण्याची संधी मिळाली, ज्यामुळे क्रीडा संस्कृती अधिक बळकट होत असल्याचे दिसून आले.




कार्यक्रमास विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, सीमा साळवे, सारंग कामथेकर, निकिता कदम, प्रियांका कुदळे, गिरिजादेवी कुदळे, ज्ञानोबा गव्हाणे, सुरेश शिंदे, वस्ताद दत्तोबा नाणेकर, शेखर अहिरराव, शांती सेन, मीनाताई नाणेकर, किसन कापसे आदी मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन राजेंद्र वाघेरे, संदीप नाणेकर, जितेंद्र वाटकर, किरण शिंदे, हरिष वाघेरे, राघवेंद्र भांडगे, गणेश मंजाळ आणि सारथी काळे यांनी केले. स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या हस्ते संपन्न झाला.

यावेळी बोलताना संदीप वाघेरे म्हणाले की, “स्व. अजित दादा पवार यांच्या स्मृती जपण्यासाठी तसेच आपल्या परिसरातील युवकांना योग्य दिशा देण्यासाठी अशा क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे अत्यंत आवश्यक आहे. क्रीडा क्षेत्रातून केवळ शारीरिक तंदुरुस्तीच नव्हे तर शिस्त, संघभावना आणि नेतृत्वगुण विकसित होतात. या स्पर्धेमुळे अनेक नवोदित खेळाडूंना आपली प्रतिभा सादर करण्याची संधी मिळाली आहे. भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे अधिकाधिक खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचा आमचा प्रयत्न राहील.”

या भव्य स्पर्धेमुळे परिसरात क्रीडा संस्कृतीला चालना मिळाली असून युवकांमध्ये खेळाविषयीची आवड आणि संघभावना वृद्धिंगत होत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. आयोजकांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## पिंपरीत रानमेवा भाव खातोय; जांभूळ-करवंद आंब्यापेक्षा महाग

पिंपरी (दै. संध्या)

**कमी आवक आणि जास्त मागणीमुळे जांभूळ-करवंदे महाग; बाजारात दर चढेच सुरू**

पिंपरी फळ बाजारात आंब्याच्या तुलनेत आता रानमेवा भाव खात आहे. आंबा 200-250 रुपये किलो तर जांभूळ 300 ते 400 रुपये आणि करवंदे 200 ते 250 रुपये किलो दराने विक्री केली जात आहे. लांबट आणि गोल आकाराची जांभूळ करवंद ही चवीला आंबट-गोड व रसरशीत असतात. पण यावर्षी हंगामाच्या सुरुवातीस आवक कमी असल्याने दरही चढेच आहेत. एक किलोसाठी चारशे रुपये मोजावे लागत आहेत. सध्या जांभूळ व करवंद या फळाची बाजारात आवक सुरू झाली आहे. मात्र, पाऊस वाढेल, तसतशी या फळाची आवक जास्त प्रमाणात बाजारात वाढेल आणि दरही सर्वसामान्यांच्या आवाक्यात येईल, असे विक्रेत्यांनी सांगितले. करवंद ही डोंगराळ भागात जास्त प्रमाणात येत असतात. त्यामुळे यांचे दरही जास्त असतात. बाजारात आंबा देखील मोठ्या प्रमाणात विक्रीस आहे. आंब्याचे दर देखील कमी झाले आहेत. हापूस 250-300 रुपये किलो दराने उपलब्ध आहे. तर बदाम आंबा 100-150 रुपये किलो, लालबाग 150-2 00 रुपये किलो, कर्नाटक हापूस 200 रुपये किलो असा दर आहे. फळांचे दर प्रतिकिलो पुढीलप्रमाणे सफरचंद 200 - 250 रुपये, मोसंबी 100, संत्री 160, डाळिंब 200 - 250, पेरू 120रुपये, अंजीर 200 - 250रुपये, पपई 60 रुपये, द्राक्षे 400, कलिंगड 20 - 25 रुपये, आंबा बदाम 150.

# पिंपरीत उन्हाळ्याचा तडाखा; जलतरण तलावांवर मोठी गर्दी

## तापमान ४१ अंशांवर; नागरिकांचा ‘थंडा थंडा कुल कुल’ अनुभवासाठी पूलांकडे ओढा

पिंपरी (दै. संध्या)

मे महिन्यात उन्हाची तीवता वाढल्याने शाळकरी मुले, महिला, नागरिकांची कडाक्याच्या उन्हापासून आराम मिळण्यासाठी तसेच ‘थंडा थंडा-कुल कुल’ राहण्यासाठी जलतरण तलावांकडे धाव घेत आहेत. पोहणे हा केवळ एक व्यायाम नसून, उन्हाळ्यात शरीर थंड ठेवण्याचा एक उत्तम उपाय मानला जात आहे. मे महिन्यात तापमानाचा पारा एक्केचाळीसवर गेल्यामुळे पिंपरी शहरातील कै. अण्णासाहेब मगर जलतरण तलावांवर सकाळ आणि संध्याकाळच्या वेळी पोहणाऱ्यांची मोठी गर्दी होत आहे.



सध्या शाळेला उन्हाळ्याची सुट्टी असल्याने लहान मुले आणि तरुण पोहण्याचा आनंद लुटत आहेत. त्यामुळे पिंपरीतील नेहरुनगर येथील कै. अण्णासाहेब मगर जलतरण तलावाकडे “थंडाथंडा” कुलकुल, उष्णतेपासून आराम मिळावा यासाठी शाळकरी मुले, तरुणाची संख्या सध्या वाढत चालली आहे. या गर्दीला आवर घालण्यासाठी जलतरण तलावांवर अनुभवी जीवरक्षक तैनात करण्यात आले आहेत. सुरक्षेचे कडक नियम लागू केले आहेत. या जलतरण तलावाकडे स्वच्छतेची काळजी, पाण्याचे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी आणि स्वच्छतेसाठी व्हॅक्यूम क्लीनिंग आणि निर्जंतुकीकरण नियमित केले जाते. शहरातील वाढत्या तापमानात मनसोक्त पोहून उष्णतेवर मात करण्यासाठी जलतरण तलाव हा एक उत्तम पर्याय ठरत आहे. तलावात स्वच्छ पाणी, स्वच्छतागृहे, शॉवर रूम, पिण्याचे पाणी या सुविधा येथे आहेत, असे पोहोचण्यासाठी येणारे नागरिक सांगतात. या तलावाच्या देखरेखीसाठी सुरक्षारक्षक तैनात असतात. शिवाय एक सफाई कामगार आठ जीवरक्षक, सहा प्रशिक्षक या तलावाचे काम पाहतात. महिलांसाठी स्पेशल बॅच असतात. सकाळी दहा ते अकरा, सायंकाळी चार ते पाच वाजेपर्यंत चालू असते. सकाळी सहा ते दहा, सायंकाळी पाच ते रात्री नऊ सर्व साधारण मिक्स बॅच असतात. महिला व पुरुष तिकीट सर्व साधारण जनरल ऑनलाईन बुकिंग वीस रुपये आहे.

तलावाकडे जाण्यासाठी व्यवस्थित रस्ता नाही. रस्त्याची दुरवस्था झाली आहे. तरी महापालिका प्रशासनाने जलतरण तलावाकडे येण्या-जाण्याचा रस्ता व्यवस्थित करावा. **- गणेश कांबळे, नागरिक**

या तलावाचे पाणी रोज तपासणी केली जाते. पोहोण्याआधी शॉवरचे पाणी घेतले जाते. दुपारी कधीतरी पाण्याची कमतरता भासत असते. बाकी या जलतरण तलावाला मुबलक प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध करावा. पुलाजवळ उन्हाळ्यात उष्णतेपासून आराम मिळण्यासाठी निवारा शेड उभारावे. **- प्रसाद ढोके, व्यवस्थापक, कै. अण्णासाहेब मगर जलतरण तलाव, नेहरुनगर**

## थोडक्यात पण महत्वाचे...



## आमदार सोनवणे यांच्या निधीतून रस्ते व गटारांची कामे लागणार मार्गी

नारायणगाव (दैनिक संध्या) : ओतूर (ता. जुन्नर ) येथे आमदार शरददादा सोनवणे यांच्या हस्ते विविध विकास कामांचा भूमीपूजन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. त्यामध्ये आमदारांच्या स्थानिक विकास निधीतून ओतूर परिसरासाठी एकूण 65 लक्ष रुपयांची कामे मंजूर करण्यात आली आहेत. वॉर्ड क्रमांक 3 मधील शनी मंदिरामागील ठीकेकर बोळ रस्त्याचे काँक्रिटीकरण (दहा लक्ष), शनि मंदिर ते स्मशानभूमी रस्ता कॉंक्रिटीकरण (दहा लक्ष ),कन्या विद्यालय रस्ता कॉंक्रिटीकरण (15 लक्ष) भोई गल्ली येथे सभामंडप उभारणे (10 लक्ष) आणि गोदरेज आधारे भांबूर्डीकर घरापर्यंत बंदिस्त गटात तयार करणे (20 लक्ष) या कामांचा समावेश आहे. यावेळी या सोहळ्यास शिवसेना उपतालुका प्रमुख विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे संचालक धनंजय डुंबरे,बाजार समिती मा.उपसभापती दिलीप डुंबरे, शरद सहकारी बँकेचे मा.संचालक विनायकशेठ तांबे, कपर्दिकेशवर देवधर्म संस्थेचे अध्यक्ष अनिलशेठ तांबे, ओझर विघ्नहर देवस्थान ट्रस्ट मा.अध्यक्ष मंगेश मांडे, वसंतआप्पा डुंबरे, युवासेना जिल्हा प्रमुख सचिन घोलप, शिवसेनेच्या युवा नेत्या सौ.अक्षदा पानसरे/मांडे, मा.पंचायत समिती सदस्य महेंद्र सदाकाळ, शिवसेना सोशल मीडिया विधानसभा प्रमुख मयुरेश तांबे, शिवसेना युवानेते ऋषी डुंबरे, युवासेना उपतालुका प्रमुख विनोद हाडवळे, शिवसेना ओतूर शहर प्रमुख प्रसाद डुंबरे, शहर समन्वयक उमेश डुंबरे, युवासेना ओतूर शहर प्रमुख राजवर्धन डुंबरे, शहर समन्वयक मेघराज तांबे, बुधाजी शिंगाडे, प्रसाद पानसरे, उद्योजक देवा पानसरे, अमोल मोरे, उद्योजक प्रविण भांबुर्डेकर, नितीन डुंबरे, मारुती अहिनवे, सुयोग कवडे, किरण डोके, योगेश हांडे, ऋषिकेश तांबे, ईश्वर गवांदे, सुजित भोर व इतर शिवसेना युवासेना पदाधिकारी, इतर प्रतिष्ठित मान्यवर आजी माजी पदाधिकारी, शिवसैनिक व ओतूर ग्रामस्थ उपस्थित होते.

## जुन्नर तालुकाप्रमुखपदी गाडगे यांची तर जुन्नर विधानसभाप्रमुखपदी रासकर यांची निवड



नारायणगाव (दैनिक संध्या) : पुणे जिल्ह्यातील शिवसेना उबाठा पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात आली. त्यामध्ये जुन्नर तालुका प्रमुख पदी जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भास्कर गाडगे यांची तर जुन्नर विधानसभा प्रमुख पदी आनंद रासकर यांची निवड करण्यात आली. निमगाव सावा येथील भास्कर गाडगे यांची तालुका प्रमुख पदी निवड झाल्याबद्दल त्यांनी पक्षाच्या आदेशाचे नेहमी पालन करून आपल्या पदाला पूर्ण न्याय देणार असल्याचे सांगितले.तर आनंद रासकर यांची विधानसभा प्रमुखपदी निवड झाल्याबद्दल त्यांनी पक्ष संघटन मजबूत करणे, युवकांना एकत्र आणणे आणि पक्षाने टाकलेला विश्वास सार्थ ठरवणार असल्याचे सांगितले.



## चाकण येथे कामगारांना फळ वाटप

चाकण (दैनिक संध्या) : कामगार दिन, बुध्द पौर्णिमा व महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून चाकण येथे अनिलभाऊ मोरे युवा मंचच्या वतीने कामगारांना फळवाटप करण्यात आले. आरपीआय कामगार आघाडीचे प्रदेश कार्याध्यक्ष अनिल मोरे यांच्या हस्ते फळ वाटप करण्यात आले. याप्रसंगी आरपीआय कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष वैभव रोकडे, बाप्पू हटाळे, शेखर गायकवाड आदी मान्यवर, कामगार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनिल मोरे यांनी यावेळी सांगितले की," चाकण येथील तळेगाव चौकातील कामगार नाक्यावर दररोज सकाळी कामासाठी गरजू नागरिकांची तोबा गर्दी होत असते. त्यांना दिलासा देण्यासाठी फळ वाटप करण्यात आले.

## चाकण नगरपरिषदेच्या वतीने संगीता नाईकरे यांचा सन्मान

चाकण (दैनिक संध्या) : जो दुसऱ्यांचं भलं इच्छितो, त्यांचं देवही भलं करतो, हे ब्रीद सत्यात उतरवणाऱ्या येथील शिव स्वराज्य युवा प्रतिष्ठानच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या संगीता दशरथ नाईकरे पाटील यांचा भैरवनाथ यात्रेनिमित्त चाकण नगरपरिषदेच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. येथे आयोजित करण्यात आलेल्या एका भरगच्च कार्यक्रमात चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे व नगरसेविका जयश्री नायकवाडी यांच्या हस्ते संगीता नाईकरे पाटील यांचा शाल, श्रीफळ, मानचिन्ह व गौरवपत्र देऊन विशेष सन्मान करण्यात आला. याप्रसंगी चाकण नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुशराव जाधव, गटनेते नितीन गोरे, विरोधी पक्षनेते प्रकाश भुजबळ, नगरसेविका रूपाली कांडगे, जयश्री नायकवाडी, साधना गोरे, उद्योजक विशाल नायकवाडी, माजी नगरसेवक राहुल कांडगे, हर्षद लेंडघर, आरती परदेशी, पुनम शेवकरी, स्वाती लेंडघर, सुनिता गोरे, मंगेश कांडगे, साहेबराव कड, विकास धाडगे, धीरज मुटके आदी मान्यवर उपस्थित होते. संगीता नाईकरे यांचे समाजासाठी मोठे योगदान आहे. निराधार लेकरांना मदतीचा हात देणे, विधवा, परित्यक्ता, मनोरुग्ण, गरजू नागरिकांना सहकार्य करणे, घटस्फोटीत व अन्याय झालेल्या महिलांना न्याय देण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

## सासऱ्याकडून सुनेची हत्या, 6 महिन्यांच्या बाळासमोरच भिंतीवर डोकं आपटलं अन्...

धायरी (दैनिक संध्या) : पुण्यातील धायरी येथे एका सासऱ्याने आपल्या ३१ वर्षीय सुनेची निर्घृण हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. आरोपीने सुनेचे डोके भिंतीवर आपटून आणि दगडाने मारहाण करत तिला जागीच ठार केले. हत्या केल्यानंतर आरोपी घराला कुलूप लावून फरार झाला. या घटनेने पुणे शहर हादरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना धायरीतील रायकर मळा परिसरात शनिवारी घडली. स्वाती तेजस चौधरी (वय ३१) असे मृत महिलेचे नाव आहे. आरोपी भानुदास भास्कर चौधरी (वय ५७) हा स्वातीचा सासरा आहे. स्वातीचा पती तेजस चौधरी शिवाजीनगर कोर्टात क्लार्क म्हणून कार्यरत आहेत. शनिवारी सकाळी तेजस नेहमीप्रमाणे कामावर गेले होते. घरात स्वाती, तिचे केवळ सहा महिन्यांचे बाळ आणि सासरा भानुदास हे तिघे होते.

# युवा पिढीला प्रेरणा देण्यासाठी कर्तृत्ववान नागरिकांचा सन्मान

**चाकण नगरपरिषदेचा पुढाकार**

चाकण (दै. संध्या)

युवा पिढीला प्रेरणा देण्यासाठी भैरवनाथ महाराजांच्या यात्रेचे औचित्य साधून चाकण नगरपरिषदेच्या वतीने कर्तुत्वान नागरिकांचा सन्मान करण्यात आला.

चाकणला भैरवनाथ महाराजांच्या उत्सवाच्या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेने यावर्षी पासून अत्यंत अर्थपूर्ण आणि प्रेरणादायी सामाजिक उपक्रम सुरू केला आहे. नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, मुख्याधिकारी डॉ. अंकुश साहेबराव जाधव, गटनेते नितीन गोरे, ॲड. वर्षा शेवकरी, साधना गोरे, अनिल लोहकरे, प्रकाश भुजबळ, हर्षद लेंडघर, ॲड. प्रकाश गोरे आदींच्या संकल्पनेतून हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. समाजातील विविध क्षेत्रांतील अग्रगण्य असणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देणे, त्यांच्या कामगिरीचा सार्वजनिकरित्या सन्मान करून समाजात त्यांची ओळख निर्माण करणे, युवा पिढीला प्रेरणा



देऊन समाजकार्य, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात सक्रिय सहभागी करून घेण्यासाठी प्रोत्साहन देणे अपेक्षित असते. त्यामुळे हा उपक्रम सुरू करण्यात आला असल्याचे चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव व नगराध्यक्षा मनिषा गोरे यांनी सांगितले.

कर्तुत्वान व्यक्तिमत्व म्हणून संदीप जाधव, वसंत गोरे, सुन्नाबी युसूफमियां सिकिलकर, विशाल बारवकर, कुमार गोरे, अनिल जोशी, मयूर वाडेकर, पांडुरंग गोरे, संगीता नाईकरे, अरुण साळुंके, निखिल सुरेंदरसिंह राजपूत, मनोहर मोहरे, पुष्पलता पिंगळे, सुदाम दरवडे, सुरेखा गालफाडे, निता शेवकरी, प्रभा वाघ, आकाश फुलसुंदर, गणेश शेवकरी, अमृत शेवकरी, दत्तात्रय गोरे, राजेंद्र शिंदे, प्रणव सोरटे, बंडोपंत ढेंबे, राजेंद्र राऊत, नीलेश सातव, सुरेश भुजबळ, पृथ्वीराज पवार, दिलीप परदेशी, सुर्यकांत मुटके, प्रकाश मुटके, सुनील शहा, प्रशांत उर्फ बिपिन रासकर, शरद लेंडघर आदींना गौरविण्यात आले.

> "चाकणला यात्रेत भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून चाकण नगरपरिषदेने मोफत पाणी व टोप्यांचे वाटप केले. युवा पिढीला समाजकार्य, क्रीडा, सांस्कृतीक क्षेत्रात पुढाकार घेण्यासाठी प्रोत्साहन मिळावे याकरिता कर्तुत्वान नागरिकांचा विशेष सन्मान करण्यात आला. नगरपरिषदेने केवळ धार्मिक यात्रेचे आयोजन केले नाही तर सामाजिक दायित्व जागृत करणारा, गुणवत्तेला गौरवणारा आणि भाविकांच्या कल्याणाचा विचार करणारा हा उपक्रम राबवून एक चांगला आदर्श निर्माण केला आहे."
>
> - नितीन गोरे, गटनेते, चाकण नगरपरिषद

## चिमुरड्यावर अत्याचार करणाराची बालसुधारगृहात रवानगी

चाकण (दै. संध्या)

**खालुंब्रे येथे घडला होता प्रकार**

तीन वर्षीय बालकावर लैंगिक अत्याचार करून त्याची निर्घृण हत्या करणाऱ्या अल्पवयीन नराधमाची बालसुधारगृहात रवानगी करण्यात आली आहे. खेड तालुक्यातील खालुंब्रे येथे हा प्रकार घडला होता. रियान्सू कमलेश रावत (वय ३ वर्षे) असे खून झालेल्या बालकाचे नाव आहे.

सीमा कमलेश रावत (वय ३० वर्षे, सध्या रा. खालुंब्रे, ता. खेड, मुळगाव लालगाव, मोहरिया, ता. सिरमल, जि. रिवा, मध्यप्रदेश) यांनी याप्रकरणी महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. अल्पवयीन आरोपी खून करून बिहारमध्ये फरार होण्याच्या तयारीत असतानाच महाळुंगे पोलिसांनी या भागातील सीसीटीव्ही, तांत्रिक व गोपनीय माहितीनुसार आरोपीचा शोध घेऊन त्यास पुणे रेल्वे स्टेशन येथून शिताफीने ताब्यात घेऊन बेड्या ठोकल्या आहेत.

पिंपरी - चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. महावरकर, अप्पर पोलीस आयुक्त सारंग आव्हाड, अप्पर पोलीस आयुक्त बसवराज तेली, पोलीस उपायुक्त श्वेता खेडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त महाळुंगे विभाग सचिन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली महाळुंगे इंगळे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय ढमाळ, राजकुमार हनुमंते, योगेश तिडके प्रशांत कसबे, शिवाजी मरकड आदींनी ही कामगिरी केली.

## गोळेगाव येथे मोफत शिवणकला प्रशिक्षण समारोप

### *दोन गरजू महिलांना शिलाई मशीनचे वाटप*

जुन्नर (दै. संध्या)

डिसेंट फाउंडेशन, पुणे , हायस्पीड स्किल हब जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने " मोफत शिवणकला प्रशिक्षण समारोप तसेच प्रमाणपत्र वाटप" हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता,त्याचा सांगता समारंभ गोळेगाव येथे संपन्न झाला.



यावेळी डिसेंट फाउंडेशनच्या वतीने सौ साधना प्रीतम काळे व सौ कुंदा अनिल जाधव या दोन आदिवासी कुटुंबातील गरजू महिलांना शिलाई मशीन चे वाटप करण्यात आले. ४० दिवसांच्या या प्रशिक्षणामध्ये महिलांना शिवणकलेचे सखोल मार्गदर्शन देण्यात आले तसेच त्यांना प्रमाणपत्र देण्यात आले . या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी बनविणे व रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा असल्याचे डिसेंट फाउंडेशचे संस्थापक जितेंद्र बिडवई यांनी यावेळी सांगितले .

या प्रसंगी जुन्नर पंचायत समितीच्या सभापती कमलताई शेळकंदे , जिल्हा परिषद सदस्या डॉ छायाताई तांबे ,सोनाबाई दाभाडे ,पंचायत समिती सदस्या निलमताई आमले , हायस्पीड स्किल हबचे संस्थापक दिलीप भगत,डिसेंट फाउंडेशचे सचिव डॉ .एफ.बी.आतार,संचालक आदिनाथचव्हाण,पांडुरंग तोडकर, संदीप ताजने, गणेश मेहेर, बेलसर च्या सरपंच नीता ताजने, गोळेगावच्या माजी सरपंच अलकाताई, ज्योती डोके ,पोलीस पाटील कविता बिडवई ,सुचित्रा कोकणे ,पल्लवी वाणी ,सुशीला शेटे ,प्रशिक्षक छाया पाटील, अर्चना ताम्हाणे ,मनिषा काळे व प्रशिक्षणार्थी महिला उपस्थित होत्या.

गरजू महिलांना जिल्हा परिषदेच्या महिला बालकल्याण विभागामार्फत रबविल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी कटीबद्ध असल्याचे मत यावेळी सभापती व जिल्हा परिषद सदस्यांनी यावेळी व्यक्त केले.

## गुणवत्तावाढीसाठी सातत्याने उपक्रम राबविणार : सभापती खुशी बोरुंदिया

आळंदी (दै. संध्या)

**आळंदीत "आदर्श विद्यार्थी पुरस्कार २०२६" प्रदान करून गौरव**

"शिक्षण समितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येतील. आदर्श विद्यार्थी पुरस्कार हा विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा, शिस्तीचा आणि जिद्दीचा गौरव असून यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व स्पर्धात्मक वृत्ती वाढीस लागते," असे मत शिक्षण समिती सभापती खुशी बोरुंदिया यांनी व्यक्त केले. आळंदी नगर परिषद शाळांतील विद्यार्थ्यांचा "आदर्श विद्यार्थी पुरस्कार २०२६" सोहळा उत्साहात पार पडला, यावेळी त्या बोलत होत्या.

आळंदी नगरपरिषद शाळा क्रमांक १ ते ४ मधील सुमारे २७०० विद्यार्थ्यांपैकी निवडक ८ विद्यार्थ्यांना "आदर्श विद्यार्थी पुरस्कार २०२६" प्रदान करून गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच सांस्कृतिक, क्रीडा व विविध कलागुणांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या उल्लेखनीय कार्याचे कौतुक करणे तसेच इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला असल्याचे मुख्याधिकारी खांडेकर यांनी सांगितले.

पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांमध्ये श्रेया किसन कदम, चंद्रकांत सुरेश कदम, विराट अशोक दुगाने, श्रुतिका नारायण भिसे, समाधान मधुकर कुकर, आधारा तुकाराम होले, इश्वरी बाबासाहेब सरवदे आणि समृद्धी मारोती साठे यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांची निवड उपस्थिती, परीक्षेतील गुणांकन, शिष्यवृत्ती निकाल, शालेय उपक्रमातील सहभाग, क्रीडा कामगिरी, शिस्त, सातत्य व चारित्र्य या निकषांवर करण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनी विद्यार्थ्यांमधील गुण ओळखून त्यांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे ही सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. कार्यक्रमास उपनगराध्यक्ष, सभापती, नगरसेवक तसेच नगरपरिषद शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सुनेत्रा अजित पवार यांनी बारामतीकरांना दिला विश्वास

बारामती (दै. संध्या)

आज बारामती विधानसभा पोटनिवडणुकीचा निकाल जाहीर होत असताना आपण सर्वांनी आपल्या मतांमधून दाखवलेला विश्वास आदरणीय अजितदादांच्या पवित्र स्मृतींना समर्पित करते अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी 'एक्स' वर ट्वीट करत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. आजचा हा निकाल जाहीर होत असताना आदरणीय दादांच्या आठवणींना उजाळा मिळाल्याने आपण सर्वजण भावूक आहोत. दादांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना, या विजयाचा जल्लोष म्हणून कुणीही मिरवणुका काढू नयेत किंवा गुलाल उधळू नये. आपण संयम राखूया आणि दादांच्या विचारांना साजेसं वर्तन करूया अशी विनंती सुनेत्रा अजित पवार यांनी केली आहे. दादांच्या स्वप्नातील बारामती घडवण्याची संधी दिल्याबद्दल सर्व बारामतीकरांचे मनःपूर्वक आभार मानतानाच हा शेवट नाही, ही तर फक्त सुरुवात आहे.

## किलाचंद कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावी निकाल ९३ टक्के

नीरा (दै. संध्या)

नीरा येथील किलाचंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बारावी परीक्षेत यंदा उल्लेखनीय यश संपादन केले असून एकूण निकाल 92.73 टक्के लागला आहे. विशेष म्हणजे विज्ञान शाखेचा निकाल तब्बल 97.70 टक्के लागून महाविद्यालयाने उत्कृष्ट कामगिरीची नोंद केली आहे. या महाविद्यालयातील विज्ञान शाखेतून 131 विद्यार्थी परीक्षेला बसले होते, त्यापैकी 128 विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या शाखेत कु.सई सचिन जाधव



हिने 82.17 टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. चौंडकर कुणाल मल्हारी याने 80.50 टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर कु. दुर्गाडे अनुराधा गजानन हिने 78.83 टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला.

## शिवसंस्कार शिबिरे ही काळाची गरज - ॲड. किरण झिंजुरके

चाकण (दै. संध्या)

शिवसंस्कार शिबिरे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे संस्थापक - अध्यक्ष ॲड. किरण झिंजुरके यांनी येथे व्यक्त केले.



चाकण येथील ऐतिहासिक श्री संग्रामदुर्ग किल्ल्यात शिवसंस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ॲड. झिंजुरके बोलत होते. यावेळी डॉ. संदीप महिंद व ॲड. झिंजुरके यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन करून प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष राहुल वाडेकर, योगेश साखरे, निवृत्त शिक्षक राजू दिक्षित, विजय ठाकूर, अरुणा सावंत, सागर अकुल, ॲड. किशोर झिंजुरके आदी उपस्थित होते. योग शिक्षक सागर अकुल, अरुणा सावंत आदींनी शिवसंस्कार शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना योगासनांचे प्रशिक्षण दिले. तसेच आपल्या आयुष्यातील योगाचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. ॲड. किरण झिंजुरके यांच्या नेतृत्वाखाली सलग दहा दिवस सुरू राहणाऱ्या या शिबिरात तीनशे विद्यार्थी - विद्यार्थिनी सहभागी झाले आहेत. डॉ. संदीप महिंद व राजू दिक्षित यांनी यावेळी शिबिरार्थींना संग्राम दुर्ग किल्ल्याची इत्यंभूत माहिती दिली.

बाबासाहेब दिघे यांनी सहभागी विद्यार्थ्यांना लाठीकाठीचे व लेझीमचे प्रशिक्षण दिले. नामदेव पानसरे, भानुदास डोंगरे, डॉ. किशोर घुमटकर, अरुण जाधव, बाबासाहेब दिघे, माऊली ताटे आदींनी या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले.


# आदिवासी कोळी मल्हार समाजाचा भव्य महा मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न

भिवंडी (दै. संध्या)

पालघर जिल्ह्यातील मनोर येथील शगुन ग्राउंडवर आदिवासी कोळी मल्हार समाजाचा सातवा महा मेळावा जल्लोषात संपन्न झाला. समाजाची परंपरा, संस्कृती, भाषा आणि ओळख जपण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्याला समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पालघर, डहाणू, वाडा, भिवंडी, विक्रमगड, मुरबाड,वसई तसेच ठाणे आणि मुंबई परिसरातून हजारोंच्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. या मेळाव्याला माजी आमदार अविनाश




सुतार, आमदार विलास तरे, माजी आमदार राजेश पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली. तसेच विविध क्षेत्रातील सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवर देखील उपस्थित होते. मेळाव्यात आदिवासी संस्कृती, पेसा कायदा,जात पडताळणीतील अडचणी आणि समाजाच्या हक्कावर सविस्तर चर्चा करण्यात आली,आदिवासी चित्रकला ,परंपरा आणि संस्कृती दर्शवणारी दालने हे मेळाव्याचे विशेष आकर्षण ठरले,या वेळी शिक्षण , एकता आणि स्वावलंबनावर विशेष भर देण्यात आले, वकील, डॉक्टर, इंजिनीयर, क्रीडा, समाजसेवक आणि इतर क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या गुणवंतांचा सत्कार करण्यात आला, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या मेळाव्याने समाजाच्या प्रगतीसाठी नवा दिशादर्शक निर्माण केल्याची भावना उपस्थित्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी विशेषतः समाजातील धावलेरी महिला, भगत व पालघर जिल्ह्यातील उपस्थित यूट्यूब कलाकारांचाही यथोचित सन्मान करण्यात आला. या महामेळाव्या प्रसंगी आदिवासी कोळी मल्हार समाजाची लुप्त होत चाललेली व संस्कृती परंपरा वाद्यनाथ गाणे इत्यादी केलेल्या संस्कृतीची ओळख टिकवण्यासाठी यावेळी या समाजातील चालीरीती रूढी परंपरा इत्यादींवर आदिवासी कोळी मल्हार समाजातील लेखक व कवी लिखित "निहरी काहणी" विशेषांकाचेही प्रकाशन करण्यात आले. समाजाची परंपरा संस्कृती भाषा आणि ओळख जपण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या आलेल्या या मेळाव्यास समाज बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पालघर, ठाणे जिल्ह्यातील आणि मुंबई परिसरातून हजारोंच्या संख्येने समाज बांधव सहकुटुंब उपस्थित होते.या मेळाव्याला कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार अविनाश सुतार, मार्गदर्शक व सल्लागार आमदार विलास तरे, माजी आमदार राजेश पाटील, माजी जिल्हा परिषद ठाणे समाज कल्याण सभापती पांडुरंग बेलकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पालघर जिल्हा उपाध्यक्ष अशोक भोईर, डहाणू पंचायत समिती सदस्य अरुण कदम, डहाणू पंचायत समिती माजी सभापती स्नेहलता सातवी, आदिवासी मल्हार कोळी समाजाचे अध्यक्ष विलास बेलकर, भिवंडी महानगरपालिकेमधील सेवानिवृत्त सहाय्यक आयुक्त (शिक्षण) सुनील झळके उपस्थित होते आणि इतर मान्यवर उपस्थित होते.




## लवकर निदान आणि वेळेवर उपचार हर्नियाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी महत्त्वाचे आहेत

**पुणे (दै. संध्या)**

हर्निया ही एक सामान्य पण अनेकदा दुर्लक्षित केली जाणारी समस्या आहे, ज्याच्यावर वेळेत उपचार न केल्यास जीवनाच्या गुणवत्तेवर लक्षणीय परिणाम होऊ शकतो. ही अवस्था तेव्हा निर्माण होते जेव्हा एखादा अवयव किंवा ऊतक आसपासच्या स्नायूमधील कमकुवत भागातून बाहेर ढकलले जाते. जड वजन उचलणे, दीर्घकालीन खोकला, स्थूलता आणि मागील शस्त्रक्रिया अशा बाबी याचा धोका वाढवू शकतात.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार, हर्नियासह उपचार न केलेल्या शस्त्रक्रियेसंबंधित आजारांमुळे जागतिक रोगांच्या भारात लक्षणीय वाढ होते. नॅशनल सेंटर फॉर बायोटेक्नॉलॉजी इन्फॉर्मेशनच्या आकडेवारीनुसार, सुमारे २७% पुरुषांना आणि ३% महिलांना आयुष्यात कधी ना कधी इन्ग्वायनल हर्नियाचा त्रास होतो. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय देखील गुंतागुंत टाळण्यासाठी लवकर निदान आणि वेळेवर शस्त्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित करते.

हर्निया अनेकदा जांघेत, पोटात किंवा पूर्वीच्या शस्त्रक्रियेच्या जागेजवळ लहान, वेदनारहित सूज म्हणून सुरू होतो, त्यामुळे अनेकजण त्याकडे दुर्लक्ष करतात. मात्र सुरुवातीची लक्षणे म्हणजे ओढल्यासारखी भावना, सौम्य अस्वस्थता, बराच वेळ उभे राहिल्यानंतर दाब जाणवणे आणि पोटात जडपणा किंवा फुगल्यासारखे वाटणे अशी असू शकतात. ही लक्षणे लवकर ओळखून वैद्यकीय सल्ला घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

निदान सामान्यतः शारीरिक तपासणीद्वारे सोपे असते, तर काही निवडक प्रकरणांमध्ये इमेजिंगचा वापर केला जातो. लवकर निदान झाल्यास उपचार अधिक सोपे आणि प्रभावी ठरतात.

> हर्निया उपचारपद्धतीतील प्रगतीमुळे उपचार अधिक सुरक्षित आणि कार्यक्षम झाले आहेत. अतिशय कमी हानिकारक तंत्रांमध्ये लहान चिरे दिले जातात, ज्यामुळे वेदना कमी होतात, बरे होण्याचा कालावधी कमी होतो आणि रुग्णालयात कमी दिवस राहावे लागतात. प्रभावित भाग मजबूत करण्यासाठी सर्जिकल मेशचा वापर केल्याने पुन्हा होण्याचा धोका कमी होतो आणि रुग्ण दैनंदिन कामे पुन्हा आरामात सुरू करू शकतात.

"माझ्या प्रॅक्टिसमध्ये, मी अनेक रुग्णांवर उपचार केले आहेत ज्यांना सुरुवातीला फक्त एक छोटी सूज जाणवली होती. उपचार न केल्यास ही अवस्था कशी वाढू शकते हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. वेळेवर हस्तक्षेप केल्यास, प्रक्रिया किती सोपी आहे आणि दुरुस्तीनंतर सूज व अस्वस्थता यांसारखी लक्षणे किती लवकर सुधारतात हे पाहून रुग्णांना दिलासा मिळतो," असे डॉ. परमेश्वर भाम्ब्रे यांनी सांगितले.

उपचार उशिरा केल्यास इन्कारसेरेशन म्हणजेच ऊतक अडकून पडणे किंवा स्ट्रँग्युलेशन, ज्यात आपत्कालीन उपचारांची गरज असलेली गंभीर अवस्था होणे यांसारख्या गुंतागुंती निर्माण होऊ शकतात.

"मी माझ्या रुग्णांना नेहमी सांगतो की हर्नियाचा उपचार हा केवळ दिसणारी सूज दुरुस्त करण्यापुरता मर्यादित नसून, गुंतागुंत टाळणे आणि एकूण जीवनमान सुधारण्याबद्दलही आहे. वेळेवर उपचारानंतर अनेक रुग्णांना हालचालीत सुधारणा, झोपेत सुधारणा आणि दैनंदिन दिनक्रमात लवकर परतण्याचा अनुभव येतो," असे डॉ. विनायक क्षीरसागर यांनी सांगितले.

> निकोप वजन राखणे, जास्त ताण टाळणे आणि सततचा खोकला असल्यास त्यावर उपचार करणे यामुळे धोका कमी होऊ शकतो. जागरूकता वाढवणे, लवकर निदान आणि वेळेवर उपचार हे प्रभावी हर्निया व्यवस्थापन आणि दीर्घकालीन आरोग्यासाठी महत्त्वाचे घटक आहेत.

# पिंपरी-चिंचवडमधील वीज समस्या सुटणार

- पिंपरी, चिंचवड, थेरगाव, रावेत, देहूगाव येथे उपकेंद्र होणार
- ताथवडेत अतिउच्चदाब केंद्र
- खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती
- तळेगाव एमआयडीसीतील औद्योगिक ग्राहकांना सुरळित वीजपुरवठा



**पिंपरी (दै. संध्या)**

मावळ लोकसभा मतदारसंघातील पिंपरी, चिंचवड आणि मावळमधील भविष्यातील लोकसंख्या विचारात घेऊन वीज यंत्रणा सक्षम केली जाणार आहे. पुढील २० वर्षे डोळ्यासमोर ठेऊन वीज पुरवठ्याचे नियोजन केले जात आहे. त्यानुसार पिंपरी, चिंचवड, थेरगाव, रावेत, तीर्थक्षेत्र देहूगाव येथे उपकेंद्राची निर्मिती केली जाणार आहे. रहाटणीतही उतिउच्चदाब केंद्र सुरु केले जाणार असून नवीन रोहित्र बसविले जाणार आहेत. ताथवडेत अतिउच्चदाब केंद्र उभारण्यात येणार असल्याची माहिती शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली.

मावळ लोकसभा मतदारसंघातील पिंपरी, चिंचवड आणि मावळ विधानसभेतील विद्युत विषयक कामासंदर्भात खासदार श्रीरंग बारणे यांनी महावितरणाच्या पुण्यातील मुख्य कार्यालयात आढावा बैठक घेतली. चालू असलेली कामे, प्रलंबित कामे आणि प्रस्तावित कामांचा खासदार बारणे यांनी आढावा घेतला. प्रादेशिक संचालक सुनील काकडे, गणेशखिंड विभागाचे अधीक्षक अभियंता सिंहजीराव गायकवाड, ग्रामीणचे अधीक्षक अभियंता युवराज जरग, संजय नेते, कार्यकारी अभियंता सोमनाथ मुंडे, शेखर मुरकुटे, केशव काळुमाळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेश खांडभोर यावेळी उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, मामुर्डीतील उपकेंद्राचे मजबुतीकरण केले जाणार आहे. २२ केव्हीची भूमिगत वाहिनी टाकली जाणार आहे. थेरगाव, चिंचवड, रावेत, पिंपरी येथे उपकेंद्र कार्यान्वित केली जाणार आहेत. त्याअंतर्गत विविध कामे सुरु केली आहेत. देहूगाव येथे उपकेंद्राची निर्मिती केली जाणार आहे. ताथवडे येथे अतिउच्चदाब नवीन उपकेंद्र मंजूर आहे. यशदाच्या जागेत हे अतिउच्चदाब हे उपकेंद्र सुरु होणार आहे. येथील जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. रहाटणीतही उतिउच्चदाब केंद्र सुरु केले जाणार असून नवीन रोहित्र बसविले जाणार आहेत. त्याचे काम प्रगतीपथावर आहे. तळेगाव एमआयडीसीतील आंबीतील अतिउच्चदाब केंद्राची क्षमता वाढविण्यात येणार आहे. याबाबतचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

खासदार बारणे म्हणाले, विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे विविध कामे हाती घेतली जाणार आहे. विद्युत विषयक कामांसाठी जिल्हा नियोजन समितीमधून निधी ठेवला जातो. त्यासाठी यंदा १७ कोटींचा निधी ठेवला आहे. प्रधानमंत्री सुर्यघर योजनेअंतर्गत जास्तीत-जास्त लोकांपर्यंत जाऊन रुफटॉप सोलर बसवून द्यावेत. स्मार्ट मीटर बसविण्याबाबत जनजागृती करावी. त्यांच्या तक्रारींचे निराकरण करुन मीटर बसवावेत. सबस्टेशनसाठी केंद्र सरकारकडून राज्य सरकारला जास्तीत-जास्त निधी आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. आत्तापर्यंत सर्वाधिक निधी महाराष्ट्राला मिळाला आहे.

मावळ तालुक्यात तळेगाव दाभाडे, उर्से, अंबी, लोणावळा, पवनानगर येथे अति उच्चदाब केंद्र कार्यान्वित आहेत. लोणावळ्यात नांगराव येथे, तळेगाव दाभाडेतील अंबी, माळवाडी, मिंडेवाडी येथे लघुदाब व स्विचिंग उपकेंद्र कार्यान्वित आहे.

यामुळे तळेगाव एमआयडीसी परिसरातील औद्योगिक ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा सुरु झाला आहे. भंडारा डोंगर येथे विद्युतीकरणाची एक कोटी ३९ लाखांची कामे पूर्ण केली असल्याचेही बारणे यांनी सांगितले.

### गहुंजेत नवीन अतिउच्चदाब केंद्र

मावळ लोकसभा मतदारसंघातील विद्युत कामांसाठी जिल्हा नियोजन समितीमधून दरवर्षी मोठी निधी मंजूर करुन घेतला जातो. त्यातून विविध कामे केली आहेत. राजमाची गाव विद्युतीकरणासाठी एक कोटींचा निधी मंजूर आहे. वडेश्वर येथे नवीन उपकेंद्राचे काम प्रगतीपथावर आहे. गहुंजे येथे नवीन अतिउच्चदाब केंद्र प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यामुळे तळेगावातील अति उच्चदाब केंद्रावरील भार कमी होणार असून मावळ तालुक्यातील ग्राहकांना अंखडित वीज पुरवठा होण्यास फायदा होणार आहे. मिडेंवाडीतील अतिउच्चदाब केंद्रामुळे चाकण फेज टू या केंद्राचा भार कमी होऊन तळेगाव एमआयडीसीतील उद्योगांना फायदा होईल. या केंद्राचे काम प्रगतीपथावर असल्याचेही खासदार बारणे यांनी सांगितले.

## दौंडमध्ये मध्यरात्री थरार! तरुणावर कुऱ्हाडीने सपासप वार

**दौंड (दै. संध्या)**

दौंड शहरातील संभाजीनगर परिसरात एका तरुणावर कुऱ्हाडीने जीवघेणा हल्ला केल्याची घटना रविवारी (ता.३) रात्री सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या हल्ल्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी दौंड पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली आहे.

राहुल गायकवाड असे जखमी झालेल्याचे नाव आहे. तर शाहीद मेहमूद शेख (रा. भीमनगर, दौंड) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी सोनी शाम जाधव (वय 30, रा. गोवागल्ली, संभाजीनगर, दौंड) यांनी दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सोनी जाधव या मावशी यलोबाई व भाऊ राहुल कुमार गायकवाड यांच्यासोबत रात्री सुमारे 12.15 वाजण्याच्या सुमारास घरासमोर बसून गप्पा मारत होत्या. याच वेळी आरोपी शाहीद शेख हा पाठीमागून आला आणि कोणतीही पूर्वसूचना न देता राहुल गायकवाड यांच्यावर कुऱ्हाडीने डोक्यावर सपासप वार केले.

या हल्ल्यात राहुल गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती आहे. या घटनेची माहिती मिळताच दौंड पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत आरोपीला अटक केली. या प्रकरणी दौंड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम 109(1), 351(3), 352 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रुपेश कदम करत आहेत.

## मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईच्या वतीने रवींद्र मालुसरे पुरस्कृत"निर्भीड जागल्या सन्मान पुरस्काराने,"गुरुनाथ तिरपणकर"सन्मानित

**मुंबई (दै. संध्या)**

वृत्तपत्र लेखक हा जागल्याचे काम करत असतो, महाराष्ट्र राज्याचे आणि मराठी माणसांचे मूलभूत प्रश्न सातत्याने आपल्या लेखणीतून व निर्भीडपणे लिहून जनजागृतीचे काम करीत असतो, त्यातीलच गुरुनाथ तिरपणकर हे आहेत.गुरुनाथ तिरपणकर यांची पत्रकारितेतील सुरुवात ही पत्र लेखनानेच झाली आहे.गेली३५वर्षे सामाजिक व पत्रकारिता, वृत्तपत्र लेखन क्षेत्रात कार्यरत आहेत, त्यांच्या कार्याची दखल सुवर्ण महोत्सवी वर्षात कार्य करणाऱ्या मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईने घेतली. नुकताच मधु शिरोडकर यांच्या कालप्रवाह या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात प्रमुख पाहुणे पद्मश्री उदय देशपांडे यांच्या हस्ते रवींद्र मालुसरे पुरस्कृत'निर्भीड जागल्या सन्मान पुरस्कार'समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.गुरुनाथ तिरपणकर हे जनजागृती सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष म्हणून गेली सहा वर्षे कार्यरत आहेत. संस्थेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, महिला सक्षमीकरण अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय उपक्रम राबवून जनजागृतीचे काम केले आहे. विविध सामाजिक संस्थांवर ते पदाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. तसेच मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई, ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघ, महाराष्ट्र राज्य मराठी मुक्त पत्रकार संघ, पत्रकार उत्कर्ष समिती महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई मराठी पत्रकार संघ अशा पत्रकार व वृत्तपत्र लेखक संघटनांवर कार्यरत आहेत.गुरुनाथ तिरपणकर यांना"निर्भीड जागल्या सन्मान पुरस्काराने"सन्मानित केल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.याप्रसंगी नवशक्तीचे संपादक प्रकाश सावंत, माजी संपादक प्रकाश कुलकर्णी, साहित्यिक अशोक बेंडखळे, संघाचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे, माजी महापौर अरुण देव, संघाचे आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.




## थोडक्यात पण महत्वाचे...

### इंदापूर सहाय्यक निबंधकच्या आदेशाला सचिवांनी दाखवली केराची टोपली

भिगवण (दैनिक संध्या) : डिकसळ (ता.इंदापुर) येथील योगेश्वरी विविध कार्यकारी सेवा संस्थेच्या थकबाकीदार संचालकांना अपात्र ठरवण्याची मागणी लाल फितीत अडकली असुन,सहाय्यक निबंधक यांच्या आदेशाला चक्क सचिवच केराची टोपली दाखवत असल्याने थकबाकीदार संचालकांना अपात्र ठरवण्याची मागणी केवळ कागदी घोडे नाचवण्यात धन्यता मानत आहे. योगेश्वरी विविध कार्यकारी सोसायटीमध्ये काही संचालक थकबाकीदार असल्याने त्यांना अपात्र ठरवण्याची मागणी संस्थेचे सभासद व संचालक जिजाराम पोंदकुले यांनी इंदापुरचे सहाय्यक निबंधक सहकारी संस्थेकडे केली आहे. त्यावरून संबधित सहाय्यक निबंधक बी.के.शिवरकर यांनी संस्थेच्या सचिवांना थकबाकीदार संचालक यादी मागवत योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना केलेल्या आहेत. परंतु सचिवांनी माहिती सादर केली नाही. त्यावरून सहाय्यक निबंधक शिवरकर यांनी दि.१ एप्रिल रोजी सचिवांना कडक शब्दात नोटीस देत यामध्ये आपण दि.३० मार्च रोजी संस्थेत कर्ज भरणा येत असल्याने सायंकाळी ६ वाजेपर्यंत संस्थेचे मुख्यालय सोडता येत नाही असे कळवले व दि १ एप्रिल पर्यंत मुदतची मागणी केली. परंतु त्यानंतरही सुनावणीला अनुपस्थितीत राहिल्याचा ठपका सचिवावर ठेवला आहे. यानंतर शिवरकर यांनी सचिवांना दिलेल्या पत्रानुसार दि.१३ एप्रिल पर्यंत थकबाकी संचालकांची वस्तुनिष्ठ माहिती अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.व सचिव व थकबाकीदार संचालक यांनी आपले म्हणणे सादर न केल्यास किंवा म्हणणे असमाधान कारक असल्यास यथोचित कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. मात्र तरीही सचिव सिकंदर आत्तार हे सहाय्यक निबंधक यांना माहिती सादर करीत नसल्याचा आरोप तक्रारदार जिजाराम पोंदकुले यांनी केला आहे.

### मुद्रांक शुल्क विभागाचा नवा निर्णय; राज्यात 60 खासगी दस्तनोंदणी केंद्रे सुरु होणार

पुणे (दैनिक संध्या) : दस्तनोंदणीसाठी गेल्यानंतर तुमचे आदरातिथ्य व्हावे, सर्व सुविधा मिळाव्यात, असे वाटत असेल, तर मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क या व्यतिरिक्त पाच हजार २१८ रुपये अतिरिक्त शुल्क भरावे लागेल. ते भरल्यास सर्व सोईसुविधांसह तुमच्या वेळेची बचत होऊ शकते. कारण नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने नवीन दस्तनोंदणी कार्यालये खासगी तत्त्वावर सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यभरात नव्याने ६० मुद्रांक शुल्क आणि नोंदणी कार्यालये सुरू करण्यासाठी व ते चालवण्यासाठी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखालील एका समितीने या कंपनीला कार्यादेश देण्यास मंजुरी दिली आहे. त्यानुसार 'व्हीएफएस ग्लोबल सर्व्हिसेस' या कंपनीला राज्यभरात मुद्रांक शुल्क कार्यालये उभारण्याचे आणि त्यांचे व्यवस्थापन करण्याचे कार्यादेश दिले आहे. येथील नोंदणी ऐच्छिक असेल. पहिल्या टप्प्यात मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर आणि नाशिक या शहरांत ३० केंद्र सुरू होणार आहे.

## जेष्ठ साहित्यिक डॉ. जयप्रकाश घुमटकर यांचे निधन

**कोरेगावमुळ (दै. संध्या)**



डॉ.जयप्रकाश घुमटकर यांचे आज २ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता वयाच्या ७२ व्या वर्षी ठाणे येथे अल्पशा आजाराने निधन झाले. ठाण्याच्या शैक्षणिक साहित्यिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात गेली चाळीस वर्षे सातत्याने ते कार्यरत होते .चाळीस वर्ष साहित्याच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे कार्य त्यांनी केले. साहित्यातील विविध विषय आपल्या लेखणीद्वारे परखडपणे हाताळणारे डॉ. जयप्रकाश घुमटकर हे अनेक नामवंत साहित्यिकांमधून आपले वेगळेपण सिद्ध करीत असत , त्यांना आत्तापर्यंत महाराष्ट्र जनमुद्रा पुरस्कार, ठाणे जिल्हा साहित्यरत्न पुरस्कार, साहित्यभूषण पुरस्कार, साहित्य साधना पुरस्कार, ठाणे महानगरपालिकेचा ठाणे गौरव पुरस्कार तसेच महाराष्ट्र जीवन गौरव पुरस्कार असे विविध पुरस्कार त्यांना आत्तापर्यंत लाभलेले आहेत. विशेष म्हणजे महाराष्ट्र जर्नलिस्ट फाउंडेशन या प्रख्यात संस्थेच्या महाराष्ट्रातील तमाम पत्रकारांतर्फे त्यांना नुकताच महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार सुद्धा प्रदान करण्यात आला होता. डॉ. जयप्रकाश घुमटकर यांनी घुमटकर क्लासेस, घुमटकर इंजिनिअरिंग कॉलेज आदी शिक्षण संस्थांमार्फत हजारांच्यावर विद्यार्थ्यांना शिकविले आहे. चित्रपट कसा काढावा?, तऱ्हेवाईक नातेवाईक, विचित्र विश्व, विद्रोही जोतिबा, गोलघुमट-कोळीवाडा ते नौपाडा-एक प्रवास, साहित्य संमेलनाध्यक्ष निवडणूक-लेखाजोखा असे अनेक विविध विषय त्यांनी आपल्या लेखणीद्वारे परखडपणे हाताळले आहे. यापूर्वी त्यांनी लिहिलेल्या युगपुरुष-डॉ. बाबासाहेब आंबेडकर-शोध आणि बोध या प्रबंधाला तर राष्ट्रीय पातळीवरचा दिल्लीचा सर्वोच्च दलित साहित्य अकादमी पुरस्कार सुद्धा लाभला होता.

डोंबिवली येथे झालेल्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवडणूक सुद्धा त्यांनी लढवली होती. पण त्यांना अपयश आले होते. पण अपयशाने खचून न जाता त्यांचा साहित्य प्रवास आजही सुरु ठेवला होता.

होणार सून मी त्या घरची, वैरी मंगळसूत्राचा,महिमा काळभैरवाचा, आमदार माझ्या खिशात, भक्ती नागनाथाची, धाव रे विठ्ठला, एक डाव सत्तेचा आणि भानामती हे त्यांचे विशेष गाजलेले चित्रपट आहेत. डॉ.जयप्रकाश घुमटकर यांच्या मागे एक मुलगा, सुनबाई दोन मुली, जावई त्यांची पत्नी एक नातू असा त्यांचा परिवार आहे. भावपूर्ण श्रद्धांजली.

## पुण्यातील सातशे गावांना विकासाची नवी दिशा

- 'पीएमआरडीए'चा संरचनात्मक आराखडा, १८ मीटरपर्यंत रस्त्यांचे जाळे!

**पुणे (दै. संध्या)**

पुणे महानगर परिसरातील सुमारे ७०० गावांच्या हद्दीचा संरचनात्मक आराखडा (स्ट्रक्चरल प्लॅन) करण्याचा इरादा पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) जाहीर केला आहे. राज्य सरकारने 'एमआरटीपी' ॲक्टमधील तरतुदीमध्ये गेल्यावर्षी बदल केला.



त्यानुसार राज्यात हद्दीच्या विकास आराखड्यापूर्वी संरचना आराखडा तयार करणारी पीएमआरडीए ही पहिली स्थानिक स्वराज्य संस्था ठरली आहे. गेल्यावर्षी पावसाळी अधिवेशनात राज्य सरकारने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमात (एमआरटीपी ॲक्ट १९६६) बदल करीत नव्याने काही तरतुदींचा समावेश केला. त्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना हद्दीचा विकास आराखडा किंवा नगररचना योजनेचा आराखडा तयार करण्यापूर्वी संरचनात्मक आराखडा करण्याचे अधिकार देत त्यांची अंमलबजावणी करणे बंधनकारक केले. त्यानुसार नगररचना अधिकारी म्हणून स्मिता कलकुटकी यांची नियुक्ती केली. त्यांनी या कायद्यातील बदलानुसार संरचनात्मक आराखडा तयार करण्याचा इरादा जाहीर केला आहे. त्यानंतर पुढील चार महिन्यांत या आराखड्याचे प्रारूप तयार करून जाहीर करण्याचे बंधन प्राधिकरणावर आले आहे.

# "लक्ष्य'"आणि "आयुष्य" ही पुस्तके प्रकाशित

**मुंबई (दै. संध्या)**

ज्येष्ठ लेखक दत्तात्रय पाठक यांच्या ८१ व्या वाढदिवशी व 'सहस्त्रचंद्रदर्शन' सोहळा निमित्ताने झालेल्या समारंभाच्या वेळी त्यांनी लिहिलेल्या व मधुश्री प्रकाशनने निर्मित केलेल्या "लक्ष्य" आणि "आयुष्य" या पुस्तकांचे प्रकाशन आज पी वाय सी हिंदू जिमखाना येथे शिक्षणतज्ज्ञ, संशोधक व प्रो व्ही.सी, एमआयटी डब्ल्यूपीयू, पुणे डॉ. मिलिंद पांडे, यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रकाशन समारंभाच्या वेळी. लेखक दत्तात्रेय पाठक,डॉ.मिलिंद पांडे, 'मधुश्री'चे प्रकाशक श्री पराग लोणकर, सौ.अंजली पाठक, डॉ.श्रीरंग जोशी(ऑर्थोडोंटिस्ट), डॉ.अर्चना जोशी.डॉ.अपर्णा पाठक, अभिनेत्री डॉ.तनिषा जोशी,डॉ. मंगला जोगळेकर व डॉ.भरत भावे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. अर्चना जोशी यांनी सर्वांचे स्वागत केले.त्या म्हणाल्या ज्या वयात लोक आराम करायचा विचार करतात,त्या वयात माझ्या वडिलांनी गेल्या चार वर्षांत ५ प्रेरणादायी पुस्तके लिहिली. यातून सर्वांना लिखाणासाठी प्रेरणा मिळेल असा विश्वास व्यक्त केला.

डॉ. मिलिंद पांडे यांनी अध्यक्षीय भाषणात 'श्री. पाठक यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक, सखोल अभ्यासातून, 'लक्ष्य' आणि 'आयुष्य' पुस्तकातील विचार केवळ वाचनासाठी नसून विद्यार्थी आणि अनेकांच्या आयुष्यात प्रेरणा, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टीकोण देण्यासाठी आहेत' असे म्हणाले .

'विविध विषयांवर चिंतन करून अभ्यासपूर्ण मांडणी हे लेखकाच्या लेखन-प्रतिभेचे वैशिष्ट्य आहे. प्रत्येक गोष्टीच्या चिंतनातून इतरांनाही 'शहाणं करून सोडण्याची' त्यांची तळमळ आणि लेखनातील वाचनीयता आणण्याची त्यांची हातोटी खरोखर अतिशय दुर्मिळ आहे' असे लोणकर यांनी सांगितले .

लेखकाचे मनोगत व्यक्त करताना श्री. दत्तात्रेय पाठक म्हणाले, 'तरंग, अंतरंगीचे' व 'वंदनीय' आणि 'चरैवेति! चरैवेति!!' या पुस्तकांना भरभरून मिळालेला प्रतिसाद यामुळे ही दोन पुस्तके लिहिली आहेत. 'लक्ष्य' या पुस्तकात 'विश्वास, प्रयत्न, जिद्द आणि संयमाने आपल्या लक्ष्यप्राप्तीसाठी प्रयत्नशील राहा' आणि 'आयुष्य' या पुस्तकात 'आयुष्य' हे हातातून निसटणाऱ्या वाळूप्रमाणे असून, ते एक न सुटलेले कोडे आहे जे सोडवण्यासाठीचा अट्टाहास प्रत्येकजण आपापल्या परीने करत असतो' असं प्रतिपादन केल. डॉ. श्रीरंग जोशी म्हणाले दोन्ही पुस्तकं परस्पर संबंधित असून लक्ष्य असेल तरच आयुष्याला काही अर्थ असतो . डॉ. श्रीरंग जोशी यांनी 'आयुष्य' व श्री लोणकर यांनी 'लक्ष्य' मधील एका प्रकरणाचे अभिवाचन केले.

सौ. अंजली पाठक यांनी श्री. पाठक यांच्या आरोग्यसंपन्न दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अर्चना जोशी यांनी केले डॉ. अपर्णा पाठक यांनी आभार प्रदर्शन करतांना अमेझॉन आणि किंडलवर ही पुस्तके उपलब्ध असल्याबद्दल माहिती दिली.



## थोडक्यात पण महत्वाचे...



### अत्याचार व तिचा मृत्यू प्रकरणी शिवसेनेच्यावतीने अध्यक्षांना निवेदन

पुणे (दैनिक संध्या) : नसरापूर (ता भोर) येथे अल्पवयीन बालीकेवर झालेल्या अत्याचाराचा आणि खुनामुळे राज्यभरात संतापाचे वातावरण निर्माण झाल्यानंतर पुण्यातील शिवसेना शिंदे गटाच्या वतीने आरोपीस कोणत्याही वकिलांनी वकीलपत्र न स्वीकारण्यात यावी या संदर्भाचे निवेदन पुणे बार कौन्सिल असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. काळूराम भुजबळ यांना देण्यात आले होते. यावेळी शंकर संगम शिव सेना पुणे शहर समन्व्यक शिवसेना श्रमिक राष्ट्रीय कामगार सेना पुणे शहर प्रमुख रोहित उर्फ बापू कसबेकर, पुणे जिल्हा शिक्षक सेना जिल्हा प्रमुख अनील गडकरी सर पुणे उप शहर प्रमुख सुनील जाधव, पुणे उप शहर प्रमुख संजय डोंगरे, शहर संघटक अनिल बटाने, , निलेश जगताप, मागासवर्गीय शहर प्रमुख महेंद्र गायकवाड, आदी उपस्थित होते. यावेळी आरोपीला लवकरात लवकर मृत्यू दंडाची शिक्षा ठोठावण्यात यावी अशी शिवसेनेची मागणी आहे.

### मीरा बोरवणकर यांची राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी निवड



पुणे (दैनिक संध्या) : आपल्या धडाकेबाज कार्यशैलीमुळे 'लेडी सुपरकॉप' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या निवृत्त पोलीस अधिकारी मीरा बोरवणकर यांची राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. प्रशासकीय आणि पोलीस दलातील प्रदीर्घ अनुभवाचा फायदा आता राज्यातील महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी होणार आहे. मीरा बोरवणकर या भारतीय पोलीस सेवेतील (आयपीएस) अत्यंत वरिष्ठ आणि अनुभवी अधिकारी आहेत. १९८१ च्या बॅचच्या अधिकारी असलेल्या बोरवणकर यांनी महाराष्ट्र केडरच्या पहिल्या महिला आयपीएस अधिकारी होण्याचा मान पटकावला होता. त्यांच्या पोलीस दलातील कारकिर्दीत त्यांनी अनेक महत्त्वाच्या प्रकरणांचा छडा लावून गुन्हेगारांवर वचक निर्माण केला होता. पोलीस दलातील विविध उच्च पदे भूषवल्यानंतर आता त्यांच्याकडे राज्य महिला आयोगाची महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. महिलांचे हक्क, संरक्षण आणि सक्षमीकरण या क्षेत्रांत त्यांच्या निवडीमुळे मोठी सकारात्मक भर पडेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यांच्या या नियुक्तीचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.



### ज्येष्ठ नागरिकांना व महिलांना मोफत अन्न धान्य किटचे वाटप

भिवंडी (दैनिक संध्या) : मौजे भिनार येथील भिवंडी ग्रामीण विधानसभा प्रमुख तथा आदिवासी सेवक (महाराष्ट्र शासन)महादेव आंबो घाटाळ यांच्या भिनार येथील जनसंपर्क कार्यालयामध्ये भिवंडी तालुक्यातील चिंबीपाडा, गाणे, कांबे, दह्याळेपाडा काटई कवाड कासपाडा येथील २०० ज्येष्ठ नागरिकांना व विधवा निराधार महिलांना नुकताच मोफत धान्य वाटप करण्यात आले. या प्रसंगी महाराष्ट्र शासन आदिवासी सेवक भिवंडी ग्रामीण शिवसेना विधानसभा प्रमुख, आदिम आधार आदिवासी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित (ठाणे) अध्यक्ष तथा अध्यक्ष जनकल्याण सामाजिक संस्था (ठाणे) महादेव आंबो घाटाळ, श्रमिक मोर्चा ठाणे जिल्हा अध्यक्ष मंदार घाणेकर, भिनार ग्राम पंचायत सरपंच भरत घाटाळ, चिंबीपाडा ग्राम पंचायत सदस्य शोभा जाधव,सुरेश जाधव अनिल वाघात,नंदाकर लांगे, आदिम आधार आदिवासी पतसंस्था मर्यादित (ठाणे) व्यवस्थापक सूरज मानकर,मोनाली घाटाल, अनिल जाधव, विकी जाधव इत्यादी उपस्थीत होते. भिवंडी तालुक्यातील २०० लाभार्थ्यांनी याचा लाभ घेतला.



### मतदारसंघातील वीज विषयक कामांचा खा. बारणे यांचेकडून आढावा

पुणे (दैनिक संध्या) : मावळ लोकसभा मतदारसंघातील वीज प्रश्नांचा खासदार श्री. श्रीरंग आप्पा बारणे यांनी सोमवारी आढावा घेतला. महावितरणच्या गणेशखिंड येथील 'प्रकाश भवन' मधील सभागृहात सोमवारी (दि.४) सकाळी ही आढावा बैठक झाली. भोसरी, पिंपरी, तळेगाव, वडगाव, आकुर्डी, देहूरोड, देहूगाव, किवळे, रावेत आणि लोणावळा परिसरातील तक्रारींची दखल घेऊन, वीज पायाभूत सुविधांमध्ये तातडीने सुधारणा करण्याचे तसेच वीज पुरवठा अखंडित व सुरक्षित ठेवण्यासाठी वेळेत देखभाल-दुरुस्ती कामे करण्याच्या सूचनाही खा. बारणे यांनी दिल्या. वाढत्या वीज मागणीचा विचार करून अतिभारीत रोहित्रांची क्षमता वाढवणे किंवा नवीन रोहित्र बसवून वीज वितरण जाळे सक्षम करावे. तसेच सर्व चालू प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करावेत असे निर्देश खा. बारणे यांनी दिले. विविध प्रकल्पांतर्गत वीज वाहिन्या भूमिगत करण्यासाठी व बिघाड दुरुस्तीचा कालावधी कमी करण्यासाठी रस्त्याच्या बाजूने स्वतंत्र 'भूमिगत मार्गिका' (Duct) सोडण्याची तरतूद महापालिकेच्या डीपीआर मध्ये करण्यासाठी महापालिकेला सूचना द्याव्यात अशी विनंती महावितरणतर्फे करण्यात आली. त्यावर लवकरच पालिका आयुक्तांसोबत बैठक घेऊन प्रश्न सोडवण्याचे आश्वासनही खा. बारणे यांनी दिले. बैठकीला महावितरण पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे, अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड, युवराज जरग, संजीव नेहेते यांचेसह इतर वरिष्ठ अधिकारी व अभियंते उपस्थित होते. ग्राहकांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी स्मार्ट मीटरबाबत विशेष जनजागृती आणि तक्रार निवारण शिबिरे आयोजित करण्याचे तसेच प्रधानमंत्री-सूर्यघर योजना व सौर कृषीपंप योजनेची जनजागृती करण्याचे निर्देश खा. बारणे यांनी महावितरणला दिले. त्यावर मुख्य अभियंता सुनिल काकडे यांनी शुक्रवारी (दि. ८) पुणे परिमंडलातील सर्व स्थानिक कार्यालयांत एकाच दिवशी हे मेळावे घेणार असल्याचे सांगितले.

# नसरापूर अत्याचार प्रकरणी नीरा ग्रामस्त संतप्त

## चिमुकलीवरील अत्याचार व हत्येच्या घटनेनंतर ग्रामस्थ एकवटले; पोलिसांना निवेदन

नीरा (दै. संध्या)



भोर तालुक्यातील नसरापूर येथे घडलेला साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवरील अमानुष अत्याचार व निर्घृण हत्येच्या घटनेने संपूर्ण परिसर हादरला असून ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या घटनेचा निषेध नोंदवण्यासाठी पुरंदर तालुक्यातील नीरा येथील छत्रपती शिवाजी चौकात ग्रामस्थ मोठ्या संख्येने एकत्र आले.

यावेळी आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करावी, पीडितेला तात्काळ न्याय मिळावा तसेच अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली . तर निषेध आंदोलनानंतर पोलिस प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद केल्यानुसार, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करावी, खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवून सहा महिन्यांच्या आत निकाल द्यावा, तसेच आरोपींना मृत्युदंडाची शिक्षा व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासोबतच आरोपींना जामीन नाकारावा, पीडित कुटुंबाला आर्थिक मदत व सरकारी नोकरी द्यावी, तसेच महिला व बालकांच्या सुरक्षेसाठी ग्रामीण भागात सीसीटीव्ही व पोलिस गस्त वाढवावी, अशा मागण्या देखील करण्यात आल्या आहेत.

या आंदोलनात निरा गावचे माजी उपसरपंच राजेश काकडे, माजी ग्रामपंचायत सदस्य अनिल चव्हाण, प्रमोद काकडे, महेश जेधे स्वप्निल कांबळे, अजित सोनवणे, महेंश धायगुडे, बंटी पवार, सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. शिवसेनेचे महेश जेधे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.

# उपक्रमशील आणि प्रयोगशील शिक्षकांची गरज - डॉ. संगीता गोळे



पुणे (दै. संध्या)

■ एस. बी. पाटील पब्लिक स्कूल मध्ये 'खोज' ही आंतर जिल्हा शिक्षक परिषद संपन्न

विद्यार्थी केंद्रबिंदू मानून शिक्षकांनी सातत्याने आपल्या व्यापक अनुभवातून नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले, तर विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी कुतूहलाची ज्योत कायम तेवत राहील. आताच्या नव्या पिढीला अशा उपक्रमशील आणि प्रयोगशील शिक्षकांची गरज आहे, असे शैक्षणिक सल्लागार व मार्गदर्शक डॉ. संगीता गोळे यांनी सांगितले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूल मध्ये "संयुक्त राष्ट्रांचे शाश्वत विकास उद्दिष्ट ४" अंतर्गत 'खोज' या आंतर जिल्हा शिक्षक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पुणे, मुंबई, नाशिक येथील १५० पेक्षा जास्त शिक्षकांनी सहभाग घेतला होता. 'जीवन कौशल्ये : आनंदी वर्ग खोल्यांकडे एक प्रवास' या विषयावर आधारित या परिषदेचे हे दुसरे वर्ष होते. यावेळी डॉ. गोळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या प्राचार्या डॉ. बिंदू सैनी, आशा एज्युकेशन सोसायटीच्या प्रतिनिधी श्रुंगी दुबे, द ऑर्किड्स स्कूलच्या डॉ. नम्रता मजहिल, परीक्षक डॉ. लीना पिंपळे, डॉ. अमृता जोशी, उपप्राचार्या पद्मावती बंडा, मुख्याध्यापिका शुभांगी कुलकर्णी, नाशिक येथील मीना भुजबळ स्कूल ऑफ एक्सलन्स च्या प्राचार्या शुभ्रा वर्मा, के. के. वाघ महाविद्यालयाचे प्रतिनिधी, द नॉलेज हॅबिटॅट स्कूल पुणे, सुरजबा विद्या मंदिर मुंबई, एम. पी. शाह इंग्लिश हायस्कूल मुंबई, अंतर भारती बालग्राम लोणावळा, आणि एस. बी. पाटील पब्लिक स्कूल, पुणे यांच्यासह विविध शाळा महाविद्यालयातील १५० पेक्षा अधिक शिक्षक, प्रतिनिधी उपस्थित होते.

## मावडीकरांकडून सेवानिवृत्त अधिकारी संतोष देशमुख यांचा उत्स्फूर्त सत्कार

पुरंदर (दै. संध्या)



पुरंदर तालुक्यातील मावडी (क. प.) गावचे सुपुत्र व महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागातील उपसचिव पदावर कार्यरत असलेले संतोष देशमुख हे नुकतेच सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या गौरवासाठी कै. पिंदूशेठ हिंगमिरे मित्र परिवार व समस्त ग्रामस्थ मावडी (क. प.) यांच्या वतीने उत्स्फूर्त सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संतोष देशमुख यांनी सीएस आर फंडा मधून प्राथमिक व माध्यमिक शाळेस ग्रंथालय व साहित्य प्रदान केले. या कार्यक्रमाला माजी आमदार संजय जगताप, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे, पुरंदर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष माणिकराव झेंडे पाटील, डॉ. संजय सावंत,अनिल चाचर,सरपंच सोनाली चाचर तसेच सोसायटीचे अध्यक्ष सदाशिव जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपसचिव एल. एम. पवार हे होते.

यावेळी विविध मान्यवरांनी आपल्या मनोगतातून संतोष देशमुख यांच्या कार्याचा गौरव केला. प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "एखाद्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याचा गावकऱ्यांकडून उत्स्फूर्त सत्कार होणे म्हणजे त्या अधिकाऱ्याने आपल्या सेवाकाळात लोकांना न्याय व मदत दिलेली असते. असा सन्मान हा त्यांच्या कार्याचा खरा गौरव आहे."

## जुन्नरमध्ये १९९४ च्या माजी विद्यार्थ्यांची भेट; शालेय आठवणींना उजाळा

जुन्नर (दै. संध्या)

■ शालेय आठवणींना उजाळा देत शिस्त व शिक्षणाबद्दल कृतज्ञता व्यक्त

जुन्नर येथे श्री शिवाजी मराठा शिक्षण संस्था शिवनेर जुन्नर संचलित अण्णासाहेब आवटे विद्यामंदिराच्या सन 1994 सालच्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न झाला. शाळेमध्ये आपल्या वर्गातील बाकांवर बसून माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणीना उजाळा दिला. याप्रसंगी शालेय जीवनातील आठवणी जागृत झाल्याने माजी विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले तर उपस्थित विद्यार्थी भाविक झाले. यावेळी उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणी, शिक्षकांनी केलेले मार्गदर्शन या आठवणीना उजाळा देत शालेय जीवनात मिळालेले शिक्षण व शिस्त यामुळेच भविष्यात यश मिळाल्याची कृतज्ञता मनोगतातून व्यक्त केली. तर शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी माजी विद्यार्थ्यांकडून शाळेसाठी मोलाची मदत करण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले. माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष सुभाषराव कवडे यांनी यावेळी शाळेच्या भौतिक व शैक्षणिक विकासासाठी माजी विद्यार्थ्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले. यावेळी माजी विद्यार्थी अनिल भालेराव यांच्या माध्यमातून शाळेतील विद्यार्थ्यांसाठी वीस हजार रुपयांचे शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले. कार्यक्रमाचे आभार अनिल भालेराव यांनी मानले.

# आंबेडकर जयंतीनिमित्त स्नेहभोजन व भेटवस्तू वाटप

बारामती (दै. संध्या)

■ डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समितीच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांनी जयंती साजरी



तथागत भगवान गौतम बुद्ध,छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त बारामती येथे भव्य कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. या प्रसंगी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त उत्सव समिती व संघर्षशक्ती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्नेहभोजन व भेटवस्तू वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला.कार्यक्रमात उपस्थित नागरिकांशी संवाद साधत सामाजिक ऐक्य व समतेचा संदेश देण्यात आला.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते युगेंद्रदादा पवार उपस्थित होते.तसेच प्रमुख अतिथी म्हणून किरणभाऊ इंगळे,राजेंद्र नाना सोनवणे,प्रशांत नाना सातव,प्रतीक शेठ ढवाण पाटील,अभिजित भाऊ घाडगे, विशाल भाऊ हिंगणे,गणेश काका जोजारे,कृष्णमुर्ती जगताप,विशाल भाऊ जाधव,चिऊशेठ जजिरे, प्रताप आबा पागळे, अनिताताई गायकवाड,सोमनाथ गजाकस,अजिजभाई शेख,विपुल आण्णा ढवाण पाटील,अक्षय भैय्या शेरे,योगेश नालंदे,जमीरभाई सय्यद,धनंजय भाऊ जमदाडे,शुभम अहिवळे,गौरव (मेंबर) अहिवळे,अमोल कुलट,निलेश आप्पा साळुंखे,संभाजी माने,राजेश कांबळे,अजय लालबिगे साहेब,बाळासो गायकवाड,अतुल शेठ पवार,प्रतीक शेठ जोजारे,उपस्थित होते.

यावेळी योगेश संजय महाडीक,अँड.चैतन्य भैय्या गालिंदे,अस्लमभाई तांबोळी,सोनू दादा लोणकर, राहुल शेठ भापकर, योगेश महाडिक, महामुनी मामा,विनायक कांबळे गुरुजी,वसीमभाई तांबोळी, रणजीत मोतीकर,समीर शहा, वसीम बागवान,अशपाक शेख,अकबर तांबोळी,अमीन अन्सारी,इम्तियाजभाई तांबोळी,जुनेद बागवान,रफिक शिकलकर,युसुफ तांबोळी यांच्यासह स्थानिक महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमातून समता,बंधुता आणि सामाजिक ऐक्याचा प्रभावी संदेश देण्यात आला.

# मरण पत्करेन पण उपोषण सोडणार नाही

## मोजणीची फी भरल्याने जागा मोजणीवर ताटे ठाम

चाकण (दै. संध्या)



खेड तालुक्यातील तब्बल पाच हजार बेघर बांधवांना चांदुस गावच्या गावठाणा बाहेर येत असलेल्या शासनाच्या मालकीच्या जमीनीवर राहण्यासाठी एक गुंठा जागा मिळावी, यासाठी दीड महिन्यापूर्वी भापसे पार्टीचे अध्यक्ष दीपक ताटे व त्यांच्या पत्नी जयश्री ताटे यांनी पुण्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. जागा मोजणीची फी भरूनही प्रशासन जागा मोजत नसल्याने मरण पत्करेन पण उपोषण सोडणार नाही, असा निर्धार ताटे दांपत्याने केला आहे.

खेड तालुक्यातील चांदुस येथील शासनाच्या मालकीची जमीन गट नंबर ५९१,४७४ व १४२ या सरकारी जमिनीवर बेघर नागरिकांना राहण्यासाठी एक गुंठा जागा मिळावी, यासाठी ताटे यांनी त्यांच्या पत्नी जयश्री यांच्या समवेत पुण्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दीड महिन्यापूर्वी साखळी उपोषण सुरू केले आहे. हे उपोषण त्यांनी अद्यापही सुरूच ठेवले आहे. खेड तालुका प्रशासनाच्या आदेशानुसार दीपक ताटे यांनी दि.१४ सप्टेंबर, २०२२ रोजी अति तातडीची लाखो रुपयांचा मोजणी शुल्क शासनास भरला आहे. जमीन मोजणीच्या तीन वेळा तारखा देऊनही मोजणी झाली नाही. सदर सरकारी जागेचा मोजणीचा आदेश जिल्हा प्रशासनाने संबंधित विभागाला तातडीने द्यावा. तसेच बेघर नागरिकांना कबाला व हक्क पावती तातडीने द्यावी, असे दीपक ताटे यांनी स्पष्ट केले. गेल्या पंधरा वर्षापासून दीपक ताटे हे बेघर नागरिकांना राहण्यासाठी सरकारी जागा मिळावी याकरिता शासन दरबारी आंदोलने, मोर्चा, उपोषण आदींच्या माध्यमातून प्रयत्न करत आहेत. पोटाची खळगी भरण्याकरता खेड तालुक्यात आलेल्या बेघर नागरिकांना राहण्यासाठी शासनाने सरकारी जागा मोजून द्यावी, यावर ताटे ठाम आहेत.

## एमआयटी ज्युनिअर कॉलेजचा बारावीचा १०० टक्के निकाल

लोणी काळभोर (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेत लोणी काळभोर येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल ज्युनिअर कॉलेजचे विज्ञान, वाणिज्य आणि कला या तिन्ही शाखांमधील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे. या वर्षी एकूण २७४ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यामध्ये वाणिज्य शाखेतील ११५, विज्ञान शाखेतील १५३ आणि कला शाखेतील ६ विद्यार्थ्यांचा समावेश होता. सर्व विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवून महाविद्यालयाच्या यशाची परंपरा कायम राखली आहे. वाणिज्य शाखेत अल्वीरा बागवान ९५ टक्के गुणांसह प्रथम तर जोएल मास्करनेस आणि संस्कार गांधी यांनी ९२.३३ टक्के गुण मिळवत संयुक्तपणे द्वितीय क्रमांक मिळवला आहे. विज्ञान शाखेत अश्लेषा मंडाले ८५.८३ टक्के मिळवत प्रथम आली आहे तर श्रेया काळभोर ८५.६७ टक्के गुणांसह द्वितीय आणि निशा नागवडे हिने ८४ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला आहे. कला शाखेत श्रीयुक्ता काकुमणी हिने ८७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला.

# नसरापूर व खालुंब्रे येथील अत्याचार प्रकरणी भीमशक्ती संघटनेच्यावतीने आंदोलन

राजगुरुनगर (दै. संध्या)



नसरापूर (ता.भोर) व खालुंब्रे (ता. खेड) येथे अल्पवयीन बालकांवर अत्याचार करून हत्या केल्याच्या घटनेचा भिमशक्ती संघटनेच्या वतीने निषेध करत आरोपींना तात्काळ फाशीची शिक्षा देण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. पुणे जिल्ह्यातील नसरापूर (ता. भोर) येथे एका चिमुकल्या मुलीवर अत्याचार करून हत्या केल्याची घटना नुकतीच घडली असून, त्याचप्रमाणे पुणे जिल्ह्यातील खालुंब्रे (ता. खेड) येथे चार वर्षांच्या बालकावर अमानुष अत्याचार करून हत्या करण्यात आल्याने सदर घटनेने संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे. या दोन्ही घटनांच्या निषेधार्थ राजगुरुनगर येथील भिमशक्ती संघटनेच्या वतीने खेड तहसीलदार कचेरीच्या आवाराबाहेर धरणे आंदोलन करत आरोपींना कडक शिक्षेची मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी भीमशक्ती संघटनेचे जिल्हा अध्यक्ष विजय डोळस, तालुका अध्यक्ष अनिल जाधव, सचिव के.डी जाधव, किशोर डोळस, संजय गायकवाड, सिद्धरथ सरोदे, मंगेश जाधव, नितेश वाघमारे, मंगेश शिंदे, सिद्धरथ भालेराव, विकास पडवळ, भुजेग झोगडत, नागेश शिंदे आकाश घोडके आदी कार्यकर्ते नागरिक उपस्थित होते.

भीमशक्ती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित आरोपींना कोणतीही दया न दाखवता तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी ठाम भूमिका मांडली. तसेच अशा प्रकारच्या मानवतेला काळिमा फासणाऱ्या घटना महाराष्ट्रात वारंवार घडत असल्याने राज्य शासनाने विद्यमान कायद्यात बदल करून कठोर शिक्षेची तरतूद करणारा स्वतंत्र कायदा लागू करावा, व अशा गंभीर गुन्ह्यांवर आळा बसण्यासाठी कठोर आणि तातडीने शिक्षा होणे गरजेचे आहे. अन्यथा समाजात भीतीचे वातावरण निर्माण होऊन नागरिकांचा कायद्यावरील विश्वास कमी होण्याची शक्यता आहे. म्हणून अशा प्रकरणाची गंभीर दखल शासनाने घ्यावी.असे खेड तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

> नसरापूर आणि खालुंब्रे येथील निष्पाप चिमुकल्यांवर झालेले अत्याचार हे केवळ गुन्हे नाहीत, तर मानवतेचा क्रूर अपमान आहे. अशा नराधमांना जिवंत ठेवण्याचा कोणताही अधिकार नाही—त्यांना तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी, ही आमची ठाम आणि आक्रमक मागणी आहे. अशा विकृत प्रवृत्तीच्या गुन्हेगारांविरोधात शासनाने कोणतीही दया दाखवू नये. वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे समाजात भीती आणि संताप निर्माण झाला आहे. त्यामुळे अशा गुन्ह्यांसाठी तातडीने कठोर, निर्दय आणि धाकदायक कायदा लागू करून भविष्यात अशा प्रकारांना कायमचा आळा बसवणे गरजेचे आहे.
>
> - विजय डोळस, अध्यक्ष भीमशक्ती पुणे जिल्हा